## ठाणे जिल्हा स्वकुळ साळी समाज संचालित

(अखिल भारतीय स्वकुळ साळी समाज मान्यताप्राप्त)

## स्वकुळ समाचार प्रकाशित

# अखिल भारतीय स्वकुळ साळी समाज



# महापरिषदांचा इतिहास

एकमेका साह्य करु । अवघे धरु सुपंथ
प्रामाणिक साळी प्रगत साळी

स्वकुळ समाचार - साळी समाजाची मुखपत्रिका

With Best Compliments from :

# KANTA CHLORIDES PVT. LTD.

**Manufacturers of**
**COPPER SALTS**

**SHRI SHASHIKANT TAPALE**
Plot No.169, Kansai Section, Ambarnath-421501.
Dist. Thane, Phone : 602286 Fax : 601986

**FACTORY**
Plot No.A-57, M.I.D.C., Badlapur - 421 533
Dist. Thane, Phone : 690644

ठाणे जिल्हा स्वकुळ साळी समाज संचालित

# स्वकुळ समाचार

नोंदणी क्रमांक १ ठा. बी. डी. ६८/८८, दि. २८/११/८

## प्रकाशित

# अखिल भारतीय स्वकुळ साळी समाज महापरिषदांचा इतिहास

लेखन

श्री. चुनीलाल तानीराम बागडे, पारोळा, जि. जळगांव
श्री. मधुकरराव फुलचंद वखारे, बदलापूर.
श्री. सोमनाथ रतिलाल कासटकर, डोंबिवली

संपादक

श्री. सोमनाथ रतिलाल कासटकर,
बी/१०५, बिंगो पार्क हौ. सोसायटी, नांदिवली क्रॉस रोड,
शांतीनगर, डोंबिवली (पूर्व), जि. ठाणे ✆ (०२५१) ८८३७८२

प्रकाशक

अध्यक्ष श्री. मधुकर वखारे. ठाणे जिल्हा स्वकुळ साळी समाज संचलित स्वकुळ समाचार

| संगणकीय काम | |
|---|---|
| *सागर इन्टरप्रायझेस,* डोंबिवली ✆८८३७८२ | *कॉम्प्युग्राफिक्स,* डोंबिवली. ✆ ४९०२०५ |

छपाई - मे. प्रशांत बाइंडर, डोंबिवली (पूर्व)

देणगी मूल्य - रु. २५/-

# स्वकुळ समाचारच्या प्रथम पुष्प प्रकाशनाच्या निमित्ताने


श्री. मधुकरराव वखारे

ठाणे जिल्हा स्वकुळ साळी समाज संचालित व आपल्या सर्वांच्या आवडीच्या स्वकुळ समाचार मासिकाच्या माध्यमातून श्री. चुनिलाल बागडे संकलित "अखिल भारतीय स्वकुळ साळी समाज महापरिषदाच्या इतिहास" हे समाजातील १०० वर्षापूर्वीची स्थित्यंतरे, समाजाची जडणघडण दर्शविणारे एक मार्गदर्शक पुस्तक आपल्या हाती देतांना आम्हास अत्यानंद होतो आहे. आपल्या समाजातील चालीरिती पोटभेद रोटीबेटी व्यवहार, अंधश्रद्धा, लग्नपध्दती, घटस्फोट, व्यसनाधिंनता, धार्मिक अधिष्ठाना संबंधी या पुस्तकांत वाचायला मिळेल. या वरील विषयांवर महापरिषदेतील ठरावावरुन त्या काळातील साळी समाजाचे स्पष्ट चित्र आपणास दिसते. श्री चुनिलाल बागडे यांची भाषाशैला ओघवती दृक्श्राव्य पद्धतीची व पकड घेणारी असल्यामुळे आपण प्रत्यक्ष या महापरिषदेला उपस्थित आहोत व प्रत्यक्ष सोहळा बघत आहोत. असा भास होतो. या प्रसन्न, बाळबोध, सुगम भाषाशैलीमुळे हा ग्रंथ लहानांपासून मोठ्यापर्यंत सर्व समाज बांधवांना आवडेल असा आहे. समाजात जे काही थोडे अभ्यासू, परिश्रमपूर्वक, लेखन करणारे मनन चिंतनद्वारे समाज प्रबोधन करणारे लेखक आहेत. (सर्वश्री भीमाशंकर साखरे, लक्ष्मणराव लोणकर, ग्या.रा.भंडारे, घुबे गुरूजी, रघुनाथराव एकबोटे, शंकरराव ढगे) त्यापैकीच श्री चुनिलाल बागडे हे एक लेखक होत. सर्व जुने वाङ्मय, घटना, समाजाने प्रकाशित केलेली मासिके, महापरिषदा, अधिवेशन इ. संबंधी सखोल माहिती श्री. बागडे यांनी ठिकठिकाणी पत्रव्यवहार करून, प्रत्यक्ष त्या समाज बांधवांना भेटून दुर्मिळ समाजोपयोगी माहिती परिश्रम पूर्वक जमवून ते भांडार आपल्या पुढे उघडे केले आहे त्याबद्दल श्री बागडे गुरूजींचे आम्ही हार्दिक अभिनंदन करीत आहोत. हे सर्व लेख स्वकुळ समाचार मासिकातून प्रत्येक महिन्यात एक लेख या प्रमाणे प्रसिद्ध झाले आहेत. ही सर्व माहिती जर एकाच ठिकाणी पुस्तक रूपाने प्रसिद्ध झाली तर फार चांगले होईल. अशी इच्छा बऱ्याच समाज बांधवांनी प्रदर्शित केली. त्यासाठी आम्ही प्रायोजकाच्या (स्पॉन्सर) शोधात होतो. परंतु हे पुस्तक अदोनीच्या ११ व्या महापरिषदेत औचित्य साधून अध्यक्षांच्या हस्ते प्रकाशित करायचे असा दृढ निश्चित केल्यामुळे भगवान श्री जिव्हेश्वरांच्या व आपण सर्व समाज बंधु भगिनींच्या कृपा आशिर्वादामुळे, प्रेरणेमुळे हा ग्रंथ तयार झाला ही आश्चर्याची व आनंदाची घटना आहे. य ग्रंथाच्या निर्मितीत ज्या ज्या समाज बांधवांनी हितचिंतकांनी जाहिरातदारांनी. तन मन धनाने सहकार्य केले त्या सर्वांचे आम्ही ऋणी आहोत. या ग्रंथाचे खरे श्रेय आमचे संपादक श्री सोमनाथजी कासटकरांना मी देतो कारण अल्पावधीत हे कार्य अतिशय कष्ट घेऊन व वेळ देऊन त्यांनी करून घेतले. या ग्रंथाचे मूल्य फारच कमी ठेवले आहे (ना नफा ना तोटा) यांचे कारण म्हणजे प्रत्येक साळी कुटूंबात हे पुस्तक वाचले जावे ही कळकळ अल्प किंमत ठेवण्यामागे आहे. सर्व समाज बांधवांनी हे पुस्तक आपल्या संग्रही ठेवून एका चांगल्या उपक्रमास, ग्रंथास सहकार्य करावे ही सदिच्छा व्यक्त करतो. भगवान श्री जिव्हेश्वर आपले कल्याण करो. धन्यवाद! जय जिव्हेश्वर !! **मधुकर वखारे** - अध्यक्ष, ठाणे जिल्हा स्वकुळ साळी समाज

**संपादकीय :–**

# दिव्यत्वाची जेथ प्रचिती तेथे कर माझे जुळती

बंधु भगिनींनो सप्रेम नमस्कार,

ठाणे जिल्हा स्वकुळ साळी समाज संचालित व स्वकुळ समाचार प्रकाशित अखिल भारतीय स्वकुळ साळी समाज महापरिषदांचा इतिहास हे पुस्तकरुपी पुष्प आपल्या हाती देतांना मला अतिशय आनंद होत आहे.



**श्री. सोमनाथ कासटकर**

गेली सतत पंधरा वर्षे ठाणे जिल्हा स्वकुळ साळी समाज स्वकुळ समाचारच्या माध्यमाने समाज बांधवंच्या अविरत सेवेत आहे. अशा संस्थेचे अध्यक्षपद मला लाभले याचा मला अभिमान वाटतो तर स्वकुळ समाचारचे संपादक या नात्याने आपल्याशी हितगुज करावयास संधी मिळते हे माझे परमभाग्य होय.

सदर पुस्तकाच्या प्रकाशनाची कल्पना जेव्हा आपले समाज लेखक श्री. चुनीलाल तानीराम बागडे यांनी स्वकुळ समाचारद्वारा महापरिषदांचा इतिहास ही लेखमाला प्रसिध्द झाली तेव्हाच मनामध्ये घर करुन होती. स्वकुळ समाचारमधून आदरनीय श्री. चुनीलाल बागडे संकलित लेखमाला प्रसिध्द झाल्यानंतर असंख्य समाज बांधवांच्या, समाज संघटकांच्या प्राप्त झालेल्या स्फुर्तीदायक, चांगल्या प्रतिक्रिया व आज समाज इतिहासाची जपणूक याची नितांत गरज असतांना तसेच अखिल भारतीय स्वकुळ साळी समाजाची ११ वी महापरिषद भरत असतानांचे हे औचिक साधून ह्या पुस्तकाच्या रुपाने समाज संघटकांच्या सेवेची दखल घेता यावी व हा महापरिषद इतिहास समाज बांधवांच्या चिरकाल स्मरणात रहावा यासाठी हा एक अल्पशा प्रयत्न स्वकुळ समाचारच्या माध्यमातून श्री जिव्हेश्वरकृपेने साकारला गेला याबद्दल कृतकृत्य झाल्याचा आनंद वाटतो. जरी या पुस्तकात सर्व माहिती सखोल देता आली नसली तरी थोडक्यात पण महत्वाच्या बाबींचा उल्लेख, गेल्या शतकातील समाज वाटचालीचा आलेख या ठिकाणी करण्यात आला आहे. या कामी समाज लेखक श्री. चुनीलाल बागडे यांनी सिंहाचा वाटा उचलून समाजासाठी आपले योगदान दिले आहे. समाज व स्वकुळ समाचार परिवार त्यांच्या या अनमोल सहकार्याबद्दल सदैव ऋणी राहील.

या पुस्तकासाठी लाभलेल्या सर्वांच्या सहकार्याबद्दल मी अत्यंत ऋणी आहे. वेळोवेळी प्रसिध्द झालेल्या महापरिषदांचा अहवाल, स्मरणिका इ. समाज संदर्भ ग्रंथांची अनमोल मदत या कामी झाली. त्यामुळेच हे पुस्तक प्रसिध्द करता आले हे निर्विवाद सत्य आहे. अखिल भारतीय स्वकुळ साळी समाज संस्थेच्या आतापर्यंतच्या इतिहासात व आजपर्यंत ज्या आदरणीय समाज धुरीनांनी, समाज संघटकांनी आपले जीवन समाज कार्यासाठी सार्थकी लावले. समाज कार्यासाठी खर्ची घातले. अशा सर्व ज्ञात/अज्ञात समाज महर्षी यांना हे पुस्तकरुपी पुष्प मी अर्पण करीत आहे.

हे पुस्तक आपणास - समाज जनता जनार्दनास आवडेल व उपयुक्त होईल, आपण हे पुस्तक संग्रही ठेवाल अशी श्री जिव्हेश्वर चरणी प्रार्थना करतो.

धन्यवाद! जय जिव्हेश्वर!!

संपादक स्वकुळ समाचार
**सोमनाथ कासटकर**

# ओंजळीतील फुले

माझ्या समस्त समाज बंधु भगिनींनो



श्री. चुनिलाल तानीराम बागडे

सप्रेम नमस्कार

आपल्या स्वकुळ साळी समाजाचा व गेल्या २० व्या शतकात संपन्न झालेल्या १० महापरिषदांचा तपशीलवार इतिहास सांगणारे हे एकमेव व दुर्मिळ माहितीचे पुस्तक साळी समाजाची मुख पत्रिका स्वकुळ समाचारच्या माध्यमाने आपल्या हाती देताना अत्यंत आनंद होत आहे.

गेल्या शतकातील समाज स्थित्यंतर, प्रमुख घटना संपन्न झालेल्या १० महापरिषदांचा व स्वकुळ रत्नाची ओळख या पुस्तकातून आपणास होणार आहे. जसे आज प्रत्येक समाज कुटूंबात भगवान श्री जिव्हेश्वरांच्या भावचित्राचे दर्शन होते तसेच नूतन पिढीस समाज इतिहासाच्या गत स्मृतींना उजाळा देणारे हे ऐतिहासीक पुस्तक प्रत्येक घरात असावे अशी मी प्रार्थना करतो.

हे पुस्तक प्रसिद्ध करण्यापूर्वी १० महापरिषदांचा इतिहास संकलन करण्यास मला अ.भा.स्व. साळी समाज अध्यक्ष श्री. डि.अे. चिल्लाळ, आळंदचे श्री. भिमाशंकर साखरे, सोलापूरचे श्री. लक्ष्मणराव लोणकर, पुण्याचे श्री. निवृत्ती पावले, स्वकुळ समाचारचे माजी संपादक व विद्यमान ठाणे जिल्हा स्वकुळ साळी समाज अध्यक्ष श्री. मधुकरराव वखारे, स्वकुळ समाचारचे संपादक व माजी अध्यक्ष ठाणे जिल्हा स्वकुळ साळी समाज श्री. सोमनाथ कासटकर यांनी दिलेल्या प्रेरणेने व अमौलिक सहकार्याने तसेच उपलब्ध झालेल्या महापरिषदांचे अहवाल, स्मरणिका इत्यादी संदर्भ ग्रंथामुळे तसेच स्वकुळ समाचारद्वारे उस्फुर्त प्रतिसाद देणाऱ्या असंख्य समाज बांधवांच्या पाठिंब्याने आपणा पर्यंत पोहचविण्याचे सत्कार्य या बालकाच्या हातून घडले. या सत्कार्यास सहकार्य देणाऱ्यां सर्वांचा मी शतशः ऋणी आहे. ही अल्पशी पण मौलिक समांज सेवा श्री जिव्हेश्वर चरणी समर्पित करतो.

धन्यवाद !

आपला समाज बालक

**श्री चुनीलाल तानीराम बागडे पारोळा (जळगांव)**

# थोर समाज संघटक श्री. जगन्नाथराव कल्याणी



श्री. जगन्नाथराव कल्याणी

अदोनी येथे भरणाऱ्या ११ व्या महापरिषदेचे अध्यक्ष, थोर समाज कार्यकर्ते, कुशल संघटक, समाज भूषण अशी बिरूदावली मिरवणारे, श्री. जगन्नाथराव कल्याणी हे साळी समाजाचे भूषण आहेत. श्री. जगन्नाथराव कल्याणी उर्फ दादांचा जन्म २२ फेब्रुवारी १९३१ साली पुण्यात झाला. घरच्या जबाबदारी मुळे त्यांचे शिक्षण एफ.वाय.आर्टस पर्यंतच झाले. साळी समाजातील एक सामान्य कुटूंबात जन्मलेले पुढे एका नामांकित तयार कपड्याच्या निर्मितीचे कारखानदार बनले व भारतभर त्यांचे नाव झाले. श्री. जगन्नाथराव कल्याणी हे कुशल, धाडसी व दूरदृष्टी समाजनेते आहे. त्यांचा गोड व हसरा चेहरा, प्रसन्न व्यक्तीमत्व, संभाषणातील चातुर्य व माधुर्य, व्यवहारीदृष्टी या अंगच्या गुणामुळे ते समाजात सुपरिचित झाले आहेत. श्री दादांनी उद्योग व्यवसाया बरोबर सामाजिक, शैक्षणिक कार्यात आत्मियतेने लक्ष पुरविले आहे. पुण्यातील नारायणपेठ स्वकुळ साळी समाजाचे ते ६ वर्षे चिटणीस (जॉ.सेक्रेटरी) होते. त्यानंतर अध्यक्ष म्हणूनही त्यांनी अत्यंत मोलाची कामगिरी पार पाडली. त्यांच्या कारकिर्दीत श्री जिव्हेश्वर सभागृह या समाजमंदिरासाठी जागा विकत घेऊन तेथे भव्य सभागृह बांधले. या समाज मंदिर उभारण्यात त्यांचा सिंहाचा वाटा होता. या इमारतीसाठी मोठ्या देणग्या मिळवून समाज मंदिराचे काम यशस्वी रित्या पूर्ण केले. श्री. जगन्नाथराव कल्याणी पुणे येथे १९७७ साली संपन्न झालेल्या अखिल भारतीय स्वकुळ साळी समाजाच्या ९ व्या महापरिषदेचे प्रमुख प्रवर्तक होते. पुण्याला ही महापरिषद भरविण्यात दादांचा सिंहाचा वाटा होता. याच अधिवेशनात समाजाची घटना मंजुर करून घेतली व अ.भा.स्व. साळी समाज विद्यावर्धक संघाची स्थापना केली. श्री दादांनी अ.भा.स्व. साळी समाजाचे सन १९८० ते १९८६ पर्यंत अध्यक्ष पदावर विराजमान होते. १९८६ च्या बंगलोर येथील महापरिषदेचे यशस्वी नियोजन श्री. जगन्नाथरावांनी केले श्री दादा दि क्लोदिंग मॅन्युफॅक्चटर्स एसोसीएशन ऑफ इंडिया या मध्यवर्ती व्यापारी संस्थेचे दीर्घ काला पर्यंत कार्यकारिणी सदस्य आहेत. याच संस्थेतर्फे पश्चिम विभागासाठी गेली १६ वर्षा पासून अध्यक्ष पदावर सतत निवड होत आहे. हे समाजाला गौरवास्पद आहे. अखिल भारतीय स्तरावर रेडीमेंट गार्मेंटसचे प्रदर्शने भरविण्याची सूचना व अंमलबजावणी योजनेचे दादा पहिले अध्यक्ष होते व १९८१ पासून त्यांच्या सूचने प्रमाणे आजतगायात ठिकठिकाणी तयार कापड्यांची प्रदर्शने होत आहेत हे त्यांचे वैशिष्टय होय. स्वकुळ साळी समाज नारायण पेठकर युवक मंडळा तर्फे दादांना समाज भूषण पुरस्कार १९९९ साली देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. ११ व्या महापरिषदेचे अध्यक्षपद देऊन समाजने त्यांचा यथोचित गौरव केला आहे. समाजात कोणताही वाद असो, समाजातील समस्या, अडचणीवर दादांचा सल्ला सर्वांनाच पचनी पडायचा. दादांच्या प्रसन्न व्यक्तीमत्वामुळे कार्यकर्तेही वाद विसरून जात. त्यांच्या दिलखुलास वाक्चातुर्याने प्रत्येक समस्या चुटकी सारखी सोडविली जायची. अशा या दादांच्या तोंडून भगवान श्री जिव्हेश्वरांची आरती ऐकण्याचा योग मला गुलबर्गा येथील अ.भा.स्व. साळी समाज कार्यकरिणी सभेत आला त्यांच्या या गोड आवाजातील भगवान श्री जिव्हेश्वरांची आरती आजही कानात गुणगुणत आहे. आणि तीच समाज कार्यकर्त्यांच्या कार्याला प्रेरणादायी ठरत आहे. अशा या समाजभूषण दादांना आमचा मानाचा मुजरा. समाज कार्य करण्यास व आम्हास मार्गदर्शन करण्यास दादांना भगवान श्री जिव्हेश्वर दीर्घ आयुष्य देवो ही प्रार्थना जिवेत शरदः शतम् जय जिव्हेश्वर.

श्री. सोमनाथ कासटकर
(संपादक स्वकुळ समाचार)

# जेष्ठ वयोवृद्धपण मनाने तरूण समाज संघटक श्री. वामनराव कोऱ्हाळकर



श्री. वामनराव कोऱ्हाळकर

श्री वामनराव कोऱ्हाळकर हे कल्याण शहर व अ. भा.स्व.साळी समाजाशी निगडीत जेष्ठ समाज कार्यकर्ते आहेत. त्यांना मी डेक्कनक्वीन गाडीत प्रमुख तिकीट तपासनीस म्हणून प्रथम पाहिले व आपल्या साळी समाजचे आहेत हे ऐकून मी त्यांची ओळख करून घेतली. प्रथम दर्शनी ६ फूट उंच, कुरळे केस, रूबाबदार चेहरा, कडक इस्त्रीचा गणवेश, टाय लावलेले, देखणे व्यक्तीमत्त्व मनात घर करून राहिले. ही १९६५ सालाची घटना त्यानंतर श्री कोऱ्हाळकर साळी समाज संस्थेत भेटत राहिले. कल्याण शहर साळी समाज संस्थेच्या स्थापनेत त्यांचा पुढाकार होता. या साळी समाज संस्थेत अध्यक्ष, खजिनदार पदे भूषवून अनेक समाज बांधवांना मार्गदर्शन केले. श्री. वामनराव कोऱ्हाळकरांचा जन्म १९२१ साळी गरीब साळी कुटूंबात सिन्नर येथे झाला. १९४२ साली ते जुनी मॅट्रिक परीक्षा चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाले. शाळेत ते अष्टपैलू विद्यार्थी म्हणूनच नावाजले. सरकारी स्कॉलर म्हणून प्रसिद्धीस आले. लहानपणापासून खेळांची आवड. तसेच ड्रॉइंग, नाटक यात शालेय जीवनात सहभागी. शाळेच्या गॅदरीग मध्ये जनरल सेक्रेटरी पद भूषविले. विडी कारखान्यातील कामगारांना वर्तमानपत्रे वाचून दाखविण्यांचे कार्य हौसेने नियमित केले. समाज कार्याची आवड १९३४ पासूनच निर्माण झाली. स्वातंत्र्य चळवळीत भूमिगत कार्यकर्त्यांना मदत केली. ते १९४२ पासून कल्याण शहरात वास्तव्य करित आहे. रेल्वेत मुख्य तिकीट तपासनीस पदावरून ३७ वर्षे प्रदीर्घ सेवा करून निवृत्त झाले. निवृत्त होऊन त्यांना २२ वर्षे झाली आहेत. पण अजूनही त्यांचा उत्साह वाखण्यासारखा आहे. १९६८ सालच्या अदोनी येथे संपन्न झालेल्या अ. भा. स्व. साळी समाजाच्या महापरिषदेत त्यांची संयुक्त चिटणीस म्हणून निवड झाली व मुंबईचे श्री. महादेव विठ्ठलराव शेकटकर हे अध्यक्ष म्हणून निवडून आले. १९७७ ला पुण्याला महापरिषद झाली त्या कार्यकारणीतपण श्री. कोऱ्हाळकर होते. १९८० साली पंढरपूरला अखिल भारतीय कार्यकारिणी निवडली गेली त्यात जनरल सेक्रेटरी (सरकार्यदर्शी) पदी त्यांची नियुक्ती झाली व श्री. जगन्नाथराव कल्याणी (दादा) हे

अध्यक्ष म्हणून निवडून आले. श्री. कल्याणी यांच्या कडून खूप चांगले मार्गदर्शन मिळाले हे श्री. कोऱ्हाळकर गौरवाने सांगतात. या कालावधीत समाज कार्यासाठी ते भरपूर हिंडले. १९८६ च्या बंगलोरला संपन्न झालेल्या महपरिषदे पर्यंत सर्व प्रमुख समाज संस्थाच्या संपर्कात ते होते याच काळात स्वकुळ रत्न म्हणून त्यांचा गौरव झाला. समाज जागृती, संगठनासाठी देशव्यापी दौरे त्यांनी केले. सेवानिवृत्तीचा काळ त्यांनी समाजसेवेत व्यतीत केला व जीवन कृतकृत्य केले. १९८५ साली निसर्गोपचार व चुंबकिय चिकीत्सेचा अभ्यास केला. त्या बरोबर योगाभ्यास, ॲरक्युप्रेशर, ॲक्युपंक्चर, तंत्रांचा अभ्यास करुन डॉक्टर ऑफ नॅचरोपथी व मॅग्नोटोपथी ही पदवी ७० व्या वर्षी संपादन केली. बऱ्याच व्याधीग्रस्तांना विनामूल्य औषधे देऊन. रोगमुक्त केले. या समाज कार्या बरोबरच डोंबिवलीला जेष्ठ नागरिक संगठनेनी (पश्चिम) स्थापना केली. त्या संगठनेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिवपदी ३/३ वर्षे सेवा केली. या सेवेची पावती म्हणून डोंबिवली संघाकडून आदर्श जेष्ठ नागरिक सदस्य म्हणून गौरव झाला, महासंघाने पण गौरव केला. ज्या समाजात आपण जन्माला आलो त्या समाजाचे अंशतः का होईना। आपण उतराई व्हायला हवे अशी त्यांची धारणा आहे. सामाजिक बांधिलकीची जाण, निस्वार्थसेवा, यामुळे वामनराव सर्व समाजात लोकप्रिय आहेत. येत्या अदोनीच्या महापरिषदेसाठी ते त्याच उत्साहाने ठिकठिकाणी दौरे करीत आहेत.

आजही ते सर्व अडलेल्या नडलेल्यांना मदतीचा हात देऊन दुःखावर फुंकर घालीत आहेत. समाजात आपल्या अवती भवती शेजारी अनेक दुःखी, रोगी, संकटग्रस्त, गरीब व्यक्ती आहेत. ते आपल्यापेक्षा खालचे जीवन जगत आहेत. त्यांच्या साठी आपण काहीतरी करू शकलो तर आपल्या जीवनात अर्थ आहे असं ते म्हणतात. असे हे सेवाभावी, समाजासाठी तनमन धनाने झटणारे कोऱ्हाळकरांचे व्यक्तीमत्त्व म्हणजे समाजाला प्रकाशकिरण दाखवण्याचा उतुंग मनोऱ्या सारखे आहे. या स्वकुळ रत्नाला उदंड आयुष्य लाभो ही भगवान जिव्हेश्वर चरणी विनम्र प्रार्थना,

जीवते शरदः शत्मः

मधुकर वखारे

अध्यक्ष ठाणे जिल्हा स्वकुळ साळी समाज.

# एक सेवाभावी समाज संघटक श्री. दत्ता सो. भंडारे

अखिल भारतीय स्वकुळ साळी समाज संस्थेचे प्रधानकार्यदर्शी श्री. दत्तात्रय सोपान भंडारे हे नावाने सर्व समाजबांधवांना चांगले परिचित आहेत. गेली. दोन तपे यांनी समाज कार्यात समरसून भाग घेतला. या कार्याची पावती म्हणूनच अ. भा. स्व. साळी समाज संस्थ्चे प्रधान कार्यदर्शी पद त्यांना लाभले. श्री भंडारे यांचा जन्म १६ एप्रिल १९३७ साली मुंबईच्या कुर्ला या उपनगरात झाला. एस. एस. सी झाल्यानंतर मेकॉनिकल ड्राफ्टस्मनचा कोर्स आय.टी.आय मधून ते उत्तीर्ण झाले व प्रख्यात एअर इंडिया कंपनीत ते नोकरीला लागले ३५ वर्षाच्या प्रदीर्घ सेवेतून १९९५ साली योजना आधिकारी या पदावरून ते सेवानिवृत्त झाले. नोकरी करीत असतांना सुध्दा समाज सेवेचे व्रत अखंडित चालू ठेवले. कारण मूळातच त्यांना समाज सेवेची आवड होती. एअर इंडियात सुद्धा त्यांनी महाराष्ट्र मंडळाची स्थापना करण्यात पुढाकार घेतला व पुढे ते या मंडळाचे कार्याध्यक्ष झाले. १९८४ साली त्यांनी मुलुंडला मराठी ग्रंथ संग्रहालयाची स्थापना केली. मॉरिशस मध्ये झालेल्या जागतीक मराठी परिषदेला एअर इंडियाच्या महाराष्ट्र मंडळा तर्फे नेतृत्त्व केले. दरवर्षी रक्तदान शिबीराचे आयोजन ते करीत असत. संत श्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींची पालखी आळंदी ते ऋषिकेश असा प्रवास २३ बसेस बरोबर घेऊन ऋषिकेशात विठ्ठल आश्रमाच्या स्थापनात हे अग्रभागी होते. १९९७ साली त्यांनी वयाची ६० वर्षे पूर्ण केली तरीही नव्या जोमाने ते समाजकार्यासाठी भारतभर फिरत आहेत. जिल्हा संगठन, समाज संगठनासाठी त्यांचे दौरे सारखे सुरू आहेत. १९८९ पासून प्रधान कार्यदर्शी पदाची धुरा ते सांभाळीत आहेत. मध्यंतरी त्यांना हृदयविकाराचा तीव्र धक्का बसला. त्यातूनही ते सावरले व प्रकृती सांभाळून समाजकार्यात खंड पडू दिला नाही. हे विशेष होय. समाज कार्यकर्ता म्हटले की त्यांना सर्व काही ऐकून घ्यावे लागते. समाजात चांगले तसेच खल प्रवृत्तीची लोक सुद्धा असतातच. हा अनुभव श्री. भंडारे यांना आला तरी या सर्व अपप्रवृत्तीकडे लक्ष न देता श्री. भंडारे समाज कार्य करीत आहेतच.



श्री. दत्तात्रय सोपान भंडारे

आज त्यांचे वय ६४ च्या घरात आहे हृदय विकाराचा त्रास असून देखील त्याची पर्वा न करता अदोनीच्या ११ व्या महापरिषदेच्या तयारीसाठी ते संपूर्ण महाराष्ट्रात देणगी, निधी संकलनासाठी फिरताहेत. या त्यांच्या कळकळीच्या समाज सेवेला आमचा मानाचा मुजरा. भंगवान श्री जिव्हेश्वराच्या चरणी विनम्र प्रार्थना हीच की त्यांना समाजसेवा करण्यास उदंड आयुष्य लाभो. जीवते शरदः शतमः

श्री भालचंद्र एन. साळी डोबिंवली

# आमचे आदरणीय समाज नेते
# अ. भा. स्वकुळ साळी समाज अध्यक्ष - श्री. दत्तात्रेय अं. चिल्लाळ

अखिल भारतीय स्वकुळ साळी समाजाचे अध्यक्ष श्री. दत्तात्रेय अं. चिल्लाळ हे



श्री. दत्तात्रेय अं. चिल्लाळ

आपल्या सर्वांना चांगले परिचित आहे. १९८८ पासून ते आपल्या समाजाची धुरा "अध्यक्ष" म्हणून समर्थपणे वाहत आले आहे. त्यांचा जन्म कर्नाटकातील गुलबर्गा येथे दिनांक ७ एप्रिल १९३८ रोजी झाला. त्यांचे शिक्षण बी.कॉम., एल.एल्.बी. पर्यंत झाले. टॅक्स सल्लागार म्हणून ते गुलबर्गा या जिल्ह्याच्या ठिकाणी आजतागायत व्यवसाय करीत आहेत. लहानपणापासून सामाजीक व राजकीय क्षेत्रात पदार्पण केल्याने त्यांना १९७० साली पूर्वीच्या जनसंघाचे जिल्हा अध्यक्ष म्हणून निवड झाली. राजकीय व सामाजिक स्तरावरील त्यांची कामगिरी यातूनच त्यांना जनसंघ पक्षाकडून लोकसभेची १९७४ मध्ये उमेदवारी मिळाली व निवडणूकही त्यांनी लढविली. तसेच विधानसभा निवडणूकही त्यांनी भा.ज.प. तर्फे १९८३ मध्ये लढविली. जरी ते यात निवडून आले नाही तरी एक सच्चा राजकीय कार्यकर्ता व समाजसेवक म्हणूनही ते नावाजलेले आहेत. या त्यांच्या नेतृत्वगुणामुळेच ते भा.ज.प.चे जिल्हा अध्यक्ष १९९८ पर्यंत होते व पुढे ते भा.ज.प. राज्य कार्यकारिणीचे सन्माननीय सदस्य बनले. अशा या राजकीय धकाधकीतून ते समाजासाठी आपला मौलीक वेळ देत असत. सन १९८० पासून ते गुलबर्गा स्वकुळ साळी समाजाचे अध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या या समाज संघटकीय गुणामुळे तसेच कुशल, धाडसी, संयमी, दुरदृष्टी व शिस्तप्रियता या अंगच्या स्वाभाविक गुणामुळे श्री. दत्तात्रेयजी चिल्लाळ अखिल भारतीय स्वकुळ साळी समाज संस्थेचे सन १९८८ ला अध्यक्षपदावर विराजमान झाले. असे हे आदरनीय समाज नेतृत्व लहानापासून ते मोठ्या समाज कार्यकर्त्यांना बरोबर घेऊन जाणारे कर्तबगार नेतृत्व. समाजाचा कुठलाही व कोठेही कार्यक्रम असो कार्यक्रमाचे बोलविणे आल्यावर आवर्जुन उपस्थित राहत असत. १९८८ पासून ते २००१ पर्यंत म्हणजे हि महापरिषद होईपर्यंत ते समाज अध्यक्ष म्हणून सदैव समाज सेवेत एका तपाहून अधिक काळापर्यंत योगदान करीत आहेत. आपल्या सहकाऱ्यांना बरोबर घेऊन सर्व विखुरलेला समाज एका समाज प्रवाहात सामील करण्याचे श्रेय श्री. दत्तात्रयजी चिल्लाळ यांना जाते. त्यांचे हे समाजासाठी दिलेले योगदान समस्त साळी बांधव कधीही विसरणार नाही. अश्या या आदरणीय समाज नेत्यास आमचा मानाचा मुजरा. समाज कार्य करण्यास व आम्हास मार्गदर्शन करण्यास श्री. दत्तात्रेयजी चिल्लाळ यांना उदंड आयुष्य लाभो अशी श्री जिव्हेश्वर चरणी प्रार्थना करतो.

जय जिव्हेश्वर !

संपादक - श्री. सोमनाथ कासटकर.

# आराध्य जिव्हेश्वर आपले पुजनीय जनक

शिवसुत भगवान श्री जिव्हेश्वर हे आपले आराध्य दैवत. पुजनीय जनक मुळ पुरुष होय. अत्री ऋषी रचित स्कंद पुराणाच्य ७ व्या स्कंदात भगवान श्री जिव्हेश्वरांची जन्मकथा आहे यास "साळीमहात्मपुराण" म्हणूनही याचा स्कंद पुरणात उल्लेख आहे. मुळ ग्रंथाचा आधार धरुन वेगवेगळ्या भाषेत अनेकांकडून त्यांचे प्राकृत भाषांतर करण्यात आले आहेत.

शालिवाहन शके ७२६ मध्ये हे महात्म पुराण श्री. भानुदास नावाच्या पंडिताने मराठी भाषेत लिहलेले आहेत. असे समजते. शके १८४५ मध्ये श्री सिध्दप्पा शास्त्री मेनळ (शहापूर) ह्यांनी कानडी भाषेत ललीत षटपदी काव्यात लिहून ठेवले आहे. अचलपूरचे श्री. काशीनाथ जंगले, पुण्याचे श्री. रामचंद्र विष्णू घटे यांनी श्री जिव्हेश्वर साळी महात्म पुराण पोथी रुपात (पुर्नमुद्रण) प्रकाशित केले तर डोंबिवलीच्या साहित्यिक सौ. मंदाबाई मधुकर खापरे यांनी श्री जिव्हेश्वर साळी महात्म पुराण गद्यमय अनुवाद करुन पुस्तक रुपात प्रसिध्द केले हे सर्व साळीमहात्म अत्रीऋषीच्या प्रसादाने सांस्कृतातून प्राकृतात रुपांतर झाल, आहेत गद्यमय, मद्यमय झाले परंतू तरीही त्याचा अर्थ बदलला नाही हे विशेष.

साळी महात्म पुराण कथा सांगते - सर्व देव-देवतांच्या विनंतीवरुन व आदिमायेच्या आज्ञेवरुन भगवान शंकरांनी आपल्या योग सामर्थ्यांनी जिव्हेपासून एका महापुरुषाला निर्माण केले तो दिवस होता सोमवार श्रावण शुध्द त्रयोदशी, वस्त्र निर्माता भगवान श्री जिव्हेश्वराला बघून सर्व देव-देवतांनी शिवपुत्राचा जयजयकार केला व लगेच त्याचे नामाभिधान करावयास सर्व मंडळी उत्सुक झाली.

कोणी म्हणाले भगवान शंकरांनी आपल्या योग सामर्थ्यांनी आपल्या जिव्हेपासून या महापुरुषाला निर्माण केले म्हणून "जिव्हाजी" असे नांव ठेवू या. कोणी म्हणाले श्रावण शुध्द त्रयोदशीस सोमवारी प्रभात समयी जन्मला म्हणून हा "सुर्यवंशी" आहे असे नामाभिधान करु या! कोणी म्हणाले परमेश्वराने निर्माण केल्यामुळे हा मानव कुळातील नसुन आपल्या देवकुळातील गणला जाईल म्हणून यास "स्वकुळ" म्हणू या। कोणी म्हणाले सर्व देव व मानवासाठी, सृष्टीसठी वस्त्र निर्माता, वस्त्र सहाय्य करणारा लज्जा रक्षण करणारा म्हणून यास "साळी" म्हणू या।

ब्रम्हा-विष्णू-महेश-गणेश-इंद्र-सुर्य-चंद्र-अग्नी, वरुण, वायू, कुबेर, नारद तसेच इतर देव-देवींनी शिवपुत्रास शुभ आशिर्वाद दिले. बालपणी माता-पार्वतीने मोठ्या प्रेमाने संगोपन केले. वेदाभ्यास श्री जिव्हेश्वरांनी आत्मसात केला. पुढे आदिमायेने आज्ञा केली की श्री भगवान जिव्हेश्वरांच्या मागासाठी हत्याराची रुपे (मागाचे साहित्य) देवांनी घ्यावी तेहतीस कोटी देवांनी मातेच्या शब्दांचा मान ठेवला परंतू आम्हा देवांचे पुजन नित्यनेमाने आंघोळ करुन सकाळ-संध्याकाळ करावयास पाहिजे असे संगितले. भगवान श्री जिव्हश्वरंनी हे मान्य करुन मी रोज देवांचे पुजन करीन त्यांचे नामस्मरण करीन असे वचन दिले. वस्त्रनिर्मितीसाठी मागाची रचना झाल्यावर

प्रथम जिव्हेश्वरांनी जरतारीचा सुंदर पितांबर तयार केला पितांबरची सुबक घडी घालून तोप्रथम शिवपार्वतीस अर्पण केला. शंकरानी हा प्रथम आदिमायेस अर्पण कर असे सांगितले. आदिमायेने पितांबरला हळदी-कुंकू लावून ती स्वतः पार्वतीला तो पितांबर नेसवू लागली. यातच आदिमायेचे प्रेम व मोठेपण दिसून येते. पुढे यशावकाश ब्रम्हदेवाने मायाची आज्ञा समजून सुंदर कन्या निर्माण केली. तिचे रुप पाहून चंद्र सुर्यही फिके पडतील असे तिचे रुप आकर्षक व लावण्य सुंदर होते. अशा या सुकन्येचे श्री जिव्हाजीशी लग्न ठरविण्यात आले. तसेच सावित्रीनेही आपल्या सुंदर मुलीचे लग्न श्री जिव्हेश्वराशीच लावावे अशी इच्छा व्यक्त केली. ब्रम्हदेवाचे मुलीचे नांव अंकिनी तर सावित्रीने निर्माण केलेली मुलीचे नाव दशांकनी, अशा दोन्ही कन्येचे एकाच मुहूर्तावर श्री जिव्हश्वराशी लग्न लावण्यात आले, लग्नाआधी श्री जिव्हेश्वरांची मुंज करण्यात आली. लग्नप्रसंगी सर्व देवांनी शिवपुत्रास आशिर्वाद दिले.

असे हे श्री जिव्हाजी कैलासमध्ये राहून नित्य नेमाने वस्त्र निर्माण करु लागले. पुढे लग्नानंतर वंश विस्तार झाला. ज्या पुर्वजांचे आपण वंशज आहोत त्याचा विस्तार थोडक्यात याप्रमाणे :

कैलासपती भगवान शिव
↓
भगवान श्री जिव्हाजी (स्वकुळ) साळी (भगवान श्री जिव्हेश्वर)
↓

सौ. अंकिनीपासून चार सुपुत्र — सौ. दशांकिनी पासून सहा सुपुत्र

सौ. अंकिनीपासून चार सुपुत्र: लोमहर्ष, चंद्रकांत, क्षेत्रपाल, पार्श्वनाथ
(हे चारही ईश्वरभक्त व ब्रम्हचारी होते)

| कैलासभुवन | सनातन | भक्तिमान | पर्वकाल | दयाजी | अर्चन |
|---|---|---|---|---|---|
| इंद्राकडे | विष्णूकडे | यमाकडे | ब्रह्माकडे | | सुदर्शन राजाकडे |
| अहिरसाळी | स्वकुळसाळी | बांगडसाळी | शुध्दासाळी | | गुजरसाळी |

कैलासभुवन ↓ निरोधन → टिकलेसाळी

अखिल स्वकुळ साळी समाजाचे हे पूर्वज प्रथम काशी व पैठण येथे स्थित झाले नंतर त्यांचे वंशज देशांत इतरत्र विखुरले गेले. त्यातून कारणपरत्व, गुजर साळी, पटलेगर, वाढोळे, पत्तू, शंकु, कर्ण, मिस्कीन, पदम् आदि उपशाखा व त्यातूनही अनेक पोटशाखा निर्माण झाल्या. या सर्व शाखा एकत्र असून आपण सर्व स्वकुळ आहोत. त्या जिव्हेश्वराचे वंशज आहोत. ज्ञान संपन्न वेदमूर्ती शिवपुत्रास आपल्य मुळ पुरुषास अनंत कोटी कोटी प्रणाम. आपला संपादक - स्वकुळ समाचार-श्री. सोमनाथ कासटकर

# दर्शन हे - त्रिवेणी संगमाचे !

भगवान श्री जिव्हेश्वरांचा आपण दरवर्षी श्रावण शुद्ध १३ स जन्मोत्सव साजरा करतो. त्यांचे पूजन व स्मरण करतो. केवळ एक दिवस सोहळा साजरा करून मोकळे होणे म्हणजे फक्त क्षणैक कर्तव्य करणे होय. त्यांचे पासून प्रेरणा घेऊन जीवन जगणे म्हणजे खरेखुरे पूजन होय. एकदा त्यांच्या भावचित्राकडे अर्थपूर्ण नजरेने बघा म्हणजे नवीनच दिव्यदृष्टी आपणास मिळेल. व जीवनात काय करावे ? कसे जगावे ? ही प्रेरणा आपणास अवश्य मिळेल.



"बघा - बरे - भगवान श्री जिव्हेश्वर कसे शांत व प्रसन्न मुद्रेने बसले आहेत. समोर पुढे ज्ञानामृत भरलेला वेद - ग्रंथ आहे. बाजूस तो पहा हातमाग ! त्यावर ते विणकाम करीत आहेत. आणि मागे ती पहा आपले पूज्य पितामह भगवान शंकराची पिंड ! म्हणजे ज्ञान - कर्म व भक्तीचा सुरेख त्रिवेणी संगम भगवान जिव्हेश्वरांच्या जीवनात होता.ज्ञानयोग - कर्मयोग - भक्तीयोग त्यांनी आचरला हेच ह्या चित्रातून स्पष्ट होते."

"आणि आपण त्यांचे वंशज ! आपणही आपल्या आद्य पित्याचा आदर्श घेऊ या ! (१) विद्यमान ज्ञान मिळवू या ! अज्ञान - अंधकार घालवू या ! डोळसपणे काही श्रद्धा जपून निरर्थक अंधरूढींना तिलांजली देऊ या ! हाच संदेश आहे या वेदग्रंथाचा! (२) तो हातमाग बघा त्यावर भगवान जिव्हेश्वरांचे विणकाम चालू आहे. आज तो व्यवसाय कालबाह्य झाला. आपले व्यवसाय स्वरूप आता बदलले आहे. तरी जो व्यवसाय असेल तो प्रामाणिकपणे, सचोटीने करा ! मिळेल त्यात समाधानी व संतोषी राहा ! आळस टाका व सदोदीत उद्यमशील राहा हाच बोध आहे या विणकाम प्रतिकाचा ! (३) आणि भक्ती मार्ग हा तर आपणास मनःशांती देणारा आहे. जीवन नाशिवंत आहे. म्हणून ईश्वरभक्ती करावी. सत्‌विचार, सत्‌कर्म व सत्‌आचार या सात्विक गोष्टींचे आचरण करावे. जीवन हा सुख - दुःखाच्या धाग्यांनी विणलेला पट (वस्त्र) आहे. त्याला हसत - खेळत प्रसन्न राहून तोंड द्यावे. व या भक्तीमार्गाने जीवनाचे सार्थक करावे. त्यानेच दुःखाची तीव्रता कमी होते व मनाला - चित्ताला शांती मिळते. ह्या भक्तीमार्गाचे "स्मरण या भगवान महादेवाच्या या पिंडीकडे पाहून आपणास होते."

तर बंधूंनो - हा आपणास माझा उपदेश नाही. गैरसमज करून घेऊ नका. हा पामर बालक आपणा सारख्या पितृतुल्य - मातृतुल्यांना काय बोध करणार ? पण मला जे या भावचित्रात दिसले ते मी भगवान जिव्हेश्वरांच्या अंतःप्रेरणेने लेखणीतून प्रगट केले. तर आपणही ज्ञान - कर्म व भक्तीचा त्रिवेणी संगम आपले जीवनात आचरू या ! हेच खरे शाश्वत भगवान जिव्हेश्वरांचे पूजन व स्मरण ठरेल.

*लेखन - श्री चुनीलाल तानीराम बागडे*

आझाद चौक, पारोळा, जि. जळगाव

# साळी समाजाचे प्रथम अधिवेशन - हुबळी
# (इ. सन १९१६)

आदरणीय बंधु - भगिनी व मातांनो - सप्रेम नमस्कार ! चला, आज मी आपणास ८२ वर्षे मागे नेत आहे. मला कल्पना आहे की, आपला जन्मही त्यावेळी नसेल ! पण एक कल्पना करा आणि चला इ. सन १९१६ सालात आणि आपल्या साळी समाजाचे हे प्रथम अधिवेशन आहे म्हणून चलो हुबळी ! चलो हुबळी !!


कै. खंडप्पा मातृभाई अण्णा
बंगलोर

हुबळी हे कर्नाटकातील मोठे गाव. जरीकाठी खणासाठी प्रसिद्ध !! साळी समाजाची बहुसंख्य कुटुंबे येथे हातमाग विणकामाचा व्यवसाय करतात. म्हणून येथेच आपल्या आदरणीय बुजूर्गांनी प्रथम अधिवेशन आयोजीत केले. पहा - आधिवेशनास महाराष्ट्र, कर्नाटक व आंध्र मधील आपल्या साळी समाजाची पगडी, पागोटीधारी बुजूर्ग मंडळी एकत्र आली आहेत. सर्व मंडळींचा पोशाख जवळ जवळ सारखाच आहे. डोक्याला रंगीत पागोटे, अंगात कसनीची बाराबंडी, आखुड धोतर व खांद्यावर जरीकाठी उपरणे !! यांनी सभास्थान भरून गेले आहे.

या प्रथम अधिवेशनाचे अध्यक्ष मानकरी आहेत. बेंगळूरचे श्री खंडप्पा मातृभाई अण्णा व स्वागताध्यक्ष आहेत हुबळीचे श्री मल्लप्पा गंगांधरप्पा दिवटे !! (दिनांक उपलब्ध नाही)

श्री. दिवटे आपल्या स्वागतापर भाषणात म्हणतात माझ्या समाजबंधुंनो आपले मुखदर्शन झाले आपण एकत्र आलात आनंद वाटला. आजचे अधिवेशन भरवणेची मुळ प्रेरणा अशी की, पंढरपूरचा कानडा विठ्ठलू ! बापू रखमा देवी वरू !! हे तर अ.हिंदू धर्माचे दैवत आहे. पंढरपूर नगरीत सर्व जाती पातीचे लोक दररोज दर्शनासाठी येतात. २/४ दिवस थांबतात म्हणून तेथे जाती निहाय अनेक धर्मशाळा होत आहे. तशीच एक धर्मशाळा आपल्या साळी समाजाचीपण असावी म्हणजे पंढरपूरला येणाऱ्या ज्ञाती बांधवांची निवासाची सुविधा तर होईलच परंतु परिचय वाढेल. एकमेकांचे मुख दर्शन

हार्दिक शुभेच्छा
**सौ. प्रमिला मधुकर वखारे**
**श्री. मधुकरराव फुलचंद वखारे**
(अध्यक्ष ठाणे जिल्हा स्वकुळ साळी समाज)
श्री समर्थकृपा, वाणी आळी, कुळगांव
बदलापुर ४२१ ५०३. टेलि.६९५८०२

**सौ. शैलजा सोमनाथ कासटकर**
**श्री. सोमनाथ रतिलाल कासटकर**
(संपादक स्वकुळ समाचार)
बी १०५, बिगोपार्क सोसायटी,
नांदिवली क्रॉस रोड, शांतीनगर,
डोंबिवली(पू) ४२१२०१ फोन-८८३७८२

होईल. एकत्र येण्याचे साधन उपलब्ध होईल. एकत्र आलो म्हणजे इतरही अंतर्गत विचार समाजातील ह्याच उद्देशाने बोलावले. हुबळीकरांच्या वतीने मी या नगरीत आपले स्वागत करतो !!

मा. खंडप्पाण्णा आपल्या भाषणात म्हणतात माझ्या समाज बंधुनो अन्न, वस्त्र, निवारा या माणसाच्या प्राथमिक व मूलभूत गरजा आहेत. शेतकरी अन्नधान्य मोठ्या प्रमाणावर पिकवतात म्हणून देशात तो एक क्रमांकाचा व्यवसाय व साळी समाज विविध वस्त्राची हातमागावर निमिर्ती करतो म्हणून तो देशातील क्रमांक दोनचा व्यवसाय आहे. वस्त्राचे ही अनेक प्रकार आहेत. सूती, रेशमी, जरीकाठी, नक्षी, वेलबुट्टी, रंगीबेरंगी, तलम, मऊ डारो, अनेक प्रकारचे स्त्री पुरूषांचे वस्त्र साळी बंधू आपल्या बोटांच्या किमयेने विणतात. **एक नूर आदमी दस नूर कपडा,** या म्हणीप्रमाणे शरीर सौंदर्यात भर टाकणारी किमया फार मोठी आहे. आपले मूळ पुरूष भगवान जिव्हेश्वर व त्यांच्या परिवाराने देवादिकांना वस्त्र पुरविले व आपण त्यांचेच वंशज मानवासाठी त्याची निमिर्ती करत आहोत. पैठणची पैठणी, बनारसी शालु हे वेलबुट्टीदार सनग तर स्त्रियांचा मोलाचा ठेवा आहे. प्रत्येक स्त्री आयुष्यात एक तरी भारी सनग प्राणापलीकडे जपतेच ते विणण्याची कला बंधुंनो आपलीच आहे. छोट्या आगपेटीत ९ वार मोठ्या वस्त्राची घडी सहज मावेल इतके तलम, पारदर्शक,बारीक वस्त्र विणण्याची कला आपल्या कारागीर साळीच्या बोटात आहे.

तर असा हा कारागीर साळी पुराणकाळात श्रेष्ठ वर्णाचा शुद्ध आचार विचार व आहारात पतीत झाला आहे. अनिष्ट रूढी परंपरेच्या जंजाळात अज्ञानामुळे फसलेला आहे. त्यातून तो बाहेर निघावा सुज्ञानी व्हावा याच उद्देशाने हे प्रथम अधिवेशन आज आपण भरविले आहे. पंढरपूरला साळी समाजाची धर्मशाळा बांधावी.काही अंतर्गत समस्यांचा विचार करावा. नव्या पिढीला काही दिशा दाखवावी. संघशक्ती वाढवावी. साळी समाजाचे सामजिक व सांस्कृतिक जीवन उज्वल करावे. त्यासाठी काही महत्त्वपूर्ण ठराव करावेत. म्हणून आज आपण एकत्र जमलो आहेत. जय जिव्हाजी !!

## या अधिवेशनात पुढील ठराव मंजुर झाले ते असे -

१) पंढरपूर येथे जागा मिळवून साळी समाजाची धर्मशाळा बांधावी.
२) काशी येथील भगवान जिव्हाजी महाराजांच्या मूळपिठा बद्दल विचारपूस करणे.

३) भगवान जिव्हाजी महाराजांचा जन्मउत्सव प्रतिगावी व्हावा.
४) ठिकठिकाणी स्वकुळ साळी समाजाचा गुरू नेमून घेणे.
५) श्री क्षेत्र ऐरणी येथील स्वामींचा पट्टाभिषेक व्हावा.
६) प्रत्येक साळी बंधुनी यज्ञोपवित धारण करावे.
७) दैविकांचे हासिल मासिल (लग्न देणे - घेणे) सर्व गावी सारखेच असावे.
८) दैविकीची रक्कम पंचमी सत्कर्माकडे खर्च करावी.
९) लग्नात अ - वाजवी खर्च कमी करणे.
१०) कोणीही कन्या विक्रय करू नये. माल घेऊ नये.
११) आपल्या मुलांना दुर्व्यसनापासून परावृत्त करावे.
१२) प्रत्येक गावी 'विद्याफंड योजना असावी. मुला मुलींना शिकवा.
१३) मुला मुलींचे अल्पवयात बालविवाह करू नका.
१४) समाजात ऐक्यमत वाढवावे, संघमुक्ती वाढवावी.

बंधुंनो पाहिलेत हे महत्त्वपूर्ण ठराव !! ठराव १ ते ६ धार्मिक आहेत. ठराव क्र. ६ आपली पूर्वश्रेष्ठता दर्शवितो तर ठराव क्र. ९ ची तर आजची आवश्यकता आहे. शंभर वर्षापूर्वीच्या स्वस्ताईच्या काळातही हा प्रश्न चर्चेचा बनला व आजही तो आहेच. लग्नात मोठेपणाचे अवडंबर, श्रीमंतीचा थाट, मानपानाचे स्तोम, अ - वाजवी, फिजूल खर्च काही जण करतात पण काळ बदलला आहे. जैन मारवाडी सारखा श्रीमंत समाजही आज सामुदायिक कमी खर्चाचे विवाह घडवून आणत आहे. मग आपण ह्या चांगल्या आदर्शाकडे का डोळेझाक करतो ? ठराव क्र. १२ शैक्षणिक जागृतीचे प्रतिक आहे. ठराव क्र.१४ संघशक्तीचे आवाहन आदरणीय बुजुर्गांनी केले आहे, की ज्याची आजही गरज आहे. बंधुंनो या ठरावावरून ८२ वर्षापूर्वीची आपली सामाजिक स्थिती लक्षात येते. बंधुंनो या पहिल्या-वहिल्या साळी समाजाच्या प्रथम अधिवेशनाचा हा वृतांत आपणास माहित होता काय ? असो. या पुढील दुसऱ्या अधिवेशनाला मी आपणास नेणार आहे मोणकालमुरू (कर्नाटक) या गावी !!

तरी तयारी असू द्या.
चलो मोणकालमुरूची !
पण सन १९१९ साली हं.
तो पर्यंत - जय जिव्हेश्वर !!

हार्दिक शुभेच्छा
**श्री. प्रभाकर गणेश साळी व परिवार**
डिव्हीजन्ल इंजिनियर टेलिफोन्स
**(D.E.T.)**
अलिबाग जि. रायगड

## हार्दिक शुभेच्छा

# श्री गणेश मंदिर ट्रस्ट रानवली

ता. श्रीवर्धन, जि. रायगड (महाराष्ट्र)
रजि.अे ११३० (रायगड)

आदरणीय समाज बंधुभगिंनींनो,
सप्रेम नमस्कार

## विनम्र आवाहान

## *श्री गणेश मंदिर जिर्णोद्धार व श्री जिव्हेश्वर हॉल*

आम्ही आमच्या रानवली गावात श्री गणेश मंदिराच्या नियोजित नूतन वास्तुच्या बांधकामास श्री गणरायाच्या प्रेरणेने सुरुवात केली आहे, तसेच श्री जिव्हेश्वर हॉलचे बांधकाम त्याबरोबरच होत आहे. मौजे रानवली हे महाराष्ट्रातील श्रीवर्धन तालुक्यातील एक लहानसे गाव असून त्याठिकाणी आपल्या स्वकुळ साळी समाजाची ३० घरे आहेत. येथे श्री गणेश मंदिर हे फक्त स्वकुळ साळी समाज बांधवांनी फार वर्षापूर्वी बांधलेले आहे. सदर मंदिराचे जिर्णोद्धार करण्याचे अति आवश्यक होते. साळी समाजाचे असे एकमेव गणेश मंदिर या परिसरात असल्यामुळे, आम्ही समाज बांधवांनी ही जिर्णोद्धाराची योजना तयार केली व आपल्या सहकार्याने, ती पूर्णत्वास नेण्याचे ठरविले आहे.

सदर योजनेसाठी मोठा खर्च असल्यामुळे आपल्या सहकार्याची आवश्यकता आहे. श्री जिव्हेश्वर हॉल हे या परिसरातील आपल्या समाजाचे एकमेव वास्तू उद्दिष्ट आम्ही पुर्ण करीत आहोत. सदरच्या बांधकामास सुरुवात झाली असून ते पूर्ण करण्याच्या दृष्टिने आम्ही समाज बांधवाना आग्रहाची विनंती करीत आहोत की सदर श्री गणेश मंदिर व जिव्हेश्वर हॉलचे बांधकामासाठी उदार हस्ते देणगी देऊन सहकार्य करावे.

आम्ही सोबत श्री गणेश मंदिराच्या जिर्णोद्धाराची रुपरेखा असलेली प्रत आपल्याकडे पाठवित आहोत, आपण आणि आपल्या समाज बांधवांस या कार्यासाठी निधी संकलन करण्यासाठी उद्युक्त करुन नियोजित मंदिरासाठी निधी उपलब्ध करुन मदत करण्याचे मी आपणा सर्वांना विनम्र आवाहन करीत आहे.

**जय गणेश!**

आपले नम्र,
ना. ज. वाऊळ
प्रमुख विश्वस्त

# अ. भा. साळी समाज (२ रे) अधिवेशन - मोणकालमुरू (कर्नाटक)

## इ. सन १९१९

आदरणीय बंधु - भगिनी व मातांनो सप्रेम नमस्कार! मागचे साळी समाजाचे प्रथम अधिवेशन सन १९१६ चे, नंतर ३ वर्षानी म्हणजे सन १९१९ साली कर्नाटकातील मोणकालमुरू येथे दुसरे अ. भा. अधिवेशन दि. २७ ते २९ डिसेंबर सन १९१९ रोजी संपन्न झाले.

या अधिवेशनाचे अध्यक्ष आहेत. अकोल्याचे श्री. गजानन गंगाराम शेरे (बी.ए.एल.डी.) व स्वागताध्यक्ष आहेत ईश्वराप्पा कांबळे !

"अधिवेशन विविध सामाजिक, रूढी परंपरा विषयावर चर्चा झाली व त्यातून खालील ठराव रत्ने बाहेर पडली ती अशी -"

१) साळी समाजाची वस्ती असलेल्या गावी पंच निवडले जावे.

२) समाजाची वैयक्तीक तक्रार - भांडण - कोणताही दावा पंचापुढे न्यावा व त्यांनी दिलेला न्याय दोन्ही पक्षांनी मान्य करावा.

३) आपला समाज संघटीत होण्यासाठी, गावोगावी वृत्त , मासिक सुरू करावे. त्यास "अर्थसहाय्याची योजना" करावी.

४) धार्मिक कार्यात असेव्य सेवन (मांस) पद्धत बंद करावी

५) योग्य वर शोधून कन्यादान करावे, पण कन्या विक्रय करू नये.

६) गावोगावी साळी कुटुंबियांचे खानेसुमारी करावी.

७) गरजू विणकर बांधवाच्या अर्थ सहाय्यासाठी पतपेढ्या काढाव्या.

८) समाजात काही समारंभ अनिष्ट रूढी - परंपरा चालू आहेत की ज्यामुळे पैशाचा अपव्यय होतो. समोरच्या पार्टीवर बोजा पडतो. तंटे बखेडे निर्माण होतात संबंध दुरावतात.

९) या सुधारणासाठी वर्गणी करून स्वकुळ साळी फंड निर्माण करावा व त्या फंड/पैशाचा योग्य ठिकाणी विनियोग करण्यासाठी एक मध्यवर्ती मंडळ नेमावे.

"बंधुंनो ! अशा ह्या महत्त्वपूर्ण ठरावावरून तत्कालीन सामाजिक स्थिती आपल्या लक्षात होते. त्या काळी पंचांना समाजात खूप महत्व होते. पाचामुखी

परमेश्वर या म्हणी प्रमाणे पंचांनी दिलेला निर्णय सर्वजण विना तक्रार मानीत. तो न्याय ही निपक्षपाती असे. आज मासिकाचे जे महत्त्व आहे. त्याची जाण ७० वर्षापूर्वीच आद्यपुर्वजांना झाली होती. साळी समाजाचे आजचे स्वकुळ समाचार व इतर मासिके अत्यंत मोलाचे सामाजिक कार्य करीत आहे. या बद्दल त्यांना धन्यवाद. ठरावक्र. (चार) पहा ! विचार करण्यासारखा आहे. इतर वेळी मांसाहार हा ज्याचा-त्याचा आवडीचा व वैयक्तीक प्रश्न आहे. पण आज ही देवकार्यात - नवरात्रातील देवीच्या चक्रपूजा - धार्मिक, पवित्र विधीत काही घराण्यात बोकड हिंसा केली जाते. मद्यपान प्रतिष्ठेचा प्रश्न बनतो व देवाच्या नावाखाली निराळीच मौजमजा केली जाते. कारण काय तर म्हणतात - मागचे पूर्वज तसेच करत आले. यात बदल केला तर दोवाचा कोप होईल ही भिती बाळगतात. केवढी ही अंधश्रद्धा आहे. सांगा बरे ! पुढील सर्वच ठराव विधायक व योग्य मार्गदर्शन करणारे आहेत. बंधुंनो ! या पुढे मी आपणास सन १९३८ च्या धर्मावरम् व एरंडोलच्या परिषदेत नेणार आहे आणि तो आपणापुढे ठेवण्याची संधी - स्वकुळ समाचाराचे नेत्रमणी - श्री. मधुकर वखारे-अध्यक्ष, श्री. सोमनाथ कासटकर-संपादक व त्यांचे संपादकीय मंडळ यांच्या सौजन्याने प्राप्त झाली आहे. म्हणून ते धन्यवादास पात्र आहेत. जय जिव्हेश्वर !!


हार्दिक शुभेच्छा

**श्री. आत्माराम शंकरराव शिंदे व परिवार**

कापुर बागेजवळ, नंदीमाळ जकात नाका,
पेण, जिल्हा - रायगड
फोन - ३४३५


*****

## ।। श्री स्वकुळ समाचार ।।

मना सज्जना सत्संगती धरावी । स्वकुळ समाचारशी नित्य मैत्री करावी।
या मासिकाचे नित्य वाचन करावे। जगी धन्य जीवन सर्वांचे करावे।
स्वकुळ समाचार मासिक हाती धरावे। सर्वकार्य करिता नित्य वाचीत जावे।।
स्वकुळ समाचारचा नित्य धरावा छंद। एक ओळ अनुभवा आनंदच आनंद।।
जयाचेनी संगे समाधान येते। स्वकुळ समाचार नित्य आम्हा घरी येते।।
वाचन करीता या मासिकाचे। घरा नित्य शांती आनंद नाचे।।
नव्हे सार संसार हा घोर आहे। स्वकुळ समाचारचा संदेश थोर आहे।।
जनी विषखाता पुढे सुख कैचे। नित्य करु वाचन या स्वकुळ समाचारचे।
भवाच्या भये काय भितोस प्राण्या। करु नको विलंबा श्री जिव्हेश्वर गाण्या।।
स्वकुळ समाचारचा हा संदेश थोर। निश्चिंत रहा तुम्ही बिन घोर।।

शब्दांकन - श्रीराम ताम्बे गुरुजी, दहिवली (रायगंड)

# तिसरी महापरिषद - ऐरणी क्षेत्र

## (इ. सन १९२२)

आदरणीय माता बंधु आणि भगिनी सप्रेम नमस्कार ! कल्पना करा हे आहे सन १९२२ चे साल मी तुम्हास ऐरणी क्षेत्राला नेत आहे. ऐरणी हे आपले स्वकुळ साळी समाजाचे एकमेव धर्मपीठ आहे. तेथे आपले धर्ममान्य, राजमान्य, व समाजमान्य जगत गुरू पीठ आहे. हे फारच थोड्या बंधुंना माहित असेल. म्हणून अधिवेशन निमित्ताने चलो ऐरणी ! प्रथम आपण आपल्या धर्मपिठास भेट देऊ ! जगद्गुरूंचे दर्शन घेऊया व मगच अधिवेशन मंडपात हजेरी लाऊया !

श्री श्रेत्र ऐरणी हे आंध्र प्रदेशातले, राणेबेन्नूर तालुक्यापासून १८ कि. मी. अंतरावर एक निसर्गरम्य गाव आहे. गावाजवळून तुंगभद्रा नदी वहाते आहे. पलीकडे निसर्गरम्य डोंगर उभे आहेत. आजूबाजूचा परिसर हिरव्यागार वृक्षराजींनी सजलेला आहे. अशा ठिकाणी नदीपासून थोड्याच अंतरावर होळे मठ आश्रम आहे. आश्रम परिसरात भव्य अशा ४-५ इमारती आहेत. जणू शांती निकेतनच । हेच आपले धर्मपीठ !

ह्या होळे मठाला नव्या शतकात जगन्नाथ पुरी शंकराचार्यांनी धर्मपीठ म्हणून मान्यता दिलेली आहे. म्हैसूर व आंध्रप्रदेश शासनाने पूर्वीच राजमान्यता देऊन. मठाची आर्थिक स्थिती भक्कम केली आहे. तसेच सन १९६८ साली अदोनीला भरलेल्या अ. भा. स्वकुळ साळी समाजाच्या महापरिषदेत होळे मठला साळी समाजाचे एकमेव धर्मपीठ व जगद्गुरू पीठ म्हणून मान्यता देण्यात आलेली आहे. अशा या धर्ममान्य, राजमान्य व समाजमान्य धर्मपीठाचे अधिपती म्हणून वंश परंपरेने केंदळे कुटुंबातील व्यक्ती विराजमान होतात, तेच आपले संपूर्ण समाजाचे जगद्गुरू होत.

होळे मठात जगद्गुरूंचे निवासस्थान गादी व यज्ञकुंड, वेदाभ्यास, शास्त्रोभ्यास, ध्यान धारणेसाठी एकांत सुविधा आहेत. शिष्यगुणांना निवासस्थाने आहेत.

मठात नियमित त्रिकालसंध्या, पूजा पाठ, वेद पठण प्रवचन आदी धार्मिक


हार्दिक शुभेच्छा

**श्री. राजेश शंकरराव साळी**

**सौ. सुनिता राजेश साळी**

सरलानगर, मानपाडा रोड,

डोंबिवली (पूर्व)

कार्यक्रम चालू असतात उत्सव - धर्मपिठाचा वार्षिक उत्सव चैत्र शुद्ध ९ पासून पौर्णिमेपर्यंत चालू असतो. उत्सवात भजन, प्रवचन, कीर्तन, आरती व महाप्रसाद (अन्नदान) चालू असते. शेवटी पौर्णिमेला जगद्गुरूंची शोभायात्रा निघते. त्यावेळी मिरवणूकीत राजबिरदावळ्या, पंचकलश, मकरतोरण, भगवाध्वज, श्वेतछत्री, पालखी, त्रिशूल, भालदार, चौपदार सजवलेले हत्ती, घोडे, नाना प्रकारची वाद्ये, भजनी मंडळे यांचा समावेश असतो. भगवान जिव्हेश्वरांचा व जगद्गुरूंना जयघोषांनी वातावरण दुमदमून जाते. भक्तीमय वतावरणात मिरवणूक मोठ्या मंडपात प्रवेश करते. जगद्गुरूंना मोठ्या सन्मानाने एका सुशोभित सिंहासनावर बसवले जाते. मंत्रांचाराने जगद्गुरूंची पादपूजा होते. हा पूजेचा सोहळा सर्व समुदाय शांतपणे बसून पाहतो. मंगलवाद्यांनी वातावरण भक्तीमय होते. न भूतो ना भविष्यती असा तो राजवैभवशाली पादपूजेचा तो देखावा बघून साऱ्यांची मने आनंदाने, भक्तीने, श्रद्धेने भरून येतात. नंतर रांगेने एकेक जण जाऊन जगद्गुरूंच्या पायावर माथा ठेऊन दर्शन व आशिर्वाद घेतात व या उत्सवाची सांगता होऊन प्रत्येक जण तृप्त मनाने घरी परततो तो पुढच्या वर्षी पुन्हा येण्याच्या प्रतिज्ञेने !

तर बंधुंनो असे हे आपल्या साळी समाजाचे जगातील एकमेव श्रद्धास्थान व धर्मपीठ आहे.

मग सांगा बरे - आपणास हे माहित होते काय ? बंधूंनो - कधीकाळी योगायोगाने आंध्र प्रदेशात भ्रमंतीचा योग आल्यास जरूर श्री क्षेत्रऐरणीला भेट द्या! आपल्या जगद्गुरू स्वामींचे दर्शन घेऊन कृतकृत व्हा !

मंडळी, चला आता अधिवेशन मंडपात हजर होऊ या व तेथील चाललेल्या कामकाजाची माहिती घेऊ या ! आपण श्रीक्षेत्र धर्मपीठ ऐरण होळेमठाला भेट दिली व धर्मगुरू स्वामींचे दर्शन व आर्शिवाद घेतला. तर आता चला अधिवेशन मंडपातील कामकाज पाहूया !!

ही साळी समाजाची महापरिषद भरली आहे. शके १८४४ वैशाख शुद्ध १४-१५ व सन आहे १९२२ ! महापरिषदेचे स्वागताध्यक्ष आहेत दावणगिरीचे श्री मल्हारराव कांबळे व अध्यक्षस्थानी विराजमान झाले आहेत हुबळीचे श्री. भिमप्पा गंगाधरप्पा दिवटे!

परिषदेत अनिष्टरूढी - परंपरा

**श्री. बारसु रामदास सिताफळे**
**व परिवार**

ऋतुव्रत, दिनदयाळ रोड,
डोंबिवली (पूर्व), जिल्हा - ठाणे

यावर सखोल चर्चा होऊन ठराव मंजूर झाले ते असे -

१) साळी समाजाची संघशक्ती वाढवावी.

२) समाजबंधुंनी आचार - विचारात आवश्यक फेरबदल करावेत.

३) बालविवाह करू नयेत.

४) किरकोळ कारणावरून नवऱ्याने बायकोस सोडचिठ्ठी देऊ नये.

५) विद्या प्रसारार्थ प्रांतवार आर्थिक फंड उभारावा.

बरं या बंधुंनो, याच वर्षी दि. १७ व १८ ऑगस्ट १९२२ रोजी अ. भा. महापरिषषद भरल्याची नोंद आढळते त्याचे स्थळ होते. महाराष्ट्रातील मीरज ! त्याचे अध्यक्ष होते अकोल्याचे श्री गजानन गंगाराम शेरे त्या परिषदेत झालेले ठराव असे -

१) प्रत्येक प्रांताने शिक्षण फंड वाढवावा.

२) साळी समाजाचे प्रांतवर मासिक सुरू करावे.

३) मोठ्या गावी, गरजूविणकर बांधवासाठी पतपेढी काढावी.

४) लग्नाच्या हक्काबद्दल वर पक्षाकडून पंचानी सव्वा दहा रूपये घ्यावेत. मात्र ते वाईट कृत्याकडे (दारू वगैरे) खर्च करू नयेत.

५) पालकाने वरपक्षाकडून मुलीचे पैसे (मक्ता) घेऊ नये.

६) क्षुल्लक कारणाने नवऱ्याने बायकोस सोडचिठ्ठी देऊ नये.

तर बंधुंनो, असे हे ठराव आपणास ७५ वर्षापुर्वीची सामाजिक स्थिती दर्शवितात. आदरणीय बुजुर्गांनी केलेले ठराव तसेच मीरज - ठराव क्र. १, २, ३ विधायक व दुरदर्शीपणाचे द्योतक आहेत. बालविवाह, मक्ता घेणे, फारकत घेऊन स्वस्त्रीला सोडून देणे, दारू पिणे आदी वाईट रूढींवर त्यांनी हल्ला चढविला आहे व समाज प्रबोधनाचा प्रयत्न केलेला दिसतो.

तर असो ! विद्यमान काळात आपण सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, रूढी, परंपरा, संघटन आदी बाबतीत डोळसपणे जागरूक होत आहोत. पण असेच पुढे जाता जाता - या सिंहावलोकनाचा लाभ घेत आहोत. त्यामुळे तुलनात्मक स्थिती देणार आहे. कृपया प्रसिद्धीसाठी त्यांनी सहकार्य करावे ही विनंती आहे. !

या पुढील ४ थी महापरिषद भरत आहे, कऱ्हाडला ! कृष्णाकाठी. तर बंधुंनो, चलो कऱ्हाडची तयारी करु या!

*****

हरि ॐ




# हार्दिक शुभेच्छा

**फर्म :**

# श्री सोमाभाई मोतीराम

## फॅन्सी कापडाचे व्यापारी

प्रकाशा, पिन - ४२५४२२ जि. नंदुरबार

फोन नं. : ०२५६५, ४०२६१, ४०३५१

# द्वारका एम्पोरियम

सुटींग, शर्टींग साड्या, ड्रेस मटेरियल

शहादा, पिन - ४२५४०९ जि. नंदुरबार

फोन नं. : ०२५६५, २३३६९

शुभचिंतक

श्री. सोमा मोतीराम साळी  श्री. रमेश सोमा साळी

श्री. सुदाम सोमा साळी  श्री. राजेन्द्र सोमा साळी

प्रकाशा जि. नदुंरबार

# अ. भा. ४ थी महापरिषद - कऱ्हाड

## (सन १९२४)

आदरणीय बंधु - भगिनी आणि मातांनो सप्रेम नमस्कार ! विद्यमान काळात आपण शैक्षणिक, आर्थिक प्रगती करत आहोत. समाज संघटन आदी बाबतीत जागरूक होत आहोत. अनिष्ट रूढी परंपरा डोळसपणे बदलत आहेत. असेच पुढे जाता जाता थोडे मागे वळून पाहू या ! थोडे सिंहावलोकन करू या ! त्यामुळे भूतकाळ व वर्तमानकाळातील तुलनात्मक स्थिती डोळ्यापुढे येईल. याच उद्देशाने गतकालीन समाज स्थितीचा आढावा आपण घेत आहोत.

बंधुनो, तसे पाहिले तर आपला साळी समाज हा पुरातन आहे व संपूर्ण भारतात विखुरलेला आहे. विशेषतः तो महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र, गुजराथ, म. प्रदेशात मोठ्या प्रमाणात आहे. सुमारे ८२ वर्षापूर्वी तो अ. भा. पातळीवर संघटीत झाला व समाज अंतर्गत समस्या सोडवण्याचा प्रयत्न तत्कालीन आदरणीय बुजूर्गांनी केला. त्याचा दाखला म्हणजे अ. भा. स्वकुळ साळी समाजाच्या शिखर परिषदा होत त्याकाळी आजच्या सारखे रस्ते, वहाने, रेडियो, टीव्ही, वर्तमानपत्रे आदी प्रसार साधने नव्हती. देशावर इंग्रजांचे राज्य विलायती कापड आयात होत होते. परंतु राष्ट्रपिता गांधीजींच्या स्वदेशी चळवळीमुळे त्यांचा चरखा व विणकर बंधुंचा धोटा बऱ्यापैकी चालू होता. अशा पार्श्वभूमीवर परिषदा झाल्या.

तर बंधुंनो, आजपर्यंत आपण १९१६ चे हुबळी, १९१९ मोणकालमुरू व १९२२ चे श्रीक्षेत्र ऐरणी येथील महापरिषदेचे सांद्यत अहवाल पहिले, आणि आता तुम्हास नेत आहे कऱ्हाड येथील सन १९२४ च्या चवथ्या परिषदेस ! तर चलो कऱ्हाड ! महाराष्ट्रात कृष्णा काठी, ही परिषद भरली दिनांक १० व ११ मे १९२४ रोजी ! अध्यक्ष आहेत. बागलकोटचे श्री. बाळकृष्ण गोविंद कलबुर्गी व स्वागताध्यक्ष आहेत माधवपुरचे श्री. धनप्पा नागप्पा गंथडे ! या परिषदेत विषयावर चर्चा होऊन खालील ठराव आदरणीय बुर्जुगांनी पास केले ते असे -

१) महापरिषदेत मंजुर झालेल्या ठरावाची अंमल बजावणी करण्यासाठी एक क्रियाशील कमिटी नेमावी.

हार्दिक शुभेच्छा

**श्री. जगदीश पी. वखारे**

*ॲडव्होकेट हायकोर्ट*

मंगलदिप सोसायटी,

मनिषानगर, कळवा, ठाणे.

२) ऐरणी मुक्कामी सुरू केलेला फंड इतर प्रांतातूनही गोळा करण्यात यावा.

३) पंढरपूर येथील गंगूबाई परळकरांची जागा व दिवटे यांची जागा या दोहोंची व्यवस्था लावण्याकरीता कमिटी नेमावी.

४) समाजबंधुंनी प्रत्येक गावाच्या म्युनिसिपालटीत साळी समाजाचा किमान एक सदस्य निवडून आणण्याचा प्रत्यन करावा.

५) श्री. सांगळे बंधु (नगर) यांचे आई - बाप मुळचे साळी असून ते खिश्चन झाले आहेत. त्यांना त्यांचे विनंती वरून पुन्हा साळी समाजात घेण्यात यावे अशी शिफारस ही महासभा करीत आहे.

पाहिलेत बंधुंनो - (चार) क्रमांकाचा ठराव राजकीय व सामाजिक जागृतीचे निदर्शक आहे तर (पाच) क्रमांकाचा ठराव चुकून धर्मांतर केलेल्या व पश्र्चाताप झालेल्या व्यक्तीला दिलासा देणारा आहे. व उदार अंतःकरणाचा आहे.

बंधुंनो, व्यक्ती व समाज यांचा संबंध मासा व पाण्यासारखा आहे. पाण्यात एखादा मासा असो - नसो, पाण्याचे काही अडत नाही परंतु मासा मात्र पाण्याशिवाय राहू शकत नाही. तशी व्यक्ती समाजाशिवाय अलग राहू शकत नाही. प्रत्येक व्यक्ती ही मातृ पितृ - ऋण, समाज - ऋण व राष्ट्र - ऋणाने जन्मतःच बद्ध आहे म्हणून प्रत्येकाने आपपल्या परीने ते फेडणे आपले कर्तव्य आहे !

सांगा बरे बंधुंनो, अ.भा. ४ थ्या महापरिषदेचा हा वृतांत आपणास माहित होता काय ? या पुढील पाचवी परिषद श्रीक्षेत्र आळंदी येथे भरत आहे. तरी तयारी असू द्या आळंदीला जायची ! कारण त्यानिमित्त

चला आळंदीला जाऊ !

ज्ञानदेव डोळा पाहू !!

आणि जयाचा अंगणी सोन्याचा पिंपळ !!

अशा संत ज्ञानेश्वर माऊलीच्या आळंदीला जायची संधी सोडू नका. तेथे पुढील लेखात मी तुम्हास नेणार आहे. मात्र सन १९२९ साली हं ! तो पर्यंत - जय जिव्हेश्वर !!

*****

हार्दिक शुभेच्छा
**श्री. मधुकर पुंडलीक साळी**
महाराष्ट्र हौसिंग बोर्ड, श्री गणेश को-ऑप. हौ. सोसायटी लि.,
बिल्डींग नं११, रूम नं१७०,
अंबरनाथ (प.) फोन - ६८४५४४

# अ. भा. ५ वी महापरिषद - श्री क्षेत्र आळंदी

## (सन १९२९)

आदरणीय बंधु - भगिनी आणि मातांनो सप्रेम नमस्कार ! अ. भा. साळी महापरिषद निमित्ताने आपण श्रीक्षेत्र आळंदीला आलो आहोत. पुण्याजवळ ही संत शिरोमणी ज्ञानेश्वर माऊलीची आळंदी ! भाविकांचे श्रद्धास्थान ! वारकऱ्यांचे प्रति पंढरपूर ! चला प्रथम इंद्रायणीत स्नान करू ! माऊलीचे समाधीचे दर्शन घेऊ ! ह्या सोनियाच्या पिंपळाला प्रदक्षिणा घालु या ! आतां कसे धन्य धन्य वाटते बघा ! चला आता अधिवेशन मंडपात ! मंडपाचे हे प्रवेशद्वार बघा ! एका बाजूस संत ज्ञानेश्वरांचे चित्र दुसऱ्या बाजुस भगवान जिव्हेश्वरांचे चित्र. मंडपास नाव दिले आहे. संत ज्ञानेश्वर नगर येथेच आपले स्वकुळ साळी समाजाचे महा अधिवेशन संपन्न होत आहे. आणि आजची तारीख आहे २७ व २८ नोव्हेंबर १९२९ !!

"अधिवेशनाचे कामकाज पाहण्यापूर्वी तत्कालीन राजकीय व सामजिक स्थिती लक्षात घेणे आवश्यक आहे. देशावर इंग्रजांचे राज्य आहे. त्यांच्या कुटील राजनितीमुळे परदेशी माल स्वस्त व स्वदेशी माल महाग, कारण परदेशी मालावर जकात सुट तर स्वदेशी मालावर कराचा बोजा. म्हणून तो महाग पडायचा परिणाम व्हायचा तोच झाला. स्थानिक उद्योगधंदे बसले त्यांच्या मालाला उठाव नाही म्हणून काम करणारे हजारो हात बेकार झाले. साळी समाजाच्या विणकाम हातमागावरही बेकारीचे सवाट आले. मात्र त्याचवेळी राष्ट्रपिता गांधीजींनी भारतीय जनतेला स्वदेशी व सत्याग्रहाचा मंत्र दिला. जनता मंत्राने भारली गेली. परदेशी कापडाच्या होळ्या पेटू लागल्या. परदेशी मालावर बहिष्कार पडू लागला. जनता (खादी) स्वदेशीच वापरू लागली आणि म्हणून हातमाग धंदा जीव धरून होता. विणकर बंधुंच्या हाताला काम व पोटाला भाकरी मिळत होती. अशा पार्श्वभूमीवर आपल्या समाजाचे हे अधिवेशन श्रीक्षेत्र आळंदीला भरले आहे.

आता अधिवेशन कामकाज पाहु या ! अधिवेशनाचे अध्यक्ष आहेत बेंगळूरचे श्री. विठ्ठलराव गंगाधरप्पा ढगे व स्वागताधध्यक्ष आहेत पुण्याचें श्री. रामचंद्र ग्यानुजी सांगळे ! अधिवेशनात पुढील विषयावर चर्चा होऊन ठराव संमत झाले ते असे

१) परिषदेची घटना तयार करण्यात यावी.

२) स्वकुळ साळी समाजाची आळंदी येथे धर्मशाळा बांधावी.

३) स्वकुळ साळी विजय मासिकाला आर्थिक मदत करण्यात यावी.कारण आर्थिक भक्कमता हा मासिकाचा पाया आहे.

४) व्हिटले कमिशन समोर साक्षी देण्याकरीता समिती नेमण्यात यावी.

५) सर्व समाज बंधुंनी मद्यपान बंदी पूर्णपणे मनोनिग्रहाने पाळावी.

६) विणकर धंद्याला उत्तेजन देण्यासाठी प्रत्येकाने (स्त्री पुरूषाने) स्वदेशी कापडच वापरावे

तर असे हे ठराव ! ठराव क्रं ५ पाहिलात ! किती महत्त्वपूर्ण व संसारिक जीवनांशी निगडीत आहे. त्याचे दुष्परिणाम सूज्ञ बंधुना सांगणे न लगे ! सांगा बरे, या ५ व्या महापरिषदेत हा वृतांत आपणास माहित होता काय ? तर असो.

आता या पुढील महापरिषद सन १९३८ सालची धर्मावरम व एरंडोल, जि. जळगावची ! ते पुढील लेखात !! तो पर्यंत जय जिव्हेश्वर !!

*****

*With Best Compliments from :*

# S. R. CONSTRUCTION

*PROP. RASHAD A. MUJAWAR*

**Govt. Registered Conractor**
**Civil Work, Telephone Cable Laying Works,**
**Gas Pipe Line Maintenance etc.**

**HEAD OFFICE :**
9-B, God Gift's Tower, Hill Road,
M.R. Chowk, Bandra (West), Mumbai - 400 050.

**BRANCH OFFICE :**
Guddi Apartment, Near L.I.C. Office,
Pen, Dist. Raigad, Phone : 53300.

# अ. भा. ६वी महापरिषद - धर्मावरम (आंध्र प्र.)

## (इ. सन १९३८)

आदरणीय बंधु, भगिनी व मातांनो सप्रेम नमस्कार ! बंधुंनो आजपर्यंत आपण स्वातंत्रपूर्वकाळातील,साळी समाजाचे सन १९१६ चे हुबळी, सन १९१९ चे मोणकालमुरू, सन १९२२ चे ऐरणी, सन १९२४ चे कऱ्हाड व सन१९२९ चे आळंदी येथील महापरिषदांना भेटी दिल्या. तेथील ठरावरूपी कामकाज समजावून घेतले. त्यामुळे तत्कालीन समाज स्थितीची कल्पना आपणास आली. तर चला आज मी आपणास धर्मावरम या आंध्र प्रदेशात भरलेल्या अ. भा. ६ व्या परिषदेस नेत आहे.

धर्मावरम येथे साळी समाजाची सुमारे बाराशे कुटुंबे विणकाम - हातमागाच्या व्यवसायावर अवलंबून आहेत. येथील प्रमुख मान्यवर व्यक्ती आहेत श्री. नरसप्पा, नागप्पा, ना. सपारे, नागोदि जिंदे, तिपय्या सरोदे, रामकृष्ण गायकवाड इत्यादी !! या काळातील राजकीय परिस्थिती अत्यंत अस्थिर आहे. कारण देशावर इंग्रजांचे जुलुमी दडपशाहिचे राज्य आहे. विलायती कापड भरपूर प्रमाणात आयात होत आहे. यांत्रिक मागही सुरू होत आहे. तशात दुसऱ्या महायुद्धाच्या ठिणग्या पडू लागल्याने जागतिक मंदीची लाटच आली आहे. त्यामुळे हातमाग धंद्यावर त्याचा परिणाम झाल्याशिवाय कसा राहिल ? बिचारा विणकर बंधु हतबल होत चालला आहे. राष्ट्रपिता गांधीजींच्या स्वदेशी तत्वामुळेच तो कसातरी जीव धरून आहे. तशात समाजात काही लोकजुन्या रूढी परंपरेला चिकटून आहेत. शिक्षणाने अशिक्षित आहेत. पुरूषवर्ग तर शुभप्रसंग असो व अशुभ प्रसंग असो प्रथम मद्यपान मग पुढिल समारंभ वा गोष्टी (अर्थात याला काही अपवाद होते.) पण रूढी परंपरेपुढे त्यांचे काही चालेना. त्यांचे म्हणणे रूढीप्रिय व्यक्तींना पटेना. असो, तर अशा राजकिय व सामाजिक पार्श्वभूमीवर समंजस पूर्वजांनी ही महापरिषद भरवली. ती धर्मावरम (आंध्र) येथे.

दिनांक १ ते ३ सप्टेंबर १९३८ रोजी महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र, म.प्र., गुजरात मधील समाजबांधव येथे उपस्थित झाले आहेत. अध्यक्ष आहेत अदोनीचे श्री अंबलढगे इरापाण्णा ! या परिषदेत खालील विषयांवर चर्चा होऊन ठराव मंजूर झाले ते असे -

हार्दिक शुभेच्छा
**श्री. प्रभाकर रामभाऊ धानके**
माजी अध्यक्ष - ठाणे स्वकुळ साळी समाज
ब्लॉक सी-७६/१५१, कुर्ला कॅम्प,
गुरुनानक हायस्कुलजवळ, उल्हासनगर - ४
फोन - ५२५८६२

(१) कोणत्याही प्रांतात लग्न - पसंती, बोलणी पक्की झालेनंतर स्थानिक पंच जी लग्न बाब घेतात ती सर्व गावी सारखी असावी. म्हणजे वरपक्ष वधुपक्ष एकाच गावचे असल्यास प्रत्येकाने पंचास ६।। रूपये द्यावे. एखादा पक्ष परगावाहून आला असल्यास त्याजकडून फक्त ४।। रूपये घ्यावेत

(२) धार्मिक व शुभाशुभ प्रसंगी सर्वांनी सात्विक आहार घ्यावा. असेव्य सेवनाची पद्धत अशा प्रसंगी तरी बंद करावी.

(३) मुलीचे वय लग्न करते वेळीशारदा बिलप्रमणे किमान १४ वर्षे तरी असावे माहेरी न्हाण आले शिवाय तिचे (ओटीभरण) झालेवरच सासरी पाठवावे.

(४) साळी समाजाचे मूळ निवासस्थान महाराष्ट्रातील मुंगी पैठण असल्याने- कालांतराने काही घराणी धंद्यासाठी इतर प्रांतात स्थायिक झाली. म्हणून त्यांची मूळ भाषा समाजात व घरात मराठीच असावी. (कारण स्थानिक भाषेचे संस्कार होणे स्वाभाविकच आहे. उदा. गुजरातमध्ये गुजराती, म.प्र. त हिंदी, आंध्र मध्ये तेलगू, कर्नाटकात कानडी).

(५) आपला साळी समाज पुराणकाळापासून भिवणीमध्ये (उच्चकुळात) समाविष्ट होत असल्याने साळी पुरूषाने गळ्यात यज्ञोपवित धारण करावे व मांसादी असेव्य आहाराचा त्याग करावा.

तर बंधुनो मी ठराव क्र २ कडे आपले लक्ष वेधू इच्छितो. अजूनही काही पुरूष मंडळी काही गावी ही प्रथा पाळत असल्याचे दिसते. काय तर म्हणे लग्न, साखरपूडा, देवकार्य आहे. मद्यपान, मांस सेवन करून आनंद साजरा केलाच पहिजे. किंवा दुःखद म्हणजे मयत प्रसंग एखाद्या घरी झाला तर तेथेही काही पुरूषबंधु मद्यपानाची बैठक ठोकतात. कारण काय तर म्हणे या दुःखी परिवारातील पुरूष मंडळींचा दुःखाचा परिहार या मुळे होतो. वारे वा दुःख सांत्वन करण्याची ही रीत!

हार्दिक शुभेच्छा
**श्री. भास्करराव बागडे**
ठाकूर्ली (पू.) फोन - 800336
श्री. अरूण बागडे, दुबई (U.A.E.)
श्री. दिलीप बागडे, पुणे.
फोन - ५८८०२९९
कु. युवराज बागडे, ठाकूर्ली (पू)

हार्दिक शुभेच्छा
**श्री. प्रभाकर महादेव मते**
**व परिवार**
मोरे बंगला, हिंदू कॉलनी
नौपाडा, ठाणे (प.)
फोन - ५४१ ४४१८

विपरित नाही का ? प्रसंग दुःखद असल्याने घरातील स्त्रीया शोकमग्न असतात. सर्वजण रडत असतात. पण काही पुरूष असा दुःख परिहार करतात. ( अर्थात याला अनेकसूज्ञ मंडळी अपवाद आहेत.) याच ठरावात सूज्ञ पूर्वजांनी शुभ धार्मिक प्रसंगी असेव्य (मांस) भक्षण करू नये असे सूचित केले आहे. याबाबतीत माझे वैयक्तित मत असे की - त्यांचे म्हणणे बरोबर आहे. कारण आपल्या काही साळी घराण्यात देवकार्य. जावळ वा नवरात्रातील मंगल पवित्र देवीच्या चक्रपूजा विधीत बोकडाचा बळी दिला जातो. त्या मंगलमय दिवसात मांस हा प्रसाद आहे म्हणून तो ग्रहण केला जातो. काही उपवास करणाऱ्या स्त्री - पुरूषांना धार्मिक पवित्र कार्यात ही गोष्ट मनाला पटत नाही. खटकते कोणी विरोध केला तर आपले रूढी प्रिय नातेवाईक म्हणतात आपले पूर्वज असेच करीत आले आहेत देवीपुढे बळी द्यावाच लागतो. तसे केले नाही तर देवीचा कोप होईल. संसारात संकटे अडचणी दुःख निर्माण होईल. वा रे वा ! केवढी ही अंधश्रद्धा आहे. इतर वेळी घरोघरी मांसाहार करणे हा ज्याचा त्याचा वैयक्तीत प्रश्न आहे. वैयक्तिक आवडीची बाब आहे. पण अशा सामुदायिक नवरात्रासारख्या मंगलमय, पवित्र, धार्मिक दिवसात ही रूढी परंपरा मनाला खटकते. स्त्री - वर्गाला तर ती रूढी मनाला क्लेश देते. याचे प्रत्येकाने आत्मपरिक्षण करावे असो तर बंधुंनो यावर अवश्य विचार करा, प्रसाद करा पण त्यातून ह्या हिंसेच्या विधीला बंद करा. ही निव्वळ अंधश्रद्धेवर आधारीत रूढी आहे. हे माझे वैयक्तिक मत मी मांडले आहे. नवरात्रात काही साळी बंधुंच्या कुटुंबात अष्टमीला देवीची चक्रपूजा नावाचा धार्मिक पवित्र उत्सव करतात. उत्सवाला गोत्रज परिवार, आतेष्ट, भाऊबंद, सोयरेधायरे, नातेवाईक इ. ना आमंत्रित करतात. कुलस्वामिनी देवी जगदंबेच्या नावाने हा उत्सव असतो. सगळीकडे वातावरण त्यावेळी भक्तीमय, आनंददायी व धार्मिक स्वरूपाचे असते. अनेक स्त्री - पुरूषांचे तर उपवासाचे नियम असतात आणि अशा मंगलमय वातावरणात देवीपुढे हिंसा/मटनाचा प्रसाद ही विसंगत बाब आहे. केवळ अंधश्रद्धेमुळे हे चालू आहे. "पिछेसे आई आगे धकाई" असा हा प्रकार आहे. तसे केले नाही तर देवीची अवकृपा होईल हा भ्रम आहे. निव्वळ भीतीपोटी ही परंपरा चालू आहे. बंधुंनो आपल्या धार्मिक भावना यामुळे दुःखावत असतील तर मी आपली क्षमा मागतो. पण ज्यांना माझे विचार पटत असतील त्यांनी उत्सव जरूर करावा पण गोड प्रसाद करून

या अंधश्रद्धेला पायबंद घालावा व नव्या पिढीपुढे नवा पायंडा (विधायक आदर्श) घालावा. जुन्या रूढीप्रिय व्यक्तिंच्या विरोधाला जुमानू नका. असो, बंधुंनो देवी जगदंबाच सर्वांना सद्बुद्धि देवो ही प्रार्थना !

बंधुंनो त्याचवर्षी म्हणजे सन १९३८ साली पौष वद्य १ सोमवार दिनांक १७/१/३८ रोजी जळगांव जिल्ह्यातील एरंडोल गावी समाजाची प्रांतिक परिषद भरल्याची नोंद आढळते. हे एरंडोल म्हणजेच पौराणिक काळातील एकचक्र नगरी होय. त्या नगरीत पांडवांचा काही दिवस निवास होता. त्यावेळी त्या परिसरात त्रास देणाऱ्या व खादाड बकासूर नावाच्या राक्षसास भिमाने ठार केले व भयमुक्त केले. याच गावाजवळ पद्मालय नावाचे श्री गणेशाचे जागृत देवस्थान आहे. आणि ठाणे जिल्हा स्वकुळ साळी समाजाचे माजी अध्यक्ष व स्वकुळ साळी समाचारचे संपादक श्री. सोमनाथ कासटकर यांचे पण मूळ गाव हेच एरंडोल होय. या ठिकाणी समाजाचे एक भव्य मंदिर देवस्थान आहे. विठ्ठल रखुमाई, श्री जिव्हेश्वर, भगवान शंकराची पिंड, मारुतीचे मंदिर, बसण्याची आसन व्यवस्था, पटांगण व विहिर असे सर्व सोयींनी युक्त असे फारच सुंदर असे समाजाचे मंदिर आहे. याच मंदिरात ही महापरिषद भरत आहे. परिषदेचे अध्यक्ष होते श्री. सदाशिव गोविंद फलटणकर. परिषदेत ठराव झाला तो असा - लग्न ठरल्यानंतर दोन्ही पक्षांनी देणे-घेणे बद्दल योग्य आर्थिक परिस्थितीनुसार ठराव करावा. मोठा आर्थिक भार परस्परावर टाकू नये. याच एरंडोलला दि. १/३/९८ विभागीय मेळावा झाला. आपल्या समाजातील सर्व पोटशाखांचे विलीनीकरण करण्याचा व गंधयुक्तीच्या वेळी टॉवेल टोपी न देण्याचा महत्त्वपूर्ण ठरावही झाले. या सभेसाठी तत्कालीन ठाणे जिल्हा अध्यक्ष श्री. सोमनाथ कासटकर, अखिल भारतीय स्वकुळ साळी समाज प्रधानकार्यदर्शी श्री. दत्ता सो. भंडारे, विभागीय अध्यक्ष श्री. वसंतराव वाव्हळ प्रमुख पाहूणे म्हणून उपस्थित होते. त्याचा तपशीलवार वृतांत आपण मार्च ९८ च्या अंकात वाचलाच !

तर असो ! बंधुंनो, आता आपली भेट तब्बल २४ वर्षांनी होणार आहे. पुढील लेखात ! हुबळी येथे भरणाऱ्या सन १९६२ सालच्या अधिवेशनात ! तो पर्यंत - जय जिव्हेश्वर !

हार्दिक शुभेच्छा
**श्री. शरद शंकरराव आकडकर**
माजी अध्यक्ष- स्वकुळ साळी समाज, कल्याण
सहकार्यवाह-ठाणे जिल्हा स्वकुळ साळी समाज
१०१, पुजा टॉवर, पहिला मजला,
डॉ. तेलवणे हॉस्पिटलसमोर,
आग्रा रोड (प.) फोन-३१५४४९

*****

# अ. भा. ७ वे अधिवेशन - हुबळी
## (इ. स. १९६२)

माननीय बंधु व मातांनो सप्रेम नमस्कार ! तब्बल २४ वर्षानी आपली ही भेट होत आहे. सन १९३७ नंतर सन १९६२ साली हुबळी येथे अ.भा. साळी समाजाचे हे ७ वे महाअधिवेशन भरत आहे. मधल्या २४ वर्षाच्या अनेक राजकिय, सामाजिक उलथापालथी झाल्या आहेत. देशाला स्वातंत्र्य मिळाले आहे. यंत्रमागांनी भारतात प्रवेश केला आहे. कापडाच्या मिल्स निघाल्या आहेत त्यामुळे हातमाग धंद्याला उतरती कळा लागली आहे. धावणाऱ्या धोट्याची गती मंदावली आहे त्यामुळे विणकर कुटुंबाची दैनावस्था झाली आहे. हाताला काम नाही, दुसऱ्या धंद्याचे ज्ञान नाही, जवळ भांडवल नाही. त्यामुळे गावोगावी साळी कुटुंबे हवालदिल झाली आहेत. पोटाला दोन वेळची भाकरी मिळणे दुरापास्त झाले आहे आणि मग पोटासाठी मूळ भूमी, मूळ गांव, घरेदारे सोडून कामधंदा शोधण्यासाठी साळी कुटुंबे स्थलांतर करू लागली आहेत. कुणी गुजरातकडे, कुणी इंदूरकडे, कुणी शहरात जेथे जे काम मिळेल तेथे स्थिरावू लागले आहेत. कुणी मजुरी, नोकरी, धंदा करून उपजिवीकेची साधने शोधून काढली आहेत व पोटापाण्याला लागले आहेत.

आशा पार्श्वभूमीवर कर्नाटकातील काही समाजधुरीणांनी महाअधिवेशन भरवण्यासाठी पुढाकार घेतला कारण मधल्या काळात श्रीक्षेत्र पंढरपूर येथे धर्मशाळेचे काम पूर्ण झाले आहे. पांडुरंगाच्या दर्शनाला येणाऱ्या साळी समाज बांधवांच्या निवासाची सोय झाली आहे. त्यानिमित्त तेथे गाठीभेटी, मुखदर्शन, परिचय तर होत आहेच परंतु समाजाची उन्नती करून घ्यावयाची असेल तर सर्व साळी बांधवांनी एकाच ठिकाणी एकत्र येणे व विचार विनिमय करणे गरजेचे आहे अ.भा. महाअधिवेशन भरवणे हेच प्रमुख साधन आहे हे जाणून स्वकुळ रत्न (श्री. डी. एल. चिल्लाळ, वकील (बागलकोट) यांच्या अध्यक्षत्खाली अ. भा. समितीचे गठन करण्यात आले व त्याचे सहकारी समाजभूषण श्री. जी. आर. भंडारे, श्री. टी. टी. दिवटे, श्री. रा. वि. एकबोटे, श्री. कृष्णप्पा भंडारे, पंढरपूर धर्मशाळेचे प्रमुख श्री. कृष्णप्पा आण्णा सपारे आदिंनी सर्व प्रांतात फिरून, समाज बांधवांच्या सभा घेऊन महाअधिवेशन करण्यासाठी प्रचार दौरा केला. सर्वांचा पाठिंबा मिळवला व हुबळी येथे अ. भा. साळी समाजाचे अधिवेशन भरवण्याचे निश्चित झाले. त्यासाठी ऐरणी क्षेत्राचे मठाधीश प.पू. स्वामींचा आशिर्वाद मिळाला.

तर बंधुंनो - चलो हुबळी, चलो हुबळी ! आपणही त्या अधिवेशनास हजर राहून तेथील कामकाज पाहूया ! परिषदेचे अध्यक्षस्थान भूषविले आहे - स्वातंत्र सेनानी, स्वकुळरत्न, नारायणपेठचे, श्री. रामचंद्र बी. कल्याणी एम. एल. ए (आंध्र) परिषदेचे स्वागताध्यक्ष आहेत पंढरपूर धर्मशाळेचे प्रमुख वंदनीय पितामह श्री. कृष्णप्पा अण्णा सपारे ! या अधिवेशनात पुढील ठराव मंजूर झाले ते असे -

(१) भगवान श्री जिव्हेश्वर चरित्र संशोधनासाठी व सुधारित चरित्र ग्रंथ प्रकाशित करण्यात यावा. तसेच आराधनेसाठी एकाच नमुन्याचे भावचित्र निर्मिण्यात यावे. त्यासाठी एक समिती नेमण्यात यावी.

(२) श्रीक्षेत्र ऐरणी येथील प.पू मुप्पीनार्य स्वामींचे चरित्र प्रकाशित करणे.

(३) अ. भा. साळी समाजाचे धर्मपीठ व धर्मगुरू निश्चित करणेसाठी ७ जणांची एक अभ्यास समिती नेमण्यात यावी. त्यांनी भारतातील असतील त्या पीठांचा अभ्यास व परिशिलन करून धर्मपीठ निश्चित करावे. वरील तीनही ठरावांची मंजुरी पुढील अधिवेशनात व्हावी.

(४) प्रत्येक प्रांतात समाजाचे मासिक असावे. त्याशिवाय समाज जागृती व उन्नती नाही. महाराष्ट्रात जय जिव्हेश्वर कानडीत स्वकुळ त्रैमासिक चालू आहे. मासिक चालविणेसाठी भक्कम द्रव्य सहाय्य तर हवेच. सदर काम क्लिष्ट, त्रासाचे व भरपूर परिश्रमाचे आहे. संपादक श्री. अ. श्री. घुबे (गुरूजी) व स्वकुळ संपादकांना ही परिषद धन्यवाद देत आहे. वर्गणीदारांनी उदारपणे मासिकासाठी देणग्या द्याव्यात.

(५) गावोगावी सामाजिक ऐक्य वाढवावे. स्वप्रतिष्ठेसाठी काही अहंमन्य व्यक्ती समाजात गट - तट निर्माण करतात. अशांना समाजाने दूर ठेवावे.

(६) आजची मुले ही समाज संपत्ती आहेत . ते समाजाचे भावी घटक आहेत. त्यांच्यावर पालकांनी शिक्षण, व्यवसाय, प्रपंचाबरोबर धार्मिक सुसंकार करावेत व सामाजिक बांधिलकीची जाण करून द्यावी.

७) महिला या समाजाचे अर्धे अंग आहेत. त्या दुबळे राहून समाजोन्नती अशक्य आहे. त्याना सन्मानाने वागवा. सामाजिक कार्यात त्यांचा सहभाग वाढवा. भावी पिढी सुस्कांरित करण्याचे मौलिक कार्य स्त्रीयाच अधिक करतील म्हणून त्या शक्तिशाली घटकाकडे दुर्लक्ष करू नका.

(८) समाजतील सर्व पोटशाखांचे मूळ स्वकुळ मध्ये विलीनीकरण करण्यासाठी बांगड, टिकले, आहेर, आदि सर्वांना निमंत्रीत केले होते. परंतु तेथे फक्त शुद्ध (सूत) व पटलेगार साळीच उपस्थित असल्याने त्यांचेच विलीनिकरण करण्यात येत आहे. त्यांनी बेटी व्यवहार करून रक्तसंबंध वाढवावेत. इतरांचा विषय पुढील अधिवेशनात पुन्हा घेऊ !

(९) स्वकुळ साळी स्त्री - पुरूष कोणत्याही कारणाने बहीष्कृत असल्यास त्याने विनंती केल्यास (फक्त त्यास मात्र) पुन्हा स्थानिक समाजाने उदार मनाने समाजात समाविष्ट करून घ्यावे.

(१०) प्रत्येक गावी स्थानिक विद्या फंड तर असावाच तसेच प्रांतनिहाय विद्याफंड संस्था असावी व केंद्रिय विद्या फंड संस्था पण असावी वरील फंडास श्रीमंत - उदार समाज बांधवांनी सक्रिय यथाशक्ती आर्थिक मदत करावी.

(११) लग्न - मंगलकार्यात रितीरिवाज सर्व प्रांतात सारखे असावेत. त्यात एकसूत्रता आणावी. समाजातील निरर्थक व अनिष्ट व खर्चिक रूढी परंपरेने चालत आलेले चालीरिती बदलाव्या. तर बंधुंनो असे ठराव किती महत्त्वपूर्ण आहेत. ठराव क्र ४,५,६,७,८,९ सर्वच महत्त्वाचे व समाज प्रबोधनाचे आहेत. ठराव क्र. ८ तर आजही स्वागतार्ह आहे. ठराल क्र. ९ काही मजबुरीने बहीष्कृत झालेल्या व पाश्चाताप दग्ध व्यक्तिंना दिलासा देणारा आहे. कारण समाज हा आई सारखा उदार आहे. चुकलेल्यांना प्रसंगी शिक्षाही करतो व तसेच मायेने जवळही घेतो हेच यावरून दिसून येते.

तर सांगा बरे या अधिवेशनाचा हा वृतांत आपणास माहिती होता काय ? असो. आता पुढील महाअधिवेशन सन १९६८ साली अदोनी (आंध्र प्र.) भरत आहे. तेथे मी आपणास नेणार आहे. तरी तयारी असू द्या अदोनीची ! अत्यंत भावस्पर्शी असणाऱ्या ह्या अधिवेशनास येण्याची संधी सोडू नका कारण आपले जगत्गुरू ऐरणी धर्मपीठाचे पीठाधीश प.पू. मुप्पीनार्य महास्वामीजी स्वतः तेथे उपस्थित राहणार आहेत तरी आपण दर्शनाची आशीर्वादाची सुवर्णसंधी सोडू नका. ही संधी पुन्हा येणार नाही तरी हा अलभ्य लाभ सर्वांनी घ्यावा म्हणून आपणा सर्वांना हे आग्रहाचे आमंत्रण! पुढील लेखाचे आकर्षण ! जगद्‌गुरू स्वामींचे दर्शन !! तो पर्यंत - जय जिव्हेश्वर !!

*****

*With Best Compliments From*

**PRAVIN JAYADEVKAR**

B.E. (Mech.)

# NOBLE ENTERPRISES



**MANUFACTURING & MAINTENANCE OF**

**Rollers, V - Pulleys, Pump & Compressor Spares, Gear Box, Motor Rotor Shafts, Flanges etc.**

**SPECIALIST IN**

**Machining & Fabrication**

Plot No.111 / 1, Sector - 23
CLDCO Service Industrial Area,
Turbhe, NAVI MUMBAI - 400 075
PH - (O) 7684602, (R) 5517309

# अ.भा. ८ वे अधिवेशन - अदोनी (आंध्र प्रदेश)

## (सन १९६८)

आदरणीय बंधु - भगिनी व मातांनो, सप्रेम नमस्कार ! हे आहे १९६८ साल. चला, आज मी आपणास अखिल भारतीय साळी समाजाच्या महाअधिवेशनासाठी अदोनीला नेत आहे. तर बंधुंनो, चलो अदोनी ! अदोनी हे आंध्र प्रदेशातील साळी - विणकर कुटुंबाचे सर्वात मोठे गाव आहे. येथेच दि.२९,३०,३१ मे व १ जून १९६८ रोजी हे अधिवेशन संपन्न होत आहे. या अधिवेशनाचे अध्यक्ष आहेत सोलापूरचे श्री. गुरूनाथराव रामचंद्रजी चिल्लाळ, सहअध्यक्ष आहेत प्रा.डॉ.रा.अ. कडीयाळ आणि स्वागताध्यक्ष आहेत श्री. दानप्पा सरोदे !

या अधिवेशनाचे वैशिष्टय असे की, अनेक मान्यवर व्यक्ति येथे उपस्थित आहेत. त्यात श्री क्षेत्र ऐरणीचे प.पू मुप्पीनार्य स्वामी, हरिद्वारचे प.पू. गणेशानंद स्वामीजी, स्वकुळरत्न व अ.भा. क्रिया समितीचे अध्यक्ष श्री. डी. एल. चिल्लाळ, श्री. रामचंद्रराव कल्याणी, आंध्रचे सभापती श्री. बी. व्ही.सुब्बारेड्डी तसेच सर्व प्रांतातील प्रतिनिधींनी आपली हजेरी लावली आहे.

चला तर मग आज आहे २९ मे ! ती पहा आपले जगद्‌गुरू प.पू मुप्पीनार्य महास्वामीजींची भव्य शोभा यात्रा निघाली आहे. स्वामीजी आडव्या पालखीत बसलेले आहे. पुढे छत्र - चामरे, वाजंत्री, लेझीम, भालदार, चोपदार, ध्वजपताका यांनी या मिरवणूकीची शोभा द्विगुणीत केली आहे. गावातून कमानी - पताका, सडा - संमार्जन, रांगोळ्यांनी रस्ते सुशोभित केले आहेत. घरोघरच्या सुवासिनी स्वामींना ओवाळत आहेत. भगवान श्री जिव्हेश्वर महाराज की जय, स्वामी मुप्पीनार्य महाराज की जय, या नामघोषांनी वातावरण दुमदुमून गेले आहे. सुमारे २५ हजार बंधु शोभायात्रेत सामील झाले आहेत. हा भक्तिमय सोहळा पाहून सर्वांची मने आनंदाने उचंबळून येत आहेत. बंधूनो, चित्रपटात आपण राजे - महाराजांच्या मिरवणूका पाहतो . परंतु प्रत्यक्षातील ही मिरवमूक पाहून डोळ्यांचे पारणे फिटले आह. सर्वजण स्वतःला धन्य धन्य समजत आहेत . तर बंधुंनो चला तर आपणही पालखीजवळ जाऊन स्वामींच्या चरणावर मस्तक ठेवून धन्य धन्य होऊया. हा

हार्दिक शुभेच्छा
**श्री. भालचंद्र नेमीचंद साळी**
बी-१०५, न्यु यशोप्रभा, मिलाप
सोसायटी मागे, नांदिवली रोड,
डोंबिवली (पूर्व), जि. ठाणे.
फोन - ८८०४३३

दर्शनाचा अपूर्व व अलभ्य लाभ आपण ही घेऊया.

मिरवणूक आता सभा मंडपात आली आहे. मान्यवरांनी स्वामीजींना व्यासपीठावरील सिंहासनावर बसवले आहे.अ. भा. क्रिया समितीचे अध्यक्ष श्री. डी. एल. चिल्लाळ यांनी स्वामीजींची पादपूजा करून पुष्पमाला अर्पण केली आहे. व्यासपीठावरील सर्वच मान्यवरांनी स्वामींना मालार्पण करून आशिर्वाद घेतला आहे. सर्व जनसागर हा भक्तिमय सोहळा शांत बसून डोळे भरून पाहत आहे.

या स्वागतानंतर ते पहा आता स्वतः प.पू.मुप्पीनार्य स्वामीजी उभे राहीले. आपल्या आशिर्वादपर संदेशात ते म्हणतात. समस्त समाज बंधु आणि भगिनींनो, परमेश्वर कृपेने सर्वांना आयुरारोग्य लाभो ! सर्वांना सौख्य प्राप्त होवो ! प्रपंच व परमार्थात सर्वांना यश लाभो ! आपली ही परिषद संपन्न होवो ! आपली संघटना वाढो ! समाज प्रगतीकडे वाटचाल करो ! तुम्हा सर्वांच्या योजना इशकृपने यशस्वी होवो ! सर्व कार्याला यश लाभो ! हा माझा आपणास शुभाशिर्वाद आहे.

हरिद्वारचे प.पू. गणेशानंदजी स्वामी म्हणतात - माझ्या समाज बंधुंनो - यापरिषदेचे निरगेजन व आपली एकी पाहून मला आनंद होत आहे. अशीच संघटना गावोगावी होऊन आपली शक्ती वाढवा ! व त्याद्वारे आपले प्रश्न सोडवा. हाताची बोटे लहान मोठी असली तरी कार्य साधण्यास सर्वांची आवशक्यता भासते. तरी सर्वांनी पोटभेद - मतभेद विसरून एकी ठेवावी. समाजाने माझेसाठी काय केले ? या विचाराऐवजी मी समाजकार्याला किती वेळ दिला ? किती श्रम केले ? किती उपकृत गोष्टी केल्या ? हा विचार प्रत्येकाने श्री जिव्हेश्वर जयंतीला करावा.

आत्मपरिक्षण करावे व सामाजिक कार्यात आपला खारीचा वाटा म्हणून शक्य असेल ते योगदान करा ! हाच माझा या प्रसंगी, शुभसंदेश आहे. तसेच बदलत्या काळाप्रमाणे आपल्या धंद्यातही सुधारणा करा. हातमागापेक्षा यांत्रिक तंत्र - मंत्राचा स्वीकार करा. समाजात शैक्षणिक क्षेत्र बलशाली करा ! मुले आणि महिला यांना सबळ करा. शासनाकडे पदर पसरण्यापेक्षा स्वाभीमानी व स्वावलंबी बना ! ईशकृपेने सर्व सुखी होवोत ! संपन्न होवोत ! समाजउन्नती होवो ! हा माझा शुभाशिर्वाद आहे, जय जिव्हेश्वर !!

नंतर स्वागताध्यक्षांनी सर्वांचे स्वागत केले. सर्व व्यासपीठावरील मान्यवरांना पुष्पमाला अर्पण करण्यात आली. नंतर अधिवेशनास आलेले शुभसंदेश त्यांनी वाचून दाखवले. त्या व्यक्तींची नांवे अशी

हार्दिक शुभेच्छा
**श्री. नागेश दत्तात्रय कांबळे**
५२१, अलंकार, साई सेक्शन,
अंबरनाथ (पूर्व)
फोन - ६०१ ५६३

१) राष्ट्रपती - डॉ. झाकीर हुसेन, २) पंतप्रधान - श्रीमती इंदिरा गांधी, ३) आंध्रचे मुख्यमंत्री श्री. ब्रम्हानंद रेड्डी, ४) सहकारमंत्री - श्री. विजय भा. रेड्डी, ५) महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री. बाळासाहेब देसाई. त्यानंतर भगवान श्री जिव्हेश्वर व प.पू. मूप्पीनार्य स्वामीजींचे भावचित्र निर्माते चित्रकार श्री. सपारे बेधु (सोलापूर) यांचा स्वामीचींच्या हस्ते शाल, श्रीफळ व मालार्पण करून सत्कार करण्यात आला व आजचा हा कार्यक्रम संपला . चला आता मुक्कामावर!

चला आज ३० मे ! सर्वजण सभा मंडपात स्थानापन्न जाले. अधिवेशनाचे रीतसर उद्घाटन स्वकुळ रत्न श्री. रामचंद्रराव कल्याणी यांचे हस्ते झाले आहे व नियोजित अध्यक्ष श्री. गुरूनाथराव चिल्लाळ स्थानापन्न झाले आहेत. नंतर आंध्रचे सभापती श्री. बी. व्हि. सुब्बाराव यांचे शुभ हस्ते भगवान जिव्हेश्वर व प.पू. मुप्पीनार्य स्वामींच्या भावचित्रांचे व चरित्रग्रंथाचे अनावरण करण्यातआले. नंतर अ. भा. क्रिया समितीच्या अध्यक्षांनी गेल्या ५ वर्षात म्हणजे १९६२ ते १९६८ मध्ये क्रियासमितीने केलेल्या कार्याचा आढावा सभेपुढे तपशीलावर निवेदन केला. तद्नंतर परिषद अध्यक्ष श्री. चिल्लाळ यांनी आपले धर्मपीठ, धर्मगुरू नियतकालीकेचे (मासिकाचे महत्त्व), पोटजाती विलीनीकरण, उद्योग - व्यवसाय समस्या, शैक्षणिक उठाव, समाजातील योग्य - अयोग्य चालीरिती आदी गोष्टींवर समग्र प्रकाश टाकणारे मार्गदर्शनपर भाषण केले.

दिनांक ३१ मे - आज सर्व मान्यवर व्यसपिठावर स्थानापन्न झाले पुढील विषयावर संगोपांग चर्चा होऊन ठराव मंजूर झाले ते असे -

१) कर्नाटकातील राणेबेन्नूर तालुक्यातील श्री क्षेत्रऐरणी हेच आपल्या अ.भा.स्व.साळी समाजाचे धर्मपीठ म्हणून ही परिषद एकमताने मान्यता देत आहे. तसेच तेथील पिठाधिश मूळचे मुंगीपैठणचे केंदळे घराण्यातील, वंशपरंपरेने चालत आलेले व पुढे होणाऱ्या महात्म्यांना ही परिषद धर्मगुरू म्हणून मान्यता देत आहे कारण ह्या पीठास श्रृंगेरी शंकराचार्यांनी धर्ममान्यता देऊन बिरूदावल्या अर्पण केल्या आहेत म्हैसूर व आंध्रने पण राजपत्रित मान्यता दिली आहे. विद्यमान प.पू मुप्पीनाचार्य हे आपले धर्मगुरू आहेत (या धर्मसंस्थानाची माहिती स्वकुळ समाचार नोव्हेंबर ९७ च्या अंकात पहा) या विषयावरील चर्चेत महाराष्ट्रातील पुढील प्रतिनिधीनींनी भाग घेतला. श्री. आण्णा सोनू धारणकर (नासिक), श्री. एकनाथराव पैठणकर (मालेगांव), डॉ. एन. एम. चिल्लाळ व सपारे बंधु (सोलापूर), श्री. शिवाजीराव नगरकर

(मुंबई), श्री. घुबे गुरूजी, श्री आत्माराम हुबळीकर, श्री. बाबुराव सपारे (पुणे), श्री. हरिभाऊ दिवाणे (अ. नगर), श्री. मल्हारराव गुंडा (पूणे) यांनी ठरावास पाठिंबा दिला.

(२) समाज उन्नतीसाठी प्रांतावर मासिक असावे. मराठीत जय जिव्हेश्वर आणि कानडीत स्वकुळ हे त्रैमासिक निघत आहे.सदर कामास आर्थिक भक्कमता हवी. तरी उदार बंधुंनी वर्गणी, देणग्या द्याव्यात. सदरकाम त्रासाचे श्रमाचे आहे. मासिक चालवणाऱ्या श्री. घुबे गुरूजींना ही महासभा धन्यवाद देत आहे.

(३) भगवान जिव्हेश्वर हे सर्व शाखांचे साळी समाजाचे दैवत असल्याने मूळचे आपण एकाच रक्ताचे आहेत. सूत व पटलेगार साळींचे विलिनीकरण मागेच झाले आहे. त्याप्रमाणे त्यांनी विवाह - रक्तसंबंधही केले आहेत. त्यांचे ही सभा अभिनंदन करत आहे. त्यांना धन्यवाद देत आहे. आता इतरांनीही या मूळ प्रवाहात सामील व्हावे व आदर्श घडवावा असे आवाहन करण्यात येत आहे.

(४) प्रत्येक गावी विद्याफंड योजना असावी. समाजातील गरीब विद्यार्थ्यांवा त्याचा लाभ द्यावा. तसेच गावातील मंदिर - मठ यांचा उपयोग विद्यार्थ्यांच्या वसतीगृहात केला जावा.

(५) आपला विणकाम - हातमागाचा व्यवसाय मोडीत निघाला आहे. विणकर बांधवांनी यांत्रिकमागाचे तंत्र अवलंबवावे. त्यांना यंत्रमॉग धंद्याचे मार्गदर्शन करण्यासाठी तज्ञांची एक समिती नेमण्यात यावी. त्यांनी प्रचार दौरा करून सभा घेऊन विणकरबांधवांना मार्गदर्शन करावे.

(६) दरवर्षी आपण भगवान जिव्हेश्वर जयंती साजरी करतो. त्याप्रसंगी इतर उपक्रमाअगोदर अभिषेक, पूजा व आरतीनंतर खालील शपथ सामुदायिकरित्या सर्वांनी घ्यावी असा आदेश सर्व समाजबांधवांना ही महापरिषद देत आहे.

हार्दिक शुभेच्छा
**श्री. डी. जी. निमकर**
माजी कार्यवाह
ठाणे जि स्व.सा.समाज
रजनीगंधा, वडवली सेक्शन,
अंबरनाथ (पूर्व), जि.ठाणे
फोन ६०७५४६

**शपथ** - मी सर्वशक्तीमान परमेश्वराला आणि वेदमूर्ती जिव्हेश्वराला वंदन करून अशी शपथ घेतो की - मी आखिल साळी समाजाचा एक घटक असून, मी समाजाच्या संघटनेसाठी व उन्नतीसाठी प्रामाणिकपणे आणि निस्वार्थ बुद्धिने काम करीन. समाजासाठी यथाशक्ती तन - मन - धन वेळ व श्रमाचे योगदान करीन. हे व्रत मी आजन्म पाळीन व समाजऋणातून मुक्त होण्यासाठी खारीचा वाटा उचलीन. जय जिव्हेश्वर !

दिनांक १ जून १९६८ चला बंधुंनो, आज सांगता दिवस आहे. पुढील वर्षासाठी अ. भा. क्रियासमितीचे अध्यक्ष महणून स्वकुळरत्न श्री. डि. एल. चिल्लाळ व प्रधान कार्यदर्शी म्हणून श्री. जी. आर. भंडारे यांची एकमताने निवड झाली. या निवडीस श्री. रामचंद्रराव कल्याणी, महादेवराव शेकटकर (मुंबई), कृष्णप्पा सपारे, कृष्णप्पा भंडारे, श्री. वामनराव कोन्हाळकर (कलयाण), आदिंनी एकमुखाने पाठिंबा दिला. प.पू. मुप्पीनार्य स्वामींनी पण शुभाशिर्वाद दिला. त्यानंतर महाराष्ट्र, गुजराथ, म्हैसूर, मध्य प्रदेश, आंध्र प्रदेश प्रांतावर अध्यक्ष, उपाध्यक्ष, कार्यदर्शी व त्यातील सदस्यांची निवड करण्यात आली महाराष्ट्र प्रदेश क्रिया समितीचे अध्यक्ष म्हणून श्री. महादेव विठ्ठल शेकटकर (मुंबई), उपाध्यक्ष श्री. बळवंत मुद्गल (कोल्हापूर) कोषाध्यक्ष श्री. तु. द. टण्णू (मुंबई), ज. सेक्रेटरी श्री. अ. श्री. घुबे (पुणे), सेक्रेटरी श्री. आण्णा धारणकर (नासिक), श्री. वामनराव कोन्हाळकर यांच्यासह २४ सभासदांचीही नियुक्ती झाली.

त्यांनंतर महाराष्ट्र प्रदेश क्रिया समिती अध्यक्ष श्री. महादेव शेकटकर यांनी पुढील अ. भा. आधिवेशन महाराष्ट्रात व्हावे असे आमंत्रण दिले. ते सर्वानुमते मान्य करण्यात आले अधिवेशनाचे कामकाज संपल्याने मा. अध्यक्षांनी झाली. बंधुनों चला तर आपणही आपल्या मार्गाला लागण्यापुर्वी पुन्हा प.पू. स्वामींचे दर्शन आणि शुभाशिर्वाद घेऊया कारण पुन्हा ही सुवर्ण संधी येणे दुर्मिळ आहे.

अदोनीकर स्वागत समितीने ४ दिवस सर्व पाहुण्यांचे निवास, शयन, भोजन, चहा, नाश्ता यांची व्यवस्था चोख ठेवली होती. त्यांच्या या स्मरणीय अतिथ्य सेवेबद्दल त्यांना धन्यवाद देऊ या !

आता आपली भेट पुणे अधिवेशनात सन १९७७ साली. तरी तयारी असू द्या पुणे नगरीची ! जय जिव्हेश्वर !!

*****

हार्दिक शुभेच्छा
**श्री. श्रीकृष्ण एन्. साळी**
माजी अध्यक्ष ठाणे जि स्व.सा.समाज
माजी संपादक स्वकुळ समाचार
जय शंकर अपार्टमेंट, बैलबाजार,
कल्याण (प.)

# अ.भा. ९ वे अधिवेशन - पुणे

## इ. सन (१९७७)

आदरणिय बंधु - भगिनी व मातांनो सप्रेम नमस्कार ! मागील लेखात आपण आपल्या समाजाच्या - अ. भा. अदोनी (१९६८) अधिवेशनाचे आँखो देखा हाल कामकाज पाहिले. प.पू. धर्मगुरू ऐरणी स्वामींचे दर्शन व आशिर्वाद घेतला. तर चला ! आज मी अ. भा. ९ व्या अधिवेशनासाठी तुम्हांस पुण्याला नेत आहे. तर चलो पुणे ! चलो पुण !!

विद्येचे माहेर घर - पेशव्यांची राजधानी पुणे ! राष्ट्र पुरूष छत्रपती शिवाजी राजे व लो. टिळकांचे पुणे ! म. फुले, महर्षि कर्वे, आगरकर, या समाज सुधारकांचे पुणे ! आचार्य अत्रे, पद्मश्री पुलं चे पुणे ! पुण्याने महाराष्ट्राला देशाला किती हिरे - माणके - रत्ने दिली. गणती नाही. ते पुणे ! पुणेरी भाषा, पुणेरी रिती - रिवाज, पुण्याचा गणेशोत्सव, पुण्याची हवा, सारेच काही वैशिष्टपूर्ण ! पुणे तेथे काय उणे ? अशा ह्या पूण्याला आपल्या समाजाचे अ.भा. ९ वे अधिवेशन संपन्न होत आहे, दि. १४ ते १७ मे रोजी ! चला तर आपणही तेथे हजेरी लाऊ या !

### शनिवार दि. १४ मे १९७७ स. ९ वा (प्रथम सत्र)

श्री शिवाजी मराठा हायस्कूलच्या भव्य सभामंडपात आपणही जाऊन बसु या ! सुशोभित व्यासपिठावर भगवान जिव्हेश्वराचे भव्य भावचित्र आहे. ते पहा सुशोभीत सिहासनावर धर्मगुरू प.पू. मुप्पीनार्य स्वामी विराजमान झाले आहेत. व्यासपिठावर कोण कोण मान्यवर आहेत बरे ? ते पहा अ. भा. क्रिया समितीचे मा. डी. एल. चिल्लाळ, परिषदेचे नियोजित अध्यक्ष बागलकोटचे मा. शंकरराव एडके बी.ए.एल.एल.बी., सह अध्यक्ष बेळगावचे मा. पी.एस. एकबोटे एम.ए.एल.एल.बी., परि. चे उद्घाटक - विद्वान वक्ते मा. प्राचार्य शिवाजीराव भोसले, स्वागताध्यक्ष मा. दत्तात्रय रेवणनाथ चिल्लाळ, ते पहा या परिषदेचे प्रवर्तक - पुण्याचे मा. जगन्नाथराव कल्याणी, प्रमुख पाहुणे म्हणून ते पहा - हैदराबादचे स्व. रत्न रामचंद्रराव कल्याणी, साथी एस. एम. जोशी, कोल्हापुरचे डॉ.रा.अ. कडीयाळ, मुंबईचे श्री. शिवाजीराव नगरकर, दत्ता भंडारे, लक्ष्मणराव दुधाणे, ब.सी.बावधनकर, उत्तम भागवत, सुरतचे श्री. खंडेराव कांबळे, इंदुरचे दादासाहेब सरोदे, पणजीचे श्रीकांत भागवत, मद्रासचे श्री. एस. कृष्णराव, औरंगाबादचे श्री. पु.लेंभे आदी ..... आणि या मंडपात बघा म. प्र., गुजरात, आंध्र, कर्नाटक व महाराष्ट्रातील असंख्य समाज बंधु - भगिनींनी आपली हजेरी लावलेली आहे. सनईच्या गोड स्वराने वातावरण धुंद व प्रसन्न झाले आहे.

ते पहा - गोड ईशस्तवनाने कार्यक्रम सुरू झाला आहे. स्वागताध्यक्षांनी मान्यवर व उपस्थितांचे स्वागत केले आहे. अ. भा. अध्यक्ष श्री. डी. एल. चिल्लाळ यांनी प्राचार्य भोसलेंना पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार केला. मा. जगन्नाथ कल्याणी यांनी प्रा. भोंसलेंचा परिचय करून दिला. प्राचार्य भोसलेंनी आपल्या रसाळ भाषेत परिषदेला सुयश चिंतले व या अधिवेशनाचे उद्‌घाटन झाल्याचे जाहिर केले.

त्यानंतर स्वागताध्यक्षांनी परिषदेस मान्यवरांचे आलेले शुभेच्छा संदेश वाचुन दाखवले

१) राष्ट्रपती - मा. व्ही. व्ही. गिरी.
२) पंतप्रधान - मा. मोरारजी देसाई,
३) व्यापारमंत्री - मा. मोहन धारीया,
४) उद्योगमंत्री - मा. जॉर्ज फर्नांडीस,
५) परराष्ट्रमंत्री - मा. अटलबिहारी वाटपेयी,
६) महाराष्ट्राचे मुख्यमंत्री - मा. वसंत दादा पाटील,
७) आंध्रचे मुख्यमंत्री - मा.व्यंगल राव,
८) पुणे न.पा. महापौर मा. शिवाजीराव.

त्यानंतर अधि. निमित्ताने काढलेल्या स्मरणिकेचे प्रकाशन भोसले, साथी एस. एम. जोशी यांच्या हस्ते झाले. या उद्‌घाटन समारंभाचे अध्यक्ष मा. रामचंद्रराव कल्याणी यांनी आपल्या भाषणात समाज प्रश्नांचे प्रबोधन केले.त्यानंतर स्मरणिका संपादन करणारे १) श्री. रा. म. डिंगणे, २) श्री. निवृत्ती ज्ञा. पावले, ३) श्री. द.ल. सपार यांचा धर्मगुरू, प.पू. मुप्पीनार्य स्वामींच्या हस्ते श्रीफळ, पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन करण्यात आले. त्यावेळी धर्मगुरू आपल्या संदेशात म्हणतात - माझ्या समाज लेकरांनो आपल्या समाजाची उन्नती होवो ! सर्वांना आरोग्य सौख्य लाभो ! प्रपंच व परमार्थात प्रगती होवो ! या परिषदेस मी सुयश चिंततो ! हा माझा शुभआशिर्वाद आहे ! (प्रथम सत्र संपले ... मध्यंतर...)

## सत्र २ रे (दुपारी ४ वा)

व्यासपीठावर सर्वजण स्थानापन्न झाले. अखिल भारतीय क्रिया समितीच्या अध्यक्षांनी परिषदेचे नियोजीत अध्यक्ष मा. शंकरराव एडके (बागलकोट), व सह अध्यक्ष - मा. परशुरामजी एकबोटे (बेळगाव) या

हार्दिक शुभेच्छा
**सौ. मंगला अरुण कासटकर**
**श्री. अरुण यादव कासटकर**
उल्हासनगर, जि. ठाणे.
फोन - ५३३८३३

द्वयांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला व परिषदेची सूत्रे त्याच्या हाती दिली व रितसर कामकाजास सुरूवात झाली. प्रथथम ज्या व्यक्तींनी समाजासाठी तन - मन - धन अर्पून सेवा केली अशा ज्ञात - अज्ञात दिवंगत समाजबंधुना भावपुर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. नंतर मा. डी. एल. चिल्लाळ यांनी गेल्या १० वर्षात क्रि. स. ने केलेल्या विधायक कामकाजाचा सविस्तर अहवाल सादर केला नंतर या परिषदेत धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक विषयावर सांगोपांग चर्चा झाली. आणि त्या विचार मंथनातून पुढील ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात आले ते असे.

# धार्मिक व सांस्कृतीक ठराव

१) श्री जिव्हेश्वर चरित्र म्हणजे साळी महात्म पुराण हीपोथी अ. भा. स्व. सा. क्रिया समितीने (नको असलेला भाग वगळून) परत नवीन छापावी. सुचक श्री दादासाहेब सरोदे (इन्दौर)

२) आपल्या अ. भा. साळी समाजाचा ध्वज हा ऐरणी धर्म पीठाचाच - एकजीभी भगवा ध्वज ॐकार युक्त असावा. सुचक - श्री. आण्णा सोनु धारणकर (नासिक),

३) सर्व प्रांतीक भाषेतून भ. जिव्हेश्वर जीवनावर काव्ये तयार करून ती काव्ये माहितीसाठी अ. भा. क्रिया स. कडे पाठवून द्यावीत. सुचक - श्री. वामनराव गणपतराव कोल्हाळकर (कल्याण),

४) धर्मपीठाबद्दल आमची कर्तव्ये - श्री. मद् जग मुप्पीनार्य महास्वामीजी - ऐरणी या धर्म पीठाला समाजाच्या प्रत्येक व्यक्तिनी दरवर्षी चैत्र शु. १५ (पौर्णिमा) या दिवशी किमान एक रूपया तरी गुरूदक्षिणा द्यावी. तसेच दर लग्नाच्या वेळी वरपक्षाकडून अडीच रूपये आणि वधु पक्षाकडुन सव्वा रूपया या धर्मपीठास अर्पण करावा. (ठराव सर्वानुमते टाळ्यांच्या गजरात मंजुर) आजचे कामकाज संपले. चला आता मुक्कामावर.


हार्दिक शुभेच्छा

**सौ. भारती बाळकृष्ण साळी**

**श्री. बाळकृष्ण गणेश साळी**

विसावा को-ऑप. सोसायटी,
अपना बाजारजवळ,
नेरुळ, नवी मुंबई.

## सत्र 3 रे- रविवार दि. १५ मे १९७७ (स. १० वा)

**व्यासपिठवर सर्वजण स्थानापन्न झाले. आजचे सामाजिक ठराव -**

५) पुष्कळ ठिकाणी अनेक पठवड्या असल्याचे समजुन या परिषदेला विषाद होत आहे. हे दूर करण्यासाठी ज्या त्या गावाच्या प्रमुखांनी, मान्यवर व्यक्तिनीं, व समाज घटकांनी समाजाच्या अभिवृद्धीसाठी आपला व्यक्तिगत अभिमान दूर ठेवून एकमत साधण्यासाठी प्रयत्न करावा आणि मतभेद नाहिसे करावेत. - सुचक - श्री पुरूषोत्तम ज. डांगरे (पुणे),

६) प्रत्येक प्रांतीक क्रिया समितीने आपआपल्या प्रांतातील (हासिल - मासिल, लग्न रितीरिवाजाची) माहिती मिळवून आपल्या प्रांतासाठी येणाऱ्या बाबी म्हणजे हासिल मासिल रितिरिवाज इ. निश्चित करून त्या अमलांत आणणे. सुचक - श्री रघुनाथ एकबोटे,

७) मराठी बंद पडलेले त्रैमासिक जय जिव्हेश्वर महाराष्ट्र क्रिया समितीने परत सुरू करावे. गुजरात आणि म. प्र. क्रि. स. ने या कार्याला सहकार्य द्यावे. कानडी त्रै. स्वकुळ अव्याहत चालू आहे. याबद्दल धन्यवाद !

८) मुळ स्वकुळ साळी समाजात आहेर साळी, टिकले साळी, बागलाण साळी, गुजर साळी, वाढोळे साळी, याचा समावेश व्हावा - सुचक - सहकारदर्शी मा. भंडारे गुरूजी.

९) स्वकुळ साळी समाजातील स्त्री किंवा पुरूष हिंदुधर्मीय अन्य जातींच्या व्यक्तिशी त्यांच्या, त्यांच्या संतानासह शुद्धी - करण करून घ्यावे. धर्मपीठाचा आशिर्वाद घ्यावा. तसेच प्रांतीक आणि अ. भा.क्रि.स.ला. झालेली घटना कळवावी अ. भा. क्रि.स. ने वैदिक पद्धतीने शुद्धीकरण करण्याविषयीचे माहिती पुस्तक छापून प्रसिद्ध करावे. सुचक - श्री डॉ. नपेंद्र मलकाजी चिल्लाळ (पुणे) बंधुनों आजचे कामकाज संपले. चला आता मुक्कामावर!

### सत्र ४ थे - सोमवार दि. १६ मे १९७७ (स. १० वा.)

व्यासपिटावर सर्व मान्यवर स्थानापन्न झाले आहेत. आजचा विषय आहे. घटनेस मंजुरी देणे. अ.भा.क्रि.स. ने परिशिलन करून संम्मत केलेली, घटना

महापरिषदेपुढे चर्चेसाठी व मंजुरी साठी ठेवण्यात आली. सदरहू २२ कलमी घटनेत अनेक पोटकलमेही आहेत. दिवसभर ऐकेका कलमावर साधक बाधक चर्चा झाली व घटनेस एकमताने मान्यता देणेत आली. ठराव संपले. आता पर्यंतच्यासर्व कामकाज चर्चेत पुढील मान्यवरांनी आपले विचार मांडले -

१) श्री. दादासाहेब सरोदे (इंन्दौर) २) श्री. आण्णा सोनु धारणकर (नाशिक) ३) श्री मुरलीधर बागुल (नंदुरबार) ४) श्री. डॉ. रा. अ. कडीयाळ (कोल्हापूर) ५) श्री काशिनाथ ढगे (नवसारी) ६) श्री. प. अहिरराव (औरंगाबाद) ७) श्री संभाजी मुद्गुल (कोडोली) ८) श्री मेघराज सुखमनकर, श्री. गुरूनाथ चिल्लाळ , डॉ. एन. चिल्लाळ (सोलापूर), श्री. भानुदास हरवंदे, श्री. धनंजय उगले, श्री जगन्नाथराव कल्याणी (पुणे), श्री काशिनाथ सपार (चिखलपुर), श्री. दत्तात्रय तांबे (अ. नगर), श्री. वामनराव कोल्हाळकर (कल्याण), श्री बाबुराव झोंड, श्री जि.व्ही.शिंदे (चितापुर), श्री. व्ही. जे. काळे (गुजरात), श्री हनुमंतप्पा रोकडे, श्री. जी. आर. भंडारे (हुबळी), श्री. नारायणराव गणेचारी, श्री. वाल्हेकर गुरूजी, श्री. शांताराम हरवंदे (मुंबई), श्री जी. एन ठाणेकर, श्री.डी.जी. शिंगारे (अहमदाबाद), श्री. बाबुराव झोंड, श्री. महादेव मारवाडी (मुंबई) इत्यादी ....! आजचे कामकाज संपले चला आता मुक्कामावर !

## मंगळवार दि. १७ मे १९७७

बंधुंनो - परिषदेचा आज सांगता दिवस आहे. आज पदवीधर व व्यावसायिकांचे समेलन- परिसंवाद करण्यात आले आहे. त्याचे उद्घाटन मा. रा. आ. कडियाळ यांनी केले. या संमेलनात अनेक बंधुभगिनींनी आपले मार्गदर्शनपर विचार व्यक्त केले. तसेच हस्तकला प्रदर्शनाचे उद्घाटन दै.तरूण भारताचे संपादक मा. शंबभिसीकर यांनी केले. तसेच आजच्या कामकाजात अ. भा. विद्या लर्धक संघास अनेकांनी देणग्या दिल्या, प्रलंबित बागलकोट प्रकरण मिटविण्यात आले. काही क्षर्णाचित्रे - हस्तकला प्रदर्शन पाहून सर्वजण खुश झाले. दररोज रात्री होणाऱ्या विविध गुणदर्शनाच्या सांस्कृतीक कार्यक्रमाने सर्वांची मने ताजी तवानी राहिली. पुणेरी भेळची चवं प्रत्येकाने चाखली. काहींना धार्मीक पुस्तके व ग्रंथ खरेदी केले. अनेकांनी धर्मगुरूंना स्वेच्छेने गुरूदक्षिणा अर्पण केले. काहींनी वेळात वेळ काढून पूणे - दर्शनात


हार्दिक शुभेच्छा
**कु. संदेश वसंत माटोले**
**सौ. मनिषा वसंत माटोले**
**श्री. वसंत भगवान माटोले**
अध्यक्ष बदलापूर साळी समाज
५, यशश्री, चिनार को.ऑप. सो.,
हेंद्रेपाडा, कुळगांव (प), बदलापूर

- पर्वती, आगाखान पॅलेस, शनिवार वाडा पाहून घेतला. काहिंनी जेजुरी - देहु - आळंदीची वारी उरकुन घेतली. ४ दिवस पुणे साळीमय झाले होते. नियोजनबद्ध कामाची आखणी व स्वयंसेवकांची तत्पर सेवा त्यामुळे कोणाचीही, कोणतीही, गैरसोय झाली नाही. पाहुण्यांचे निवास, शयन, भोजन, चहा - उत्कृष्ट व्यवस्था आढळली. प.पू स्वामींना प्रत्येकानेच पुष्पमाला अर्पून शुभाशिर्वाद घेतला.

समारोप - बंधुंनो आता ते पहा. मा. अध्यक्षांनी मार्गदर्शनपर भाषण केले. स्वागताध्यक्षांनी सर्व मान्यवर व उपस्थित बंधु भगिंनीचे आभार मानले. व कार्यक्रम संपल्याचे जाहिर केले. मात्र त्यापूर्वी अनेकांनी यशस्वी अधिवेशना निमित्त आपल्या भावना व्यक्त केल्या. शेवटी उपस्थित बंधुभगिनी तर्फे नंदुरबारचे श्री मुरलीधर बागुल यांनी पुणेकरांच्या सौजन्यशील अत्तिथ्य सेवेबद्दल गौरवोद्गार काढले. त्यांचे तोंड भरून कौतुक केले. त्यांना शतशः धन्यवाद दिले व पूणेकरांना मानाचा मुजरा पेश केला. पुढे ओजस्वी भावपूर्ण भाषणात ते म्हणाले आम्ही आपआपल्या गावी जातांना समाज एकीकरणांची ज्योत बरोबर नेत आहोत. पुढेज्योतीने ज्योत पेटवू ! हा संदेश घरोघरी पोहचवू ! जाता जाता प.पू.स्वामीची, मा. डी. एल चिल्लाळ, शंकरराव एडके, रामचंद्रराव कल्याणी, जगन्नाथराव कल्याणी, भंडारे गुरूजी या आमच्या दिपस्तभांना मानाचा मुजरा करीत आहोत ! आता आम्ही जातो आमच्या गावा - आमचा राम राम घ्यावा. त्यांच्या या भावपूर्ण उद्गारांनी सारी सभा भारावून गेली. सर्वांची अंतःकरणे सद्गतीत झाली. सर्वांच्या डोळ्यात अश्रु भरून आले.

मित्रानो - एकंदरीत भव्य मंडप, सुशोभीत व्यासपीठ, मान्यवरांची भरगच्च उपस्थिती, दर्चेदार ठराव, कामाची सुत्रबद्ध आखणी, पुणेकरांची सौजन्यशील अतिथ्य सेवा, चविष्ट व खमंग पुणेरी पाहुणचार, सांस्कृतिक मनोरंजनाचे कार्यक्रम, परिसंवाद, कलाप्रदर्शन .या सर्व गोष्टींमुळे हे पुणेरी अधिवेशन अतिशय उत्तम प्रकारे संपन्न झाले !

तर बंधुनो सांगा बरे पुणे अधिवेशनाचा हा सविस्तर वृतांत आपणास(नव्या पिढीस) माहित होता काय ? असो. चला परंतु या आता आपआपल्या गावी एकीकरणाची ज्योत घेऊन ! या पुढे मी आपणास दक्षिणभारताचे नंदनवन, कर्नाटकातील सुंदर शहर बंगलोरला नेणार आहे १० व्या अधिवेशनासाठी ! मात्र सन १९८६ साली हं ! तरी आतापासून तयारी असु द्या - चलो बंगलोरची ! (भाडे लागत नाही) सन १९९९ चे नूतनवर्ष सर्व बंधुभगिनींना उत्कर्षाचे जावो ! ही माझी सर्वांना शुभेच्छा ! जय जिव्हेस्वर !!

❋❋❋❋❋

# अ. भा. स्व. साळी समाजाचा कार्य अहवाल

## (सन १९८० ते १९८६)

आदरणीय बंधु, भगिनी व मातांनो सप्रेम नमस्कार ! मागील लेखात दिलेल्या आश्वसनाप्रमाणे आपण चलो बंगलोरच्या तयारीत असाल. बंगलोरला १० व्या अधिवेशनासाठी आपण जाऊच या ! तुम्हास तेथे नेण्याची माझी तयारी पूर्ण झाली आहे. पण .......... तेथील कामकाज पहाण्यापूर्वी आपल्या समाजधुरिणांनी, अ. पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी मधल्या काळात काय कार्य केले हे समजाऊन घेणे इष्ट ठरेल. या लेखाचे मी दोन करीत आहे. भाग १ - अ. भा. स. चा कार्य अहवाल पहाणे, भाग २ - बेंगलोर अधिवेशनाचा आँखो देखा हाल साठी उपास्थित राहणे तर या लेखात फक्त -

बंधुनो - अ. भा. १० वे अधिवेशन दि. १४ व १५ डिसेंबर १९८६ रोजी बेंगलोर (कर्नाटक) येखे संपन्न झाले. त्यावेळी माननिय जगन्नाथराव कल्याणी (अध्यक्ष), मा. वामनराव कोल्हाळकर (सहकार्यदर्शी) यांनी त्यांच्या गत काळातील जो कार्यअहवाल महापरिषदेपुढे सादर केला त्याचा गोषावारा असा आहे. –

१) **झालेल्या सर्वसाधारण सभा** - अहवाल काळामध्ये अ. भा. स्व. साळी समाजाच्या ५ सर्वसाधारण सभा झाल्या व क्रियासमितीच्या पंढरपूर, अ.नगर, रायदुर्ग, बोळगाव, औरंगाबाद, पुणे, आणि बेंगलोर येथे ७ सभा झाल्या. त्याबरोबरच संबंधीत राज्य क्रिया समितीच्या ही काही सभा झाल्या.

२) **पदाधिकारी निवड** - मे १९७७ पुणे अधिवेशनात मंजुर झालेल्या घटनेप्रमाणे अ. भा. व प्रातिक पदाधिकाऱ्यांची निवड पंढरपूर येथे दि. २४ व २५ फेब्रुवारी १९८० रोजी झालेल्या सर्व सा. सभेत करण्यात आली ती अशी.

१) अ. भा. स्व. साळी समाज - अध्यक्षपदी पुण्याचे श्री. जगन्नाथ रा. कल्याणी, सरकार्यदर्शीपदी, कल्याण चे श्री. वामनराव ग. कोल्हाळकर, आणि कोषाध्यक्षपदी श्री. जगन्नाथराव न. दिवटे यांची निवड झाली.

२) महाराष्ट्र स्व. साळी समाज - अध्यक्षपदी मुंबईचे श्री. शिवाजीराव सि. नगरकर, सहकार्यपदी मुलुंडचे श्री. दत्तात्रय सोपान भंडारे आणि कोषाध्यक्षपदी श्री. मनोहर न. डोईफोडे यांची निवड झाली. परंतु पुढे सन १९८१ साली श्री. शिवाजीराव नगरकर यांनी अध्यक्षपदाचा राजीनामा दिल्यामुळे अंमळनेर जि. जळगाव येथे झालेल्या महाराष्ट्र क्रि. स. च्या सभेतजळगावचे श्री. माधवराव गोविंदराव साळी यांची महाराष्ट्राचे समाजाध्यक्ष म्हणून निवड झाली.

३) कर्नाटक राज्य - अध्यक्षपदी श्री. विठ्ठलराव सुरजकर सहकार्यपदी., श्री दत्तप्पा या. गुळेंद कोषाध्यक्षपदी. श्री मलप्पा शं. दिवटे यांची निवड झाली.

४) आंध्रप्रदेश - अध्यक्षपदी श्री. नरसिंगराव कोंगे सहकार्यपदी, श्री. नारायणराव एकबोटे आणि कोषाध्यक्ष श्री. नारायणराव चिल्लाळ यांची निवड झाली.

५) गुजरात राज्य - येथील प्रतिनिधी पंढरपूर येथील सर्वसाधारण सभेस उपस्थित नसल्याने त्या राज्याचे पदाधिकारी निवड झाली नाही. परंतु पुढे सन १९८१ साली अ. भा. स्व. सा. समाजाचे सहकार्यदर्शी श्री. वामनराव कोल्हाळकर व महाराष्ट्र स. संमतिने पदाधिकारी निवड केली. अध्यक्षपदी श्री. पंजाबराव रामचंद्र खंगाळे सहकार्यदर्शी श्री. वसंत महादेव अक्कडकर व कोषाध्यक्षपदी श्री. केशवराव बा. जवादे यांची नेमणूक झाली.

३) **अ. भा. स्व. साळी - विद्यावर्धक संघ** - या संघाच्या अध्यक्षपदी समाजाचे माजी अध्यक्ष स्वकुळ रत्न श्री. दत्तराज लक्ष्मण चिल्लाळ (बागलकोट) सरचिटणीसपदी कोल्हापुरचे डॉ. रामचंद्र. अ. कडीयाळ आणि कोषाधियक्षपदी श्री. जी. आर. भंडारे गुरूजी यांची निवड झाली.

४) **अ. भा. स्व. साळी समाजाने केलेले कार्य -**

१) खाने सुमारी - आपल्या सामाजाची कुटूंबसंस्था, लोकसंख्या, आर्थिक, शैक्षणिक, व्यवसाईक, स्थिती इत्यादी माहिती संकलनाचे काम महाराष्ट्रातील सर्व ज्ञात संस्थांनी बहुंशी पाठविली. त्यासाठी विहित नमुन्यात कुटूबं पत्रिका संकलन पत्रिका, सर्व संस्थांना पाठविण्यात आली होती. परंतु महाराष्ट्र व्यतिरिक्त इतर राज्यांचे काम मात्र अजुन संकलीत झाले नाही. त्यांनी ते करावे.

२) अधिकृत प्रतिनिधींची नोंद - अधिकृत प्रतिनिधींची नोंद करण्यासाठी अ. भा. स्व. साळी समाज घटनेतील कलम १२ व १२ (अ) मधील पोटकलम १ ते ५ मनुसार प्रत्येक गाव / शहराचे अधिकृत प्रतिनिधी नियुक्त करून नावे विहीत नमुना फार्मात प्रांत व अ. ना. कार्यालयात पाठवावयाची होती. त्यासाठी सर्व राज्यातील ज्ञात समाज संस्थांना अधिकृत प्रतिनिधी माहिती पुस्तके, पत्रके, आवदने प्रतिज्ञापत्रिका इ. फार्मस पाठविली व तसे सर्वांना कळवले. परिणामी सुमारे ४०० अधिकृत प्रतिनिधींचे नोंद झाली आहे. अजूनही ज्यांना पाठवली नसतील ती माहिती पाठवावी (अधिकृत प्रतिनिधी कसे नेमावेत किती नेमावेत याचा खुलासा घटना कलम १२ व १२ (अ) १ ते ५ पोटकॉलमात केला आहे.

३) आपल्या समाजाचा अनु. जमातीमध्ये अंतर्भाव करण्यासाठी - मागासवर्गीय जमातीच्या अडीअडचणी समजाऊन घेणेसाठी व मिळालेल्या माहितीवरून केंद्रसरकारला योग्य त्या शिफारसी शासनाने बी. पी. मंडल आयोग नेमला होता. त्या आयोगापुढे औरंगाबाद येथे दि. २१ जुलै ८१ रोजी पुणे येथे २२ जुलै ८१ रोजी मुंबई येथे २३ जुलै ८१ रोजी आपल्या समाजातर्फे निवदने सादर कराण्यात आली. पुणे येथे अ. भा. समाजाध्यक्ष श्री. जगन्नाथरावकल्याणी यांनी आपल्या समाजाची दारूण परिस्थिती आयोगापुढे प्रभावीपणे मांडली व स्व. साळी समाजाचा अंतर्भाव अनु - जमातीत करावा अशी आग्रही विनंती केली. तसेच हलबा समाज व स्वकुळ साळी समाज यांचे कुलदैवत व व्यवसाय एकच असतांना हलबा समाजास अनु - जमातीचे फायदे मिळतात व आम्हास मिळ्त नाहीत. हे मुंबई येथे आयोगाच्या निदर्शनास आणून दिले. नागपूर येथेही आणून दिले. नागपूर येथेही अशाच प्रकारचे निवेदन आयोगास दिले. तसेच महाराष्ट्र मुख्यमंत्री मा. वसंत दादा पाटील व समाजकल्याणमंत्री सौ. प्रतिभाताई पाटील यांनाही ही निवेदने देण्यात आली.

४) सभा, संमेलन मेळावेतून ज्ञातीसंघटना - गाव - शहर, जिल्हा विभागवार समाज संघटन, एकोपा एकमेकांचा सुसंवाद साधणेसाठी सर्व प्रांतात पदाधिकारी कार्यकर्त्यांनी दौरे केले. ज्ञाती बांधवांच्या सभा घेऊन मार्गदर्शन केले. महाराष्ट्रात १४ मे १९८० जळगाव येथे धुळे, जिल्हयातील शहादा येथे नोव्हेंबर १९८० मध्ये तर ६/२/८१ रोजी चिपळूण जि. रत्नागिरी येथे जिल्हा मेळावे झाले. तसेच दि. १/११/८२ औरंगाबाद येथे दि. ७/८/८५ रोजी गुलबर्गा विभागीय मेळावे घेतले त्यात अ. भा स्व. समाजध्यक्ष मा. जगन्नाथराव कल्याणी यांनी मार्गदर्शन केले. तसेच महाराष्ट्र क्रि.स.नेही दि. २४ सप्टेंबर ८३ ते २ आक्टोंबर ८३ दौरा केला. त्यात अध्यक्ष श्री. माधवराव साळी, सरचिटणीस श्री. दत्तात्रय भंडारे, अ. भा. सरचिटणीस श्री. वामनराव कोल्हाळकर, राज्य उपाध्यक्ष श्री. सुरेश लंगोटे, कोषाध्यक्ष, श्री. मनोहर डोईफोडे, मुंबई तरूण सेवा मंडळ अध्यक्ष डॉ. चंद्रशेखर बारगजे यांनीही मुंबई, कल्याण, महाड, माणगाव, खेड, चिपळूण, दाभोळ, पालघर

हार्दिक शुभेच्छा
**श्री. ईश्वर प्रल्हाद साळी**
**सौ. सरिता ईश्वर साळी**
**कु. दिनेश ईश्वर साळी**
गुरुसृष्टी अपार्टमेंट, २रा माळा, महादेव मंगल कार्यलयाजवळ,
बाजारपेठ, कुळगाव (प.),
बदलापूर स्टेशनजवळ, जि.ठाणे.

आदी (कोकण विभाग) त्यानंतर सातारा, सांगली, कऱ्हाड, कोल्हापूर, इचलकरंजी, पंढरपूर, सोलापूर, अ. नगर, श्रीरामपूर, संगमनेर, ओझर (नासिक) अशा ठिकाणी ज्ञाती बांधवांच्या सभा संमेलने घेऊन समाजसंघटन व प्रबोधन केले त्याचप्रमाणे दुसरा दौरा २३ नोव्हेंबर ८६ ते ३० नोव्हेंबर ८६ या काळात विदर्भ मराठवाडातील नागपूर, पुसद, अमरावती, अंजनगाव, अकोला, वाशिम, बीड, परभणी, नांदेड, उ.बाद, कळंब,आंबेजोगाई, किल्लेधारूर, लातुर, जालना, पैठण, औरंगाबाद, आदी गाव शहरात सभा घेतल्या. बेंगलोर ८६ ला होणाऱ्या अ.भा. महापरिषदेचा प्रचार केला. समाजबांधवांत जागृती निर्माण केली. त्यासाठी जाहिराती व देणग्या मिळवल्या. आंध्रप्रदेशातही त्यांचे कार्याध्यक्ष श्री. जनार्दन कांबळे, सरकारदर्शी नारायणराव एकबोटे व समाज कार्यकर्त्यांनी विविध ठिकाण दौरा करून बेंगलोर परिषदेचा प्रचार केला. जाहिराती व देणग्या मिळवल्या. कर्नाटकातही अध्यक्ष श्री. विठ्ठलराव सरंजकर, प्र. कार्यदर्शी श्री. दत्तप्पा गुळेद, व समाज कार्यकर्त्यांनी प्रचारदौरा केला. समाजबांधवांच्या सभा घेतल्या संघटन वाढवले. बेंगलोर महापरिषदेचा प्रचार केला. जाहिराती व देणग्या मिळवल्या. गुजरातची माहिती उपलब्ध झाली नाही.

५) साहित्य प्रकाशन - १) सन १९७७ पुणे अधिवेशनाचा संक्षिप्त अहवाल छापून प्रसिद्ध करण्यात आल या कामी श्री. दत्तात्रय भंडारे, श्री. वामनराव कोल्हाळकर, श्री. जगन्नाथ कल्याणी यांनी विशेष परिश्रम घेतले. त्याच प्रमाणे समाजाची घटना छापण्याची जबाबदारी श्री. जगन्नाथराव कल्याणी यांनी पार पाडली. (२) श्री. ग्या.रा. भंडारे. (गुरूजी) यांनी अनेक ग्रंथांचा अभ्यास व परिशिलन करून शिवमय साळी अर्थात स्व. सा. समाजाचा इतिहास लिहिला व तो पुस्तक रूपाने उपलब्ध करून देण्या मध्ये आम्हास आनंद होत आहे. (३) श्री. जिव्हेश्वर साळी महापुराण या ग्रंथांची सुधारित पुर्नमुद्रीत आवृत्ती पुण्याचे श्री. रामचंद्र विष्णु घटे यांनी प्रकाशित केली. त्याबद्दल ते कौतुकास पात्र आहेत. (४) दि. १/८/८२ पासून श्री जिव्हेश्वर त्रैमासिक मराठीत महाराष्ट्र क्रि.स. तर्फे प्रकाशित करण्यात येत आहे. त्याचे प्रथम संस्थापक व प्रसंपादक समाजअध्यक्ष श्री. माधवराव गोविंदराव साळी यांनी पुढाकार घेऊन त्याची संपादनाचीयशस्वी जबाबदारी उचलली आहे. श्री. दत्ता भंडारे, श्री सुरेश लंगोटे, श्री. मुरलीधर बागुल, श्री गोविंदराव गोतमारे यांनी अतोनात परिश्रम घेऊन त्याचे संपादन व्यवस्थित सुरू आहे. त्याच प्रमाणे कर्नाटकातून श्री. जिव्हेश्वर त्रैमासिक कानडीभाषेतून सुरू झाले आहे.

६) संस्थेची रजिस्ट्रेशन नोंदणी - अ. भा. स्व. साळी समाजाची नोंदणी पुणे योथील असि. चॅरिटी कमिशनरकडे केली नोंदणी क्रमांक एफ/२४४६/ पुणे१७/५/८३ त्याचप्रमाणे संस्था नोंदणी क्रमांक महाराष्ट्र १३१० पुणे १/ ३/८३ असा आहे.

७) भगवान श्री जिव्हेश्वरांचे रंगीत भावचित्र - पुर्नमुद्रित करण्यात आले असून सर्व समाजबांधवांना ते उपलब्ध करून देण्यात आले आहे.

८) कार्यालयीन खर्चाची तरतूद - महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र, गुजरात राज्यांच्या कार्यकारिणी व कार्यालयीन खर्चाच्या तरतूदीसाठी समाजसंस्थाकडून निधी संकलन होणे जरूरीचे आहे. त्यासठी निधी जमा पुस्तके छापून त्या त्या राज्यांच्या अध्यक्षकांकडे सुपूर्द करण्यात आली आहेत. विशेष म्हणजे ही सर्व पुस्तके श्री. माधवराव साळी (महाराष्ट्र अध्यक्ष) यांनी विनामूल्य छापून दिलीत. या बद्दल अ. भा. समाजातर्फे त्यांचे अभिनंदन !

९) अ.भा.स्व.सा. विद्यावर्धक संघ - सदरहू विद्यावर्धक संघाची घटना दि. ९/ ८/१९८१ रोजी, बेळगाव येथील सर्व साधारण सभेत संमत करण्यात आली. तिचा नोंदणी क्रमांक बेळगाव क्र. ई २७७, बीजेपी १२/१/८३ असा आहे. या संस्थेचे अध्यक्ष श्री. डी. एल. चिल्लाळ यांनी, देणगीदारांना उत्पन्न करातून सूट मिळावी म्हणून अतिशय परिश्रम घेतले. व शासनाकडे पाठपुरावाकरून, त्यांनी त्यात यश मिळवले. या संघाची आर्थिक बाजू भक्कम व्हावी म्हणून अ. भा. वि. संघ व अ.भा.स्व. साळी समाजाचा पदाधिकाऱ्यांनी अनेक शहरातील दानशूर समाजबांधवांच्या गाठीभेटी घेतल्या व निधी जमविण्याचा आटोकाट प्रयत्न केला. आजपर्यंत २।। लाख रू. देणग्यांचे आश्वासन मिळाले असून अंदाजे १ लाख रू. रक्कम जमा झाली आहे. सदरहून संघाचा कार्यअहवाल स्वतंत्र देणण्यात येईल.

१०) आर्थिक वर्ष - अ.भा.स्व.साळी समाजाचे आर्थिक वर्ष १ जानेवारी ते ३१ डिसेंबर रहावे. असे ठरविण्यात आले आहे.

११) जिल्हानिहाय व विभागीय संस्थाबाबत धोरण - विभाग / जिल्हा / शहर गाव यांच्या नावात एकसूत्रता असावी व त्यांचा एकमेकांशी समन्वय असावा यादृष्टिने योग्य ते नियम संमत करण्यात आले.

१२) संस्थेच्या नावात बदल - अ. भा. स्व. सा. स. क्रिया समिती असे म म्हणता अ. भा.स्व.साळी समाज असे म्हणावे हा ठराव पुणे येथे मे १९८५ च्या सर्वसाधारण सभेत घेणेत आला.

सारांश - गेल्या ७ वर्षात वरील क्रियाशील कर्यामुळे सर्व समाजात जागृती होऊन चैतन्यमय वातावरण निर्माण झाले आहे एकमेकांशी सुसंवाद वाढल्याने संघशक्ति वाढली आहे. समाजबांधवात कार्यकर्त्यात उत्साह वाढला आहे. पुणे परिषदेत संमत झालेल्या ठरावाची अंमलबजावणी समाजात वाढलेली एकी, एकमेंकाशी साधलेला सुसंवाद जागृती ही त्याची फलश्रुती आहे. या कामी अ.भा.स्व.सा. समाजाचे सर्व पदाधिकारी,कार्य सदस्य कार्यकर्ते अखिल समाजबंधु - भगिनी यांचे बहुमोल सहकार्य लाभले आहे. व हा समाजरूपी जगन्नाथाचा रथ ओढण्यास जो हातभार व यथाशक्ती लावली त्या सर्वाते शतशः आभार मनुन आम्ही हा अहवाल पूर्ण करीत आहोत. जय जिव्हेश्वर

आपले नम्र

**श्री. वामनराव ग. कोन्हाळकर** — सहकार्यदर्शी

**श्री. जगन्नाथ रा. कल्याणी** — अध्यक्ष

अखिल भारतीय स्वकुळ साळी समाज

---

हा अखिल भारतीय स्वकुळ साळी समाजाचा कार्य अहवाल आपण पाहिला आता आपण बंगलोर येथे संपन्न होत असलेल्या १० व्या महापरिषदेस जाऊया. जय जिव्हेश्वर

❋❋❋❋❋

## असे करा!

बोलायचे तर खरे बोला.
अप्रिय वाटले तरी सत्यच बोला.
घ्यायचे तर सद्‌गुण घ्या.
द्यायचे असेल तर प्रेम द्या.
जोडायचे असेल तर सन्मित्र जोडा.
सोडायचे असेल तर दुर्गुण सोडा.
चालायचे तर ध्येय पथावर चाला.
वागायचे तर माणूसकीने वागा.

## आकर्षक व्यक्तिमत्व कोणते?

तोंडावर सदैव प्रसन्न हास्य, स्वच्छ आचरण, मृदुमधुर वाणी, साधी रहाणी उच्च विचार सरणी, जिद्दी तडफदार बाणेदार वृत्ती, उदंड उत्साह, दुसऱ्याला आपलेसे करण्याची हातोटी, या साऱ्यांच सुरेख संगम म्हणजेच आकर्षक व्यक्तिमत्व यामुळे मित्र जोडता येतात. दुसऱ्यावर छाप पाडून कार्याचा ठसा उमटवून इतरांच्या हृदयात स्थान मिळवता येते, प्रयत्नाने आपल्या व्यक्तिवत्वाला पैलू पाडता येतात.

# १० वी महापरिषद - बेंगलोर
## (ई. सन १९८६)

आदरणीय बंधु, भगिनी व मातांनो,

सप्रेम नमस्कार ! मागील पुणे अधिवेशनात दिलेल्या आश्वासनाप्रमाणे मी आज आपणास बेंगलोरला नेत आले. कारण येथेच आपल्या समाजाचे दशकीय अधिवेशन (महापरिषद) संपन्न होत आहे. तर चलो बंगलोर ! चलो बेंगलोर !! बेंगलोर म्हणजे कर्नाटकची राजधानी.एक औद्योगिक व ऐतिहासिक शहर रेशीम उद्योगाची, सिनेसृष्टीची व सांस्कृतिक केंद्राची एक अग्रगण्य नगरी ! तसेच निसर्गरम्य हिल स्टेशन ! नयनमनोहर सरोवरांनी नटलेले, हिरव्यागार झाडा झुडपांनी झाकलेले, असंख्य बागबगिच्यातील रंगी - बिरंगी फुलांनी बहरलेले, डवरलेले, सदाबहार शहर म्हणजे बंगलोर ! दक्षिण भारताचे नंदनवन ही उक्ती यथार्थ वाटते.

बंधुंनो, चला तर प्रस्थान करू या बेंगलोरला येथेच आपल्या समाजाची अ. भा. महापरिषद दि. १४ व १५ डिसेंबर रोजी संपन्न होत आहे. बेंगलोर म्हटल्यावर आपणास आठवण झाली त्या समाज भूषण कै. मातृभाई खंडप्पाणांची सन १९१६ प्रथम अधिवेशन हुबळीचे अध्यक्ष आठवण होते - सन १९२९ मध्ये आळंदीचे ५ वे. अ. भा. अधिवेशनाचे अध्यक्षपद ज्यांनी भूषविले होते ते कै. विठ्ठलराव गंगाधर त्यांच्या या कर्मभूमीला अभिवादन करण्यासाठी चला ःजाऊ या बेंगलोरला !

## स्थळ आहे - काचमहाल, लालबाग.

आज रविवार दि. १४/१२/१९८३, रविवार - (प्रथमसत्र - सकाळी ९ वा.)

चला आपणही सभामंडपात जाऊन बसूया ! कार्यक्रम पत्रिकेप्रमाणे कार्यक्रमास सुरूवात होत आहे. प्रथम मा. श्री. डी. एल. चिल्लाळ यांचे शुभहस्ते राष्ट्रीय ध्वजाचे आरोहण करण्यात आले. नंतर समाजाध्यक्ष मा. श्री. जगन्नाथराव कल्याणी यांचे शुभाहस्ते ॐकारयुक्त स्वकुळ ध्वजारोहण करण्यात आले. त्याप्रसंगी आळंदचे स्वकुळ महर्षी श्री. भिमाशंकर चं. साखरे यांनी स्वरचित - सुस्वरात स्वकुळ ध्वजगीत म्हटले. ईशस्तवन म्हटले आणि उपस्थित सर्व बंधुभगिनींनी ध्वजास मानवंदना केली. या परिषदेचे उद्घाटक - कर्नाटक राज्याचे विधानसभा सभापती मा. श्री. बी. जी. बणकार बी.ए.एल.एल.बी. यांनी भगवान जिव्हेश्वरांच्या प्रतिमेस पुष्पमाला अर्पण केली समईज्योतीचे प्रकाशन केले. नंतर स्वागत समितीचे अध्यक्ष

श्री. ग्यानोबा एकबोटे बी.एस.सी.एल.एल.बी. यांनी सर्व आजी माजी मान्यवर पदाधिकारी - परिषदेस उपस्थित समाज बंधु भगिनींचे हर्दिक स्वागत केले. आणि या परिषदेचे नियोजित अध्यक्ष स्वकुळरत्न श्री. रामचंद्रराव कल्याणी यांना स्थानग्रहण करण्याची विनंती केली. त्याप्रमाणे ते स्थानापन्न झाले. महिला अध्यक्ष श्रीमती विशालाक्षी एन्.टोणपे यांनी पण स्थानग्रहण केले. बंधुंनो या परिषदेत कोणकोण मान्यवर समाज सेवक उपस्थित आहेत ते आता बघू या ! ते पहा - माजी (पुणे) परिषदेचे अध्यक्ष - श्री. शंकररावजी एडके, हरिद्वारा चे महामंडलेश्वर गणेशनंद स्वामी, प्रमुख अतिथी म्हणून - आध्रं प्र. कायदेमंत्री - मा. लक्ष्मीसागर, केंद्रीयमंत्री मार्गारिट अल्वा कर्नाटक सहकार मंत्री - मा. आर. एल. जालप्पा, बेंगलोरचे मेयर - श्री. बी. व्ही पुट्टेगौडा, बेंगलोर महानगर पालिका सदस्य - श्री नारायणस्वामी व श्री कृष्णप्पा. त्याच प्रमाणे माजी सरकार्यदर्शी श्री. भंडारे गुरूजी, अ. भा. सरकारदर्शी श्री. वामनराव ग. कोऱ्हाळकर, श्री. डी. एल. चिल्लाळ. महाराष्ट्र अध्यक्ष - श्री. माधवराव गो. साळी. कर्नाटक अध्यक्ष - श्री. विठ्ठलराव सुरजकर, आंध्रचे अध्यक्ष - श्री. नरसंगराव कोंगे, श्री. जनार्दनपंत कांबळे, गुजराथ अध्यक्ष- श्री. विजयलाल बा. लोणकर तसेच श्री. अक्कडकर, सर्वप्रांताचे सहकार्यदर्शी या परिषदेत महिलावर्ग ही मोठ्या प्रमाणात उपस्थित आहेत. आणि आपल्या लक्षणीय सांख्यिकी उपस्थितीने सभामंडप भरगच्च भरला आहे. आम्ही पण यापुढे समाजकार्यात सहभागी राहू हे त्यांनी दाखवून दिले आहे. त्यात बेंगलूरच्या श्रीमती सुलोचना नरसिंहमूर्ती, श्रीमती पद्मावती सवासिरे, श्रीमती शकुंतला शं. भंडारे, श्रीमती शांताबाई सरोदे, श्रीमती कलावती शि. मातृभाई, बाहेरगावाहून - श्रीमती तुळसाबाई घोस, उषाताई कांबाळे, शांताबाई जंत्रे, अंबुताई शिखाळकर, मंगला जरंग, शुशिला सरोदे, ताराबाई धोत्रे, इत्यादी सर्व प्रांतातील प्रतिनिधी या परिषदेत हजर आहेत

आता रितसर कामकाजास सुरूवात झाली आहे. प्रथम स्वागताध्यक्षांनी अध्यक्ष श्री. रामचंद्रराव कल्याणी यांचा परिचय करून दिला.तोअसा - श्री. रामचंद्रराव हे नारायणपेठचे ९ वर्ष नगराध्यक्ष होते.निजाम सरकार विरूद्धच्या लढ्यात ते अग्रणी होते. ते थोर स्वातंत्र सैनिक आहेत. आर्यसमाजाचे अध्यक्षही ते होते. आपल्या समाजाचे सन १९६२ हुबळी परिषेदचे तेच अध्यक्ष होते. हा मान त्यांना दुसऱ्यांदा मिळत आहे. आंध्रचे ते माजी मंत्रीही होते. आगर्भ श्रीमंती असूनही साधी व निगर्वी राहणी गरीबसमाज बांधवांबद्दल कळवळा, उत्तम चरित्र, निर्दोष कार्यपद्धती, समतोल विचार अशा या स्वकुळ रत्नाचा प्रकाश समाजास मिळत आहे. अशा या समाजभूषण व्यक्तिने आजचे अध्यक्षस्थान स्विकारल्याबद्दल आपणास अभिमान वाटणे साहजिक आहे.

त्यानंतर कन्नड भाषेतून लिहिलेल्या स्मरणिकेचे प्रकाशन मेयर पुट्टेगौडा यांचे शुभहस्ते करण्यात आले. त्यानंतर अ. भा. स्व. सा. चे सरकार्यदर्शी श्री. वामनराव कोन्हाळकर (कल्याण) यांनी सन १९८० ते १९८६ या कालावधीत अ. भा. व प्रातीय पदाधिकाऱ्यांनी केलेल्या विविध विधायक समाज कार्याचा अहवाल परिषदेपुढे वाचून दाखवीला. (स्वकुळ समाचार - मार्च ९९ च्या अंकात - भाग - १ला प्रकाशित झाला तोच हा अहवाल होय). दिवंगत समाज बंधुभगिनींना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यानंतर मा. श्री. जगन्नाथ कल्याणी (पुणे) यांनी पण त्याचे अध्यक्षिय कारकिर्दीतील कामकाजाचे थोडक्यात आढावा घेतला, (मध्यंतर - भोजन, विश्रांती).

## (सत्र दुसरे - दुपारी 3.3० वा)

बंधुंनो-सर्व मान्यवर सथानापन्न झाले आहेत. पुढील ठराव चर्चेसाठी घेण्यात आले. त्यावर अनेक समाजबंधुभगिनींनी आपले विचार मांडल. चर्चा झाली आणि त्या विचारमंथनातून ठरावरत्न मंजूर झाली. ती अशी.

## विषय -

### १) धार्मिक -

१) श्रावण शुध्द १३ (त्रयोदशी) यादिशी भगवन जिव्हेश्वर उत्सव सर्व गावात/शहरात उत्साहाने साजरा करणेत यावा. त्या दिवशी मुले, मुली, समाजातील तरुण-तरुणींच्या कलागुणांना वाव द्यावा. विविध स्पर्धा ठेवाव्यात गुणदर्शनाचा कार्यक्रम आयोजित करावा, बक्षिसे वाटावित.

२) भगवान जिव्हेश्वरंचे चरित्र अर्थात साळी महात्म पुराण छापून तयार आहे. हा ग्रंथ प्रत्येक समाज बंधुभगिनींनी वाचावा/ऐकावा. सन १९६८ साली अदोनी येथे संपन्न झालेल्या महापरिषदेत ऐरणी येथील मठाधिपती जगद् मुप्पीनार्थ स्वामींना अ.भा.स्व. साळीसमाजाचे धर्मगुरु व मठाला धर्मपीठाची मान्यता देण्यात आली. परंतु मठाचे उत्तराधिकारी स्वामीजींनी केंदोळे व्यक्तची नेमणूक न केल्यने व ते धर्मपीठ साळी समाजाचे नाही असे निवदन स्वतः स्वामीजींनीचॅरिटी कमिशनर पुढे दिले. व उत्तराधिकारीही अन्य समाजाचा नेमला. करिता अ.भा.स्व.साळी समाजाने दिलेली सदरहु धर्मपीठाची मान्यता काढून घेण्यात यावी. तसेच पुणे अधि त गुरुदक्षिणा पाठविण्याबद्दलचे आवाहन मागे घेण्यात यावे. चर्चा झाली ठराव मंजुर होऊन मान्यता काढून घेण्यात आली.

**२) सांस्कृतिक -**

१) उपनयन, विवाह, आदी संस्कार वैदीक पध्दतीने करावेत.त्याचे पौराहित्य (ब्राह्मणाचे काम) आपल्या समाजातील व्यक्तींनी करावे. या विषयावरील मार्गदर्शन पुस्तक श्री. भिमाशंकर साखरे (आळंद) यांनी लिहून पूर्ण केले आहे. ते छापून सर्वांना उपलब्ध करुन देण्यात येईल.

२) सामुदायिक विवाहांना प्रोत्साहन द्यावे.

३) प्रतिवर्षी राज्यस्तरावर वधुवर स्थळांची यादी प्रसिध्द करावी.

४) वरपक्षाने हुंडा घेऊ नये.

५) अंत्यविधीचे अनिष्ट प्रकार बंद करावेत.

**3) ऐतिहासिक** - स्वकुळ साळी समाजाचा साद्यंत्य इतिहास श्री. ग्या. रा. भंडारे (गुरुजी) यानी लिहलेला आहे. हा इतिहास पुस्तक रुपाने प्रसिध्द करुन सर्वांना उपलब्ध करुन देण्यात येईल. त्याचे वाचन सर्वांना करावे.

**४) सामाजिक -**

१) प्रत्येक गाव/शहरातील स्व. सा. समाजाच्या संस्थांना आपापल्या गाव/ शहरातील खाने सुमारी पूर्ण करावी. ही माहिती राज्य अध्यक्षांकडे लेखी पाठवावी. त्यांनी संकलीत करुन अ.भा.स्व.सा.स. अध्यक्षांकडे पाठवावी. त्यांनी ही सर्व माहिती संकलत करुन सर्व साने सुमारीचा अहवाल तयार करावा. खानेसुमारी दर ५ वर्षांनी किंवा महापरिषदेपूर्वी पूर्ण करण्यात यावी. सदरहू अद्ययावत माहिती महापरिषदेत सादर करावी.

२) सामाजिक आचारसंहिता व कार्यपध्दती - आदेश १) अ.भा. तील सर्व समाजबांधवांनी एकमेकांशी विचार विनिमय करावा. मन्वय साधावा व संघशक्ती वाढवावी. २) प्रत्येक गाव/शहरातील समाजसंस्थांनी समाजाची संघटना बांधून समाजात विधायक कार्य करण्यात प्रवृत्त करावे. ३) सर्व राज्यात जिल्हा निहाय व विभागीय संस्था स्थापन कराव्यात. ४) गाव/ शहर, जिल्हा, विभाग, राज्य व अ.भा. स्तरावर पास झालेल्या ठरावाची कार्यवाही पूर्ण करण्यासाठी तरुण कार्यकर्ते तयार करावेत.

३) १) स्थानिक संस्था गाव/शहर येथील संस्थांनी आधी स्वकुळ साळी समाज असे लिहून - त्यापुढे गाव/शहराचे नाव लिहावे. उदा. स्व. साळी समाज- कोल्हापूर. २) जिल्हा, विभाग आणि राज्यसंस्था यांनी मात्र आधी जिल्हा विभाग, राज्य नाव लिहून पुढे स्वकुळ साळी समाज असे लिहावे. उदा.

नाशिक जिल्हा स्व.सा. समाज मराठवाडा विभाग स्व.सा. समाज कर्नाटक राज्य स्व.सा.स. वरील कोणत्याही संस्थांनी अखिल भारतीय संस्था असेनामाभिधान लावू नये.

४) गाव/शहर, जिल्हा, विभाग, राज्य या सर्व संस्था एकमेकाशी संलग्न असाव्यात गाव/शहर जिल्ह्याशी, जिल्हा विभागाशी, विभाग राज्याशी परस्पर संलग्न राहातील. कोणतीही नवीन संस्था स्थापन करण्यापूर्वी राज्याची अनुमती घ्यावी. त्यांनी राज्याच्या धोरणानुसार किंवा अनुमती घेऊन कार्य करावे. तसेच सर्व राज्यांनी अ.भा.स्व.साळी समाजाच्या धोरणानुसार कामे करावीत.

५) गाव/शहर, जिल्हा, विभाग यांनी नवीन योजना आपापल्या बळावर आखून पूर्ण कराव्यात. राज्य किंवा अ.भा.स्व.साळी समाजाकडून आर्थिक मदत पाहिजे असल्यास योजना हाती घेण्यापूर्वी राज्याशी आणि अ.भा.स. ची अनुमती घेणे आवश्यक आहे.

**५) शैक्षणिक**

१) स्वकुळ साळी समाजातील गरीब व होतकरु विद्यार्थ्यांना परत फेडीच्या करारानुसार माध्यमिक, तांत्रिक, उच्चस्तरीय शिक्षणासाठी विधावर्धक संघाची स्थापना करावी.

२) पदव्युतर, वैद्यकीय, इंजिनिअरिंग, तांत्रिक या विभागाच्या गरीब विद्यार्थ्यांना परत फेडीच्य करारानुसार अ.भा.स्व.सा. विद्यावर्धक संघ मदत करील.

३) शैक्षणिक मदतीसाठी स्थानिक संस्थांनी आपापल्या गावातून निधी संकलन करावे. राज्य संस्थांनी आपापल्या राज्यातून हा निधी संकलन करावा. अ.भा. विद्यावर्धक संघाने भारतातील सर्व राज्यातून निधी संकलन करावा.

**६) औद्योगिक व व्यवसायिक मार्गदर्शन** - स्थानिक संस्थांनी गरजू बांधवांना बँका, सरकारी, वित्त महामंडळाकडून मिळणाऱ्या आर्थिक सवलती योजना सांगावयात, मार्गदर्शन करावे. समाजातील उच्च पदस्थ अधिकाऱ्यांनी होतकरु, सुशिक्षित बेकार तरुणांना नोकरी लावून देण्यास मदत करावी.

लघुउद्योगांना आर्थिक मदत देण्यासाठी पतपेढ्या स्थापन कराव्यात.

गरजू उद्योजक बांधवंना मार्गदर्शना - करिता तज्ञ समिति नेमावी.

स्थानिक संस्थांनी - शासनामार्फत उपलब्ध असणाऱ्या शैक्षणिक, औद्योगिक, वैद्यकीय, सवलती, आर्थिक मदत इ. माहिती समाजास द्यावी.

सोमवार दि.१५ डिसेंबर १९८६ (सत्र १ले वेळ - स. ९ वा.)
सर्व मान्यवर व उपसथित बंधुभगिनी समामंडपात स्थानापन्न झाले.

७) **स्व. साळी समाजाचा भट क्या जमातीत (शेड्युल ट्र ाईबज) समावेश करुन घेणे** - स्वकुळ साळी समाजाचा विणकाम - हातमाग व्यवसाय मागे पडल्याने विणकर साळी कुटूंबांना रोजगार नाही, हातांना काम नाही. त्यामुळे उपासमारीची पाळी आली. रोटी रोटी साठी मूळ गाव, घरेदारे सोडून भटकंती नशिबी आली. अपुरे शिक्षण, आर्थिक दारिद्र्य, दुसऱ्या धंद्याचे अज्ञान त्यामुळे साळी कुटुंबियांची दैन्यावस्था झाली. दोन वेळच्या भाकरीस महाग झाले. अशा परिस्थितीत जगणे कठीण झाले. करिता राज्य व केंद्र सरकारने या समाजाचा भटक्या जमातीत समावेश करावा. त्यांना शैक्षणिक, व्यवसायिक, औद्योगिक, आर्थिक सहाय्य करावे. तसेच सहकारी व शासकीय क्षेत्रात सुलभतेन नोकऱ्या मिळवून द्याव्यात.

८) **मासिक पत्रिकाद्वारे समाजाचे प्रबोधन करणे** - जय जिव्हेश्वर व अन्य समाज मासिक पत्रिकेत स्थानिक संस्था राज्याने उपवर-वधु यादी प्रसिध्द करावी. पालकाकडून माहिती मागवावी. त्याची फी ठेवावी व प्रसिध्दी द्यावी. समाजातील थोर व्यक्ती, कर्तबगार समाज सेवक, उद्योजक, उद्योगपती उच्च शिक्षित अधिकारी, कलाकार, लेखक, कवि, नगरसेवक, वकील, डॉक्टर, इंजिनिअर, जज्ज, उच्च स्था. सं. पदाधिकारी, गुणवान व्यक्ती इ. चा परिचय प्रसिध्द करावा. त्यांची माहिती मागवावी. सोबत देणगी मागावी. विद्यान, धर्म निती, शिक्षण, इत्यादी विषयावर लेख मागवून ते प्रसिध्द करावेत. हुंडा न घेणाऱ्या व अल्प खर्चात लग्न लावणाऱ्या वधु-वरांचा गौरव करावा. फोटो द्यावेत.

९) **घटना दुरुस्ती** - अ.भा.स्व. साळी समाजाची २२ कलमी घटना - पुणे अधिवेशन १९७७ मध्ये मंजूर करण्यात आली. परंतु गरजेप्रमाणे, वेळोवेळी त्यतील काही तपशीलात, कार्यकारणीने सर्व सांघाटक सभेत दुरुस्त्या करणे, नवीन पोटकलम घालणे. किरकोळ फेरफार करणे आवश्यक वाटल्याने त्या संमत केल्य अशा सर्व घटना-दुरुस्तीस मान्यता देण्यात आली.

१०) **पंढरपूर येथील जमीन मिळकत बाबत** - पंढूरपूर येथील सर्वे नं.१२९९/अ ही मिळकत - स्व.सा.स तर्फे ७ जणांच्या ट्रस्ट्रींच्या नावे - नगर भूमापन कार्यालय पंढरपूर येथे नोंदलेली होती. परंतु ती वैयक्तीक नावे कमी करुन सदरहु मिळकत

अ.भा.स्व.साळी समाजाचे नावे भूमापन-कार्यालय पंढरपूर येथे नोंदवून घेण्यात यावी. सदरहू ठराव समाजाच्या सर्व साधारण सभेत दि. ४ मे १९८६ रोजी पंढरपूर येथे मंजूर करण्यत आला. त्याला महापरिषदेने संमती दिली.

११) **सन्मान-गौरव** - समाजातील थोर समाज सेवक, परोपकारी, प्रतिभाशाली आणि गौरव प्राप्त व्यक्तींचा संस्थांनी सन्मान करावा. तसेच आपल्या समाजास सहाय्य करणाऱ्या इतर समाजातील व्यक्तींचाही सन्मानगौरव करावा.

१२) **अ.भा. व राजकिय समिती** - सदस्य, पदाधिकारी निवड पुढे योग्य वेळी होईल.

13) **पुढील महापरिषद ?** पुढील काळासाठी अ.भा. महापरिषदेचे स्थान/राज्य निश्चित झाले नाही. कारण त्यासाठी इच्छूक राज्याने निमंत्रण द्यावे लागते. ते आले नाही. बंधुंनो ठराव संपले. चला आता भोजनासाठी!

## (सत्र २ रे दुपारी - 3.3० वा.)

दुपारुन भगिनींचे संमेलन झाले. त्यात अनेक भगिनींनी आपले विचार मांडले. त्यात विविध विषयावर चर्चा झाली. महिलांनी मुलांच्या शिक्षणाकडे लक्ष द्यावे. वेळ काढून स्वतः होमवर्क घ्यावे. सुसंस्कार करावेत. प्रार्थना, श्लोक पाठांतर करुन घ्यावेत. तसेच कपडे, आरोग्य, आहार यकडे विशेष लक्ष द्यावेत. तसेच शारिरीक वाढीसाठी स्वस्त पौष्टीक आहार द्यावा. खेळ खेळण्यास प्रोत्साहन द्यावे. घर, परिसर स्वच्छता शुध्दता ठेवावी. घरातील वातावरण धार्मिक, मंगलमय व हसरे ठेवावे. घरच्या संसारास हातभार लागेल अशी आर्थिक प्राप्तीचे मागे शोधावेत. न पेक्षा आपल्या प्राप्तीनुसार काटकसरीने संसार करावा. दुसऱ्याचा हेवा करु नये. घरातील टाकाऊ वस्तूंचा कसा उपयोग करता येईल ते पहावे. जिव्हेश्वर उत्सवात सहभागी व्हावे. हळदीकुंकु समारंभाचे आयोजन करुन एकमेकांचा परिचय वाढवावा. ह्या परिषदेचा हा संदेश आपापल्या गावच्या महिला मंडळात पोहचवावा.

## (सत्र 3 रे दुपारी ५.3० वा.)

या सत्रात परिषद अध्यक्ष श्री. रामचंद्रराव कल्याणी यांचे प्रभावी भाषण झाले. त्यात त्यांनी अ.भा.क्रि. सं ने १९६२ पासून केलेल्या विधायक कार्याचा

आढावा घेतला. समाज नेत्यांना व कार्यकर्त्यांना समाज जागृती केल्याबद्दल धन्यवाद दिले. औद्योगिक, शैक्षणिक, आर्थिक समस्यातून कसा-कसा मार्ग काढता येईल? याचे उद्‌बोधक्त केले. तसेच समाजातील हुंडापध्दत बंद होणेसाठी नवतरुण तरुणींनीच पुढाकार घेण्याचे आवाहन केले. लग्नासाठी अवाजवी, डामडौली खर्चावर टीका केली. काही अनिष्ट रितीरिवाज बदलण्याचे आवाहन केले. तसेच समाजाची संघशक्ती वाढविणेसाठी पोटभेद नष्ट करा. नव-युवक-युवतींनी पुढे यावे. असे आग्रही प्रतिपादन केले. अध्यक्षस्थान दिल्याबद्दल सर्वांना अभिवादन केले. व कृतज्ञता व्यक्त केली. त्यानंतर स्वागताध्याक्ष श्री. ग्यानोबा एकबोटे यांनी सर्व समाज बांधवांचे आभार मानले. मान्यवरांना पुष्पगुच्छ दिले. महामंडलेश्वर गणेशनंद स्वामींना सर्वांना वंदन करुन आशिर्वाद घेतला. शेवटी राष्ट्रगीत झाले व या १० व्या महापरिषदेची सांगता झाली.

तर बंधुंनो - बेंगलोरच्या मुक्कामात, स्वागत समितिने निवास, भोजन कॉफी पान व्यवस्था उत्तम ठेवली होती. त्यांना धन्यवाद देऊ या!

माझ्या प्रिय बंधु-भगिनींनो-आजपर्यंत या शतकातील म्हणजे सन १९१६ पासूनचे, आपल्या समाजाच्या दहा अधिवेशनाचे वृत्तांत मी आपणास निवेदन केले आहेत. त्यासाठी स्वकुळ समाचारच्या माध्यमातून ते आपणापर्यंत पोहोचले आहेत. त्या व्यासपीठाच्या प्रकाशन सहकार्यामुळेच हे शक्य झाले आहे. म्हणून त्यांचे आभार मानण्यास माझेजवळ शब्द नाहीत. त्यांना शतशः धन्यवाद देऊ या! तसेच माहिती संकलनासाठी मला श्री. भिमाशंकर साखरे, श्री. ल.रा. लोणकर, श्री. डी.ए. चिल्लाळ, श्री. निवृत्ती ज्ञा. पावले, व अनेकांनी दिलेल्या सहकार्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे.

बंधुनो-वृत्त निवेदनात तपशिलात माझेकडून थोडीफार चूकही झाली असेल. चूकभूल झाली असेल तर उदार अंतःकरणाने मला क्षमा करा. या बालकाकडून झालेल्या क्षुल्लक दोषाकडे दुर्लक्ष करुन आपल्या मान्यवरांनी केलेल्या डोंगराएवढ्या समाजकार्याकडे लक्ष द्या। त्यातून बोध द्या।। २१ व्या शतकाकडे झेपावतांना एकी संघटनेच्या बळावर गरुड भरारी घ्या। समाजाला उन्नत करा।। भविष्यत प्रत्येक व्यक्ती, सर्व कुटूंबे व सर्व समाज प्रगत होवो। वैभवशाली होवो।। ही भगवान श्री जिव्हेश्वर चरणी प्रार्थना करतो.

*****

# अखिल भारतीय स्वकुळ साळी समाज
# ११ वी महापरिषद - अदोनी

## इ. सन (२००१)

## कार्यक्रम पत्रिका

शनिवार दि. १२ मे २००१

### * उद्घाटन समारंभ *

**सत्र पहिले - सकाळी १०.३५ के दुपारी १.३०**

१. ध्वजारोहण - अध्यक्ष अ.भा.स्व. साळी आणि ध्वज गीत.
२. श्रीमत भगवान जिव्हेश्वर पुजन व आरती.
३. दीप प्रज्वलन - महापरिषद प्रारंभ
४. स्वागताध्यक्षांचे स्वागतपर भाषण व मान्यवर अतिथींचा परिचय
५. अ.भा. साळी अध्यक्षांचे प्रास्ताविक व निवेदन
६. स्मरणिका प्रकाशन - स्मरणिका समितीचा परिचय
७. मान्यवर अतिथींची भाषणे
८. मान्यवर अतिथींचा सत्कार व स्मृती चिन्ह प्रदान
९. स्टॉल्सचे उद्घाटन
१०. आभार प्रदर्शन - दुपारी १.३० ते ३.०० भोजन व विश्रांती

**सत्र दुसरे - दुपारी ३.०० ते रात्री ८.००**

१. दिवंगत समाज व्यक्तींना श्रद्धांजली.
२. महापरिषद अध्यक्ष माननीय श्री. जगन्नाथरावजी कल्याणी (पुणे) यांचा परिचय.
३. महापरिषदेचे अध्यक्षस्थान ग्रहण करण्याची विनंती व सन्मान
४. अ.भा.स्व. साळी समाजाचे प्रधान कार्यदर्शीकडून संस्थेच्या कार्याचे अहवाल वाचन
५. महापरिषदेच्या विषय पत्रिकेवरील ठराव, आदेश इ. चर्चा.
रात्री ८.०० ते ९.३० भोजन
६. रात्री ९.३० ते १२.०० मनोरंजन कार्यक्रम

## रविवार १३ मे २००१

### सत्र पहिले - सकाळी ९.०० ते दुपारी १.३०

१. महापरिषदेच्या विषय पत्रिकेवरील ठराव, आदेश इ. चर्चा
दुपारी १.३० ते३.३० भोजन व विश्रांती

### सत्र दुसरे- दुपारी ३.३० ते संध्याकाळी ५.०० महिलांचे संम्मेलन

१. माननीय महिला अध्यक्षांचे आगमन व स्वागत.
विषय - स्वकुळ साळी समाजातील महिलांचे स्थान व अपेक्षा यावर चर्चा व ठराव.
२. खुले अधिवेशन दुपारी ३.३० ते ५.००

विषय- अ. स्वकुळ साळी समाजाचा राष्ट्रीय स्तरावर मागासवर्गीयात समावेश करावा किंवा करू नये.
ब. शासनाकडुन मिळणाऱ्या सोयी सवलती व लाभ यावर चर्चा

### सत्र तिसरे - सायंकाळी ५.३० ते रात्री ९.००

१. अ. भा. स्व. साळी समाजाचे अध्यक्ष व कार्यकारी मंडळाच्या पदाधिकारी निवड करणे.
२. महापरिषदेच्या विषय पत्रिकेवरील ठराव, आदेश इ. चर्चा
३. महिला सम्मेलनातील ठरावांची स्वीकृती ?
४. अ.भा. स्वकुळ साळी समाजाचे मावळते अध्यक्ष व प्रधानकार्यदर्शी यांचे मनोगत
५. अ. भा. स्वकुळ साळी समाजाचे नुतन अध्यक्षांचे मनोगत
६. समारोपाचे भाषण - महापरिषदेचे अध्यक्ष
७. आभार प्रदर्शन - स्वागत समितीचे अध्यक्ष
८. महापरिषदेची सांगता व राष्ट्रगीते
रात्री ९.०० ते १०.३० भोजन

आपले नम्र,

| | | |
|---|---|---|
| पांडुरंगराव वि. येलीगे | दत्तात्रय अ. चिल्लाळ | दत्ता सो. भंडारे |
| स्वागताध्यक्ष महापरिषद | अध्यक्ष अ.भा.स्व.सा.स. | अ.भा.स्व.सा.स. प्रधान कार्यदर्शी |

# अखिल भारतीय स्वकुळ साळी समाज

विषय नियमक समितीने सुचित केलेली आणि अ.भा.स्व.सा. समाज संस्थेने १ एप्रिल २००१ इचलकरंजी सभेत मान्य केलेली

## महापरिषदेची विषय सुची

## *सुचित ठराव*

**अ. धार्मिक:**

१. ठराव असा करण्यात येत आहे की श्री जिव्हेश्वर महाराज की जय ! ही घोषणा समाजाच्या धार्मिक प्रसंगी सर्व ठिकाणी होत असते. त्यमध्ये "भगवान श्री जिव्हेश्वर की जय" ! असा योग्य तो सुधारीत बदल "भगवान" या शब्दाने महाराज हा शब्द काढून टाकावा

- दत्ता भंडारे (मुंबई), श्यामसुंदर सपारे (धर्मावरम)

२. ठराव असा करण्यात येत आहे की, सर्व भारतीय भाषेतील पंचांगांमध्ये आणि दिनदर्शिका मध्ये हिंदू वर्षानुसार श्रावण शुद्ध त्रयोदशी (१३) प्रदोष या दिवशी श्री जिव्हेश्वर जयंती असा स्पष्ट उल्लेख करण्यात यावा.

- के. टी. सरोदे (नासिक), वसंत अक्कडकर (अहमदाबाद)

**ब. घटना दुरूस्ती:**

१. ठराव अस करण्यात येत आहे की, वेळोवेळी झालेल्या अ. भा. स्वकुळ साळी समाज संस्थेच्या सर्व साधारण १० व्या महापरिषदेपासून ते ह्या महापरिषदेपर्यंत मान्य झालेले घटना कलम दुरूस्तीचे ठराव आणि घटना सुधारणा समितीने सुचविलेल्या अपेक्षित घटना सुधारणा ही ११ वी महापरिषद मान्यता देत आहे.

- रमेश चिल्लाळ (हुबळी)

२. ठराव असा करण्यात येत आहे की, स्वकुळ साळी समाज संस्थांच्या प्रत्येक स्तरांवरील कार्यकारी मंडळांमध्ये महिलांसाठी प्रतिनिधीत्व आरक्षित करण्यात येत आहे. तत्संबंधीची नोंद घटनेमध्ये यावी.

- सौ. विजया प्र.एकबोटे (नारायणपेट), सौ. कीर्ति दी. दळवी (डोंबिवली)

**क. सामान्य :**

१. ठराव करण्यात येत आहे की, अ. भा. स्वकुळ साळी समाज संस्थेच्या झालेल्या सर्व साधारण सभांमधून सामान्यपणे मान्य झालेल सूचनावजा ठराव, विषयपत्रिकेत समाविष्ट करण्याचा, विषय नियामक समितीने घेतलेल्या निर्णयानुसार अ. भा. स्वकुळ साळी समाज संस्थेने दिलेले आदेश खालील प्रमाणे नमुद करण्यात येत आहेत.

**आदेश :**

◆ अ. भा. स्वकुळ साळी विद्यावर्धक संघ ही संस्था स्वतंत्र न ठेवता ती, अ. भा. स्वकुळ साळी समाज संस्थेमध्ये विलीन करावी.

- मोहन एकबोटे ( हुबळी) / वसंत वाव्हळ (मालेगांव)

◆ प्रत्येक राज्य कार्यकारी मंडळाने विवाह देणगी राज्यातील सर्व संस्थांची सारखीच करावी. दोन्ही पक्षांकडुन (वधु - वर) समान घेण्यात यावी.

- कोल्हापूर जिल्हा

◆ कोणत्याही स्वकुळ साळी संस्थेने, कुठल्याही प्रकारची देणगी, दुसऱ्या क्षेत्रातील स्थानीक, जिल्हा व राज्य संस्थांच्या ज्ञातीजनांकडून घेण्यापूर्वी संबंधीत पूर्व लेखी अनुमती घ्यावी.

- इचलकरंजी संस्था

◆ जर एखादा ज्ञातीजन कुठलीही निवडणूक लढवीत असल्यास त्याला सर्वतोपरी सर्वांनी पाठींबा द्यावा . -अदोनी समाज

◆ सर्व राज्य कार्यकारी मंडळाने आपापल्या राज्यात जनगणना कार्य शक्यतो लवकर पूर्ण करावे जरूर भासल्यास वेतनतत्वावर पूर्ण करावे - अ. भा. स्व. सा. समाज अध्यक्ष

◆ उपवर वधू मेळावे वर्षातून एकदाच जिल्ह्यामध्ये घ्यावेत. त्यासाठी राज्यकार्यकारी मंडळाची लेखी अनुमती घ्यावी. - महाराष्ट्र राज्य

◆ भगवान श्री जिव्हेश्वराचे भावचित्र घटनेत नमुद केल्याप्रमाणे उभट आयाताकृती (एकस दीड) प्रमाणात मोठ्या आकारात पुनर्मुद्रीत करावे - रत्नागिरी जिल्हा समाज

◆ हातमागांसाठी लागणारा कच्चा माल सवलतीच्या दरामध्ये तसेच यंत्रमागांच्या नुतनीकरणांसाठी केंद्र / राज्य शासनाने अनुदान द्यावे - नासिक समाज

- वस्त्रोद्योग महामंडळ केंद्र / राज्य शासनाने स्वकुळ साळी समाजाच्या किमान एका जाणकार व्यक्तिची नियुक्ती करावी.

- नासिक जिल्हा समाज

- स्थानिक संस्थेचे आपल्या संस्थेच्या नावाचा फलक गावाच्या प्रवेश द्वारी .... स्वकुळ साळी समाज आपले सहर्ष स्वागत करीत आहे असा लावावा.

- श्रीरामपूर समाज

- दशक्रीया विधी किंवा गंधमुक्ती १२, १३ वा दिवस जवळच्या नाते वाईकांकडून दुःखी कुटूंब प्रमुखांना टॉवेल व टोपी देण्यात येत असते. ही अनिष्ठ प्रथा व होणाऱ्या पैशांचा अपव्यय टाळून, सदर टॉवेल टोप्यांचा साठा टाळावा. त्याऐवजी संस्थांनी राज्यावर एकच पद्धत अवलंबून ठराविक रोख रक्कम देण्याची प्रथा स्वीकारावी.

- रायगड जिल्हा समाज

## —: चर्चेसाठी :—

१. अ. भा. स्वकुळ साळी संस्थेची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी करावयाची उपाय योजना - अ. भा. स्वकुळ साळी समाज

२. अ. भा. स्वकुळ साळी विद्यावर्धक संघाचा निधी वाढविण्यासाठी योजना आखणे - अ. भा. स्वकुळ साळी विद्यावर्धक संघ

३. स्वकुळ साळी समाजाने अखिल भारतीय स्तरांवर बॅकवर्ड क्लास / शेड्युल्ड कास्ट / शेड्युल्ड टाइब्ज वर्गामध्ये समावेश करून घ्यावा कां ?

- बंगलोर समाज

४. अखिल भारतीय क्षत्रिय महासंघात आपल्या स्वकुळ समाजाने अखिल भारतीय पातळीवर सामील व्हावे कां ? - हुबळी समाज

५. स्वकुळ समाजाने साळी समाजाचे धर्मपीठ व्हावे आणि धर्मगुरू आसावा यावर विचार करून आदेश द्यावा कां ? - कर्नाटक समाज

डी.ए. चिल्लाळ (गुलबर्गा)
अध्यक्ष

दत्ता सो. भंडारे (मुंबई)
प्रधान कार्यदर्शी


# आपला स्वकुळ ध्वज

आदरणीय बंधु-भगिनी व मातांनो सप्रेम नमस्कार! भारतदेश आपली मातृभूमी! तीचेच प्रतिक म्हणजे आपला तिरंगा राष्ट्रध्वज होय. दर राष्ट्रीय सणाला आपण त्याचे सन्मानपूर्वक आरोहण करतो. ध्वजगीत म्हणतो आणि त्यास मानवंदना देतो. त्यास वंदना म्हणजेच मेरा भारत महानला वंदना समजतो नाही का?

त्याचप्रमाणे आपल्या अखिल स्वकुळ साळी समाजाचे आद्यपुरुष भगवन जिव्हेश्वर व त्यांच्याच वंशाचा आपला साळी समाज अखिल भारतात विखुरलेला आहे. कालगतीत विणकाम धंदा-व्यवसाय विस्मृतीत गेला. पण समाजमात्र चिरंजीव आहे व विस्तारत आहे. आपण श्रावण शु.१३ ला भगवान श्री जिव्हेश्वरंचा उत्सव साजरा करतो. त्यावेळी अनेक उपक्रम पण घेतो. एकत्र जमतो. त्यावेळी सर्वप्रथम स्वकुळ ध्वजाचे आरोहण करुन मानवंदना द्यावयास पाहिजे. आपल्या समाजची अ.भा. ९ वे अधिवेशन सन १९७७ साली पुण्याला झाले. तेव्हा समाज संस्थेची घटना मंजूर करणेत आली. त्य घटनेतील कलम ५ नुसार आपला स्वकुळ ध्वज ॐकारायुक्त समभूज त्रिकोणीभगवा रंगाचा असावा. हे नमूद करण्यात आले आहे. तरी १) भगवान जिव्हेश्वर उत्सव २) लहानमोठी सर्व अधिवेशने ३) सामु. उप वधु-वर पालक मेळावे ४) सामु.विवाह सोहळा आदी विशेष प्रसंगी सर्व संस्थांनी सर्व प्रथम स्वकुळ ध्वजाचे आरोहण करावे. त्यास सर्व आबाल वृध्दांनी मानवंदना द्यावी. मग भ. जिव्हेश्वरांचे प्रतिमापूजन, समईज्योत प्रकाशन करुन मग इतर नियोजित कार्यक्रम घ्यावेत. बंधुनो-स्वकुळध्वजास वंदन म्हणजेच अखिल साळीसमाजास वंदन होय. मेरा भारत महान तसे मेरा समाज महान हीच भावना यातून जागृत होईल. (टीप - ध्वजासाठी कॉटन ऐवजी रेशमी कापडाचा ध्वज अधिक शोभायमान दिसेल.)

।। जय जिव्हेश्वर - जय स्वकुळ ।।

## स्वकुळ ध्वजाचे आरेखन




।। जय जिव्हेश्वर - जय स्वकुळ ।।

कृपया :

- ध्वजासाठी रेशमी कापड, रेशमी गोंडा,
- ॐकार सोनेरी पेंटींग किंवा सोनेरी कागदाचा चिटकवून.
- ध्वजस्तंभ नसल्यस बांबू/पाईप चालेल.
- एकदा केलेला ध्वज पुन्हा-पुन्हा वापरता येईल.

# ध्वजगीत

जय हो जय हो, ओउम् ध्वजाचा, स्वकुळांचा व मानवतेचा, जय हो ।।धृ.।।
सत्य अहिंसा वर्षविणारा,
न्याय समता दर्शविणारा,
विश्वचेतना दर्शविणारा,
मेरुदंड हा विश्व प्रेमाचा, जय हो ।।१।।
बन्धुभाव हा वाढविणारा,
श्रेष्ट कनिष्ट नष्टविणारा,
त्याग क्षमाला पुजविणारा,
योगक्षेम हा करे जनांचा, जयहो ।।२।।
स्वकुळ जनांच सदा विजय हो,
आर्य संस्कृती ध्रुव निश्चय हो,
स्वकुळ ध्वजाचा यश अक्षय हो,
प्राणिमात्रांना मंत्र शांतिचा जय हो ।।३।।

रचयिता - श्री. भीमाशंकर चन्नप्पा साखरे, मेनरोड, आळंद - ५८५ ३०२.

# आपली स्वकुळ रत्ने


श्री. रामचंद्रराव कल्याणी
हैदराबाद


श्री. शंकरराव एडके,
बागलकोट


ॲड.श्री. डी. एल्. चिल्लाळ
बागलकोट


कै. जी. आर. भंडारे (गुरुजी),

विनम्र
अभिवादन


श्री. भीमाशंकर साखरे, आळंद

# ऋणनिर्देश

प्रथम हे पुस्तक साकार होण्यासाठी ज्या सदर्भ ग्रंथाचा उपयोग करण्यात आला त्या समाज ग्रंथाचा, महापरिषेदा अहवालांचा अखिल भारतीय स्वकुळ साळी समाजाने प्रकाशित केलेल्या स्मरणिकेच्या इत्यादि पुस्तकातून साभार संकलन करण्यात आले आहे. असे संदर्भग्रंथ किती मोलाचे आहेत याची कल्पना यावरुन येते. अशा समाज इतिहास कालीन ग्रंथच आपले मार्गदर्शक व गुरु आहेत असे हे सत्य विधान आहे. हे सकलन करणारे व याकामी अत्यंत परिश्रम घेणारे आमचे स्नेही, स्वकुळ समाचारचे लेखक व आदरणीय समाज बांधव श्री. चुनीलाल तानीराम बागडे, रा. पारोळा, जि. जळगाव यांचे आम्ही सदैव ऋणी आहोत. तसेच या पुस्तकासाठी ज्यांचे मार्गदर्शन लाभले ते सर्वश्री डी. ए. चिल्लाळ (अखिल भारतीय समाज अध्यक्ष), श्री. दत्ता भंडारे (सरकार्यदर्शी), श्री. वामनराव कोऱ्हाळकर (माजीसरकार्यदर्शी) डोंबिवली, श्री. भिमाशंकर साखरे, आळंद, तसेच ठाणे जिव्हा स्वकुळ साळी समाज अध्यक्ष श्री. मधुकरराव वखारे, व कार्यकारिणी सदस्य यांचे आम्ही अत्यंत आभारी आहोत. अगदी कमी वेळात डी.टी.पी.चे काम करुन देणारे डोंबिवली येथील कॉम्प्यूग्रॉफिक्सचे श्री. सुशिल कुराडे व प्रेसचे श्री. गोविंदभाई यांचे आम्ही आभारी आहोत.

गेली १५ वर्षे अव्याहत स्वकुळ समाचारच्या माध्यमातून ठाणे जिल्हा स्वकुळ साळी समाज संस्था समाजसेवेचे व्रत अंगीकारून समाज संगठणेस वाहून घेतले आहे अशा या संस्थेने हे पुस्तक प्रकाशित करुन साळी समाजापुढे एक आदर्श निर्माण करुन समाज संगठनेच्या प्रवर्तकांना मानाचा मुजरा करीत आहोत. संपादक या नात्याने ठाणे जिल्हा स्वकुळ साळी समाज व कार्यकारिणी मंडळ यांच्या प्रेरणेने, सहकार्याने मी हे पुस्तक प्रकाशित करु शकलो हे मी माझे भाग्य समजतो व श्री जिव्हेश्वर चरणी हे पुस्तकरुपी पुष्प समाजबांधवांना नम्रतेने अर्पण करुन हे लहानसे कार्य आपण गोड मानुन घ्याल अशी अपेक्षा बाळगतो.

तसेच या पुस्तकासाठी जाहीरात देणारे जाहिरातदार, समाजबांधव, हितचिंतक यांच मी आभारी आहे. शिवाय या पुस्तकाचे देणगी मूल्य देऊन पुस्तक आपल्या संग्रही ठेवणारे माझे रसिक वाचक यांचा मी आभारी आहे.

शेवटी या पुस्तक प्रकाशनासाठी जी प्रेरणा लाभली ती प्रेरणा देणारे श्री भगवान श्री जिव्हेश्वराच्या चरणी शरण जाऊन पुस्तकातील काही चुका, त्रुटी आठळल्यास त्याबद्दल हा समाज बालक आपली क्षमा मागतो.

धन्यवाद, जय जिव्हेश्वर. आपला सेवक,

संपादक - श्री. सोमनाथ कासटकर

# पसायदान

आतां जिव्हेश्वर देवें । येणें मागणें तें द्यावें ।।
देऊनीं सुखी करावें । पसायदान हें ।।१।।
सदा घडो स्वकुल सेवा । हेंची मागणें देगा देवा ।।
असा भाव असूं द्यावा । भाविकांचा ।।२।।
हेवा-दावा जावो । प्रेम हृदयीं राहो ।।
न्यायनीती येवो । अंतर्यामी ।।३।।
एक-मेकां मदत होवो। मदतकार्यी मोद होवो ।।
सर्वांचा उध्दार होवो । समतत्वानें ।।४।।
जीवन उपासना होवो । उपासनेला फळ येवो ।।
कीर्ती ने जीवन उजळो । सर्वकाळ ।।५।।
जयां आवळे कला-गुण । व्हावें तयांचे कल्याण ।।
हेंची मागणे वारंवार । तुझीयां पायी ।।६।।
जें जें हवें जयासीं । तें तें मिळो तयासीं ।।
तोषवावें सर्वांसी । कृपा करुनी ।।७।।
ऐकोनीं जिव्हेश्वर प्रेमे । तोषोनीं बोले वचने ।।
होवोत पूर्ण कामें । प्राणिमात्रांची ।।८।।
तथास्तु । तथास्तु ।। तथास्तु ।।।

श्री. दत्तात्रय वंजी साळी, कल्याण

# आरती श्री जिव्हेश्वराची

(चाल-आरती करो नटवरकी)

आरती उजळीतो तुला । प्रभुशामला । जिव्हाजी स्वकुळा ।
ओवाळू आरती तुजला ।।धृ.।।
शिवरसनामृत सेवन करुनी । रुप मनोहर सुहास्य वदनी ।
जिव्हेश्वर नामे अवतरुनी । तोषविले सकळाला ।।१।।
देव सर्वही लावूनी कामा । वस्त्र बनविशी तू निज धामा ।
ऐसा तव हा अगाध महिमा । झाकियले सुरतनूला ।।२।।
अगणित वस्त्रे बनवूनी राया । झाकियली आखिलांची काया ।
वसनकला तूजपासूनी सखया । भूवरी ये उदयाला ।।३।।
बालक तव या अवनीवरती । साळी कोष्टी पटवी असती ।
जरी अज्ञाने तुला विसरती । सौख्यची देई तयाला ।।४।।
देह निरंजन करुनी आरती । काम क्रोध मद जाळूनी वाती ।
आत्म ज्योत ठेवूनी तेवती । विठ्ठल रत पद कमला ।।५।।
ओवाळू आरती तुजला ।।

*With Best Compliments From*

# SHREE RAJ ENTERPRISES

## CIVIL ENGINEERS & CONTRACTORS
## FOR HIRE : BULLDOZER (MINI)

# LAXMI ENTERPRISES

**Hiring & Investments**
**For Hire : J.C.B., Excavators,**
**Compressors, Mixer Machine**

## RAJESH S. SALI

Plot No. 581, Shirvane, At Post Nerul,
Navi Mumbai - 400 706
Phone : (Resi) 7670184

।। श्री जिव्हेश्वर प्रसन्न ।।

# ठाणे जिल्हा स्वकुळ साळी समाज संचालित

।। अखिल भारतीय स्वकुळ साळी समाज मान्यताप्राप्त ।।

# स्वकुळ समाचार

एकमेका साह्य करू । अवघे धरू सुपंथ ।    प्रामाणिक साळी प्रगत साळी

**आजीव सभासद - रु.२००/- विश्वस्त निधी १००१/-**
**कायम प्रसिद्धी - आधारस्तंभ (स्मरणार्थ) - १००१/-**
**उपवधुवर नोंदणी रु ५०/- (दोन महिने)**
**जाहिरात - फुल पेज ६००/- अर्ध पेज ४००/-**
**पाव पेज २५०/- शुभेच्छा - १०१/-**


**संपादक**

**श्री. सोमनाथ कासटकर**
१०५, बिंगो पार्क सोसायटी,
नांदिवली क्रॉस रोड, शांतीनगरजवळ
डोंबिवली (पू),
जि. ठाणे - ४२१ २०१
फोन - ८८३७८२

**अध्यक्ष**

**श्री. मधुकर वखारे**
श्री. समर्थकृपा, तळ मजला,
ब्लॉक नं.२, वाणी आळी,
कुळगांव (पूर्व), स्टेशन बदलापूर,
जिल्हा ठाणे - ४२१ ५०३
फोन - ६९५८०२


**उपाध्यक्ष -**

**श्री. उदयकुमार नाशिककर, श्री. प्रकाश बा. पावले**
**सौ. जयश्री आकडकर, श्री. विनोद सजगुले व कार्यकारणी सदस्य**

**संपादक मंडळ**

**श्री. मधुकर साळी** (कार्यवाह ठाणे जिल्हा स्वकुळ साळी समाज)
**श्री. भालचंद्र ने.साळी** (कोषाध्यक्ष ठाणे जिल्हा स्वकुळ साळी समाज)
**श्री. प्रभाकर म. मते, श्री. हेमंत वि. दाहोत्रे**
**श्री. डी.जी. निमकर, श्री. ईश्वर प्र. साळी, सौ.कालिंदी किचंबरे**

बाळगावी मना सज्जना, सुसंगती सुसंस्कारांची ।
करावी दोस्ती सर्वगुणसंपन्न, स्वकुळ समाचाराची ।।